# स्त्री-जीवन

१६७७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ११२

-गीतसंग्रह

भाग २रा

मराठी ग्रंथ संग्रहालय
२०२०
११२
२१-८-७७
११०४
११२
REFBK-0006200
REFBK-0006200

संग्राहक

साने गुरुजी

१८४१

ग्रंथ संग्रहालय
आ. १२९२
ता.

प्रकाश मंडळ–पुस्तक २५ वें

9212

# स्त्री-जीवन

[ भाग २रा ]

## ( स्त्री-गीतसंग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय
ता. ......... नं. .........
ता. ...........
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. 9212
ठाणे

संग्राहक :
साने गुरुजी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6200

REFBK-0006200
REFBK-0006200

५ एप्रिल ]　　किंमत १ रुपया　　[ १९४१

प्रकाशिका :
सौ. कमल कोपर्डेकर,
'प्रकाश-मंडळ'
५२९ सदाशिव, पुणें २.

[ स्त्री-जीवन—भाग १ ला व २ रा या दोन्ही पुस्तकांचे सर्व हक्क
साने गुरुजी यांच्या परवानगीनें द. र. कोपर्डेकर,
मालक, 'प्रकाश मंडळ', पुणें २ यांचे स्वाधीन. ]

मुद्रक :
श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण,
कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें २.

# साने गुरुजी यांचें वाङ्मय

## कादंबऱ्या

श्यामची आई
श्याम - खंड १
श्याम खंड २
धडपडणारीं मुलें
पुनर्जन्म
क्रांति
सती
आस्तिक

## कथा

विश्राम
सोन्या मारुती

ठाणे.

## नाटकें

निळा पक्षी
तें आपलें घर
अस्पृश्योद्धार

## काव्य

स्त्री - जीवन, भाग १
स्त्री - जीवन, भाग २
पत्री

## चरित्रें

नामदार गोखले
ईश्वरचंद्र विद्यासागर
इतिहासाचार्य राजवाडे
बेंजामिन फ्रँकलिन
शिशिरकुमार घोष
रवींद्रनाथ टागोर

## प्रबंध

भारतीय संस्कृति
स्वदेशी समाज
खेड्यांत जाऊन काय कराल?

## — आगामी —

राष्ट्रीय धर्म
श्याम—खंड ३ रा
गोड गोष्टी १
,, ,, २

# अनुक्रमणिका


| | | प्रकरण | पृष्ठें |
|---|---|---|---|
| १ | दोन शब्द | | १ |
| २ | देवादिकांच्या व पौराणिक ओंव्या | ५ वें | ५ |
| ३ | तीर्थक्षेत्रें-पुरें-पट्टणें | ६ वें | ३८ |
| ४ | ऐतिहासिक व देशाच्या | ७ वें | ५८ |
| ५ | व्रतें, सण वगैरे | ८ वें | ७४ |
| ६ | ऋतुवर्णन, सृष्टिवर्णन | ९ वें | ८४ |
| ७ | पहिली माझी ओंवी | १० वें | ९६ |
| ८ | सुभाषितें | ११ वें | १०६ |
| ९ | संकीर्ण | १२ वें | ११७ |

ठा जे.

# दोन शब्द

स्त्रियांच्या ओंवीवाङ्मयाचा पहिला भाग कांहीं महिन्यांपूर्वी 'स्त्रीजीवन' या नांवानें मीं प्रसिद्धीसाठीं दिला. आज हा दुसरा भाग देत आहें. पहिला भाग सर्व स्त्री-पुरुषांना आवडला. नव्याजुन्या सर्वांना आवडला. खेड्यापाड्यांत हें पुस्तक गेलें. शहरांतील सुशिक्षित स्त्रीपुरुषांनींहि तें प्रेमानें कवटाळलें. जेथें जेथें महाराष्ट्रसमाज पसरला आहे तेथें तेथें 'स्त्रीजीवना'चा पहिला भाग गेला. अनेकांचीं सहृदय पत्रें आलीं. अनेकांनीं त्यांतील अभिजात काव्याची मुक्तकंठें प्रशंसा केली. माझे थोर गुरुजी प्राध्यापक पोतदार, नाशिक येथें मी गीतेवर प्रवचनें देण्यासाठीं गेलों असतां मला म्हणाले, "या ओंव्यांवरच द्या ना प्रवचनें ? आणि दुसरा भाग लवकरच प्रसिद्ध करा."

श्री. पोतदारांना पहिल्या भागापेक्षांहि दुसरा भाग हवा असेल. कारण या दुसऱ्या भागांत ऐतिहासिक ओंव्यांचें प्रकरण येणार होतें.

आज स्त्री-जीवनाचा हा दुसरा भाग महाराष्ट्राला मी देत आहें. मीं गोळा केलेल्या ओंव्या जनतेला देऊन मी मोकळा होत आहें. घाईघाईनें या भागांतील प्रकरणांना मीं रसपरिचय लिहून जोडले. राष्ट्रांत लढयाचें वातावरण आहे. सत्याग्रह सुरू आहे. या वेळेस लिहावयास सवड कोठें ? परंतु दोन दिवस काढून हा दुसरा भाग पुरा करून दिला आहे. म्हणजे मला जरी तुरुंगांत कदाचित् जावें लागलें तरी भाग प्रसिद्ध होण्यास अडचण येणार नाहीं.

माझे मित्र भाई गोरे या सर्व ओंव्यांचा अभ्यास करून समाजस्थितिविषयक एक निबंध या दुसऱ्या भागांत घालण्यासाठीं देणार होते. परंतु त्यांना वेळ झाला नाहीं. ओंव्या महाराष्ट्रासमोर आहेत. कोणीहि त्यांचा अभ्यास करावा व निबंध लिहून प्रकाश पाडावा.

ओव्यांचा जो पहिला भाग मागें प्रसिद्ध झाला, त्याच्या प्रस्तावनेंत मीं म्हटलें होतें कीं, या ओंव्या पांढरपेशा समाजांतील आहेत. समाजांतील प्रत्येक जातींत अशा प्रकारचें स्त्रीवाङ्मय असेल तें गोळा केलें पाहिजे." कांहीं लोकांना तशी स्फूर्ति मिळाली आहे असें कळतें. अमळनेर तालुक्यांतील नांदेड गांवाच्या एका तरुणानें लेवापाटीदार समाजांतील स्त्रियांच्या ओंव्या गोळा केल्या आहेत असें कळतें. तिकडे यावल-रावेरी बाजूला प्रसिद्ध लोकसेवक श्री. धनाजी नाना चौधरी यांच्या खिरोदे वगैरे भागांत तरुण मुलांमुलींनीं चारपांचशें ओंव्या जमविल्या आहेत असें कळतें. सर्व वर्गांतील स्त्रीपुरुषांना परंपरेनें आलेलें हें गोड ओंवी-वाङ्मय गोळा करण्याची स्फूर्ति जर माझ्या या स्त्रीजीवनाच्या भागांनीं झाली तर माझे अल्पसे श्रम कृतार्थ झाले असें मी समजेन.

स्त्री-जीवनाच्या पहिल्या भागांत ज्या ज्या भगिनींपासून मीं ओंव्या घेतल्या त्यांचा नामनिर्देश करून मनःपूर्वक त्यांचे आभार मानले आहेत. या भागांतील ओंव्या त्यांचेजवळूनच घेतलेल्या. त्यांचीं नांवें येथें देत नाहीं. त्यांचें पुन्हा कृतज्ञतापूर्वक स्मरण करतों म्हणजे झालें.

ठाणें येथें एकदां मी व्याख्यानार्थ गेलों होतों. व्याख्यानानंतर कांहीं मंडळीशीं मी बोलत बसलों होतों. एक तरुण म्हणाला, "तुमच्या स्त्री-जीवनांत

**"मानीयला भाऊ जातीचा मुसलमान**
**दिवाळीचा सण त्याचा कागदीं सलाम"**

ही जी ओंवी आहे ती खरोखर तुम्हांला मिळाली का ?"

त्याचा प्रश्न ऐकून मला वाईट वाटलें. एक तर खोटेपणाचा अप्रत्यक्ष मजवर आरोप येत होता. आणि दुसरी गोष्ट म्हणजे मुसलमान व हिंदु यांचें असे प्रेमळ व घरोब्याचे संबंध असणें त्याला अशक्य वाटत होतें, केवळ कल्पनेंतील वाटत होतें.

मला नम्रपणें एवढेंच सांगायचें आहे कीं, दोन्ही भागांतील ओंव्या भगिनींच्या तोंडूनच मीं ऐकल्या व लिहून घेतल्या. त्या मीं रचिलेल्या नाहींत. माझ्या पदरच्या ओंव्या मधून मधून मीं घातलेल्या नाहींत. मला ओंव्या करायच्या झाल्या तर मी स्वतंत्रपणें त्या करीन व माझ्या नांवानें प्रसिद्ध करीन. भगिनींच्या आड मी लपणार नाहीं. परंतु मी माझा प्रामाणिकपणा

सिद्ध कसा करूं ? किती तरी ओंव्या देणाऱ्या मायबहिणी देवाघरीं निघून गेल्या आहेत.

पुण्याच्या एका कॉलेजांतील मराठीचे एक प्राध्यापक माझ्या " पत्री " या काव्यसंग्रहांतील " प्रेमधर्म " या कवितेविषयीं एकाजवळ बोलत होते. त्या कवितेंत एका कुळंबिणीचें मूल आगगाडींत रडत असतें. ती माता मुलाला उगी करूं पाहते. परंतु मूल थांबत नाहीं. जवळ बसलेली एक गरीब मुसलमान माता त्या रडणाऱ्या मुलाला जवळ घेऊन खेळवूं लागते व त्याचें रडें थांबतें. ती कुळंबीण जवळचें सुपारीचें खांड त्या मुसलमान बाईस कृतज्ञतेनें देते. असा तो प्रसंग आहे. परंतु हे प्राध्यापक म्हणाले, "सान्यांना तेथेंहि मुसलमान बाई घालावीशी वाटली ! "

सान्यांनीं ओढूनताणून घातली नाहीं. त्यांनीं जें मनोहर प्रेमळ दृश्य आगगाडींत स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलें, तें वर्णिलें. तेथें मुसलमान बाई होती, त्याला साने काय करतील ? परंतु आजकाल हिंदुमुसलमानांचे पवित्र व गोड संबंध असूं शकतात ही गोष्टच आम्हांला अशक्य वाटूं लागली आहे. मानवजातीसंबंधीं केवढा हा द्रोह !

कोंकणांत माझी वैनी मागील वर्षीं मरण पावली. कांहीं मुसलमान आयाबाया माझ्या भावाच्या समाधानासाठीं आल्या होत्या. एकीनें माझ्या भावाच्या लहान मुलीसाठीं खाऊला रुपया दिला. एक मुसलमान बंधु आला व म्हणाला, " फार वाईट झालें. तुमचा वजीरच गेला." पत्नी म्हणजे संसारांतील सचिव. " गृहिणी सचिवः " या कालिदासाच्या वाक्याची त्यानें आठवण दिली. असे प्रेमळ संबंध अद्याप खेड्यापाड्यांतून आहेत. सुशिक्षित हिंदु-मुसलमान आपलीं द्वेषबीजें खेड्यापाड्यांतहि नेतील व तेथील जीवनालाहि मरणकळा आणतील, ती गोष्ट निराळी.

संकुचित सुशिक्षितांना कांहीं वाटो. मी तर मांगल्यावर श्रद्धा ठेवणारा नम्र प्राणी आहें. आणि जें जें मंगल मला दिसेल तें तें सर्वांसमोर लेखणीनें, वाणीनें ठेवण्याची मी खटपट करीन. तें कोणाला खोटें वाटलें तर वाटो बापडें !

" सत्या असत्यासि मन केलें ग्वाही "

असें श्रीतुकाराममहाराजांनीं म्हटलें आहे. पहिल्या भागांतील प्रकरणांत घालण्या-

सारख्या आणखी ओंव्या मिळाल्या आहेत. स्त्रीजीवनाच्या भागांची पुनरावृत्ति काढण्याचे प्रसंग आले, तर ह्या नवीन मिळालेल्या व इतर ओंव्या त्यांतून मी घालीन. निरनिराळ्या मासिकांतून ओंव्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांच्या फाइली चाळून त्या ओंव्या तपासल्या पाहिजेत. आणि या भागांतून ज्या ओंव्या आलेल्या नसतील, त्या त्यांतून घेऊन घातल्या पाहिजेत. परंतु हें काम पुढें केव्हां तरी करीन. आज मजजवळ जमलेल्या ओंव्या महाराष्ट्रास देऊन मी या वेळेपुरता तरी मोकळा होत आहें. पहिल्या भागाप्रमाणें हा भागहि सर्वांनीं गोड करून घ्यावा अशी प्रार्थना आहे.

२७।१।१९४०

—साने गुरुजी

# स्त्री-जीवन

## भाग दुसरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२१२
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६२०७

## देवादिकांच्या व पौराणिक ओंव्या

### प्रकरण पांचवें

### रसपरिचय

या प्रकरणांत आरंभीं मीं मंगलमूर्तीच्या वंदनाच्या ओंव्या दिल्या आहेत. मंगलमूर्तीजवळ माता आपल्या मुलीला पुत्र व्हावा अशी प्रार्थना करीत आहे :

मोरया रे देवा लाडू घे सोंडेवरी
पुत्र दे मांडीवरी उषाताईला
मोरया रे देवा तुला लिंपीन शेंदूर
पुत्र तूं दे सुंदर उषाताईला

आपली मुलगी सासरीं सुखी राहावी म्हणून विघ्ननाशक गणपतीला माता प्रार्थना करिते :

मोरया रे देवा सारीं विघ्नें हीं हांकवितां
तान्हे बाळीला राखावी दूरदेशीं

गणपति ही विद्येची देवता. मुलाला विद्या मिळावी, सद्बुद्धि यावि म्हणून ही मोरयाची विनवणी केलेली आहे. संकष्ट चतुर्थीचेंहि वर्णन आहे. संकष्टीच्या चंद्राचें हें मनोहर वर्णन वाचा :

**संकष्ट चतुर्थी चंद्र दिसतो हिरवा**
**सखी वेंचते दुरवा पूजेसाठीं**

गणपतीच्या वर्णनानंतर शंकराच्या वर्णनपर ओंव्या दिल्या आहेत. शंकराचें स्थान बहुधा डोंगरांत, जंगलांत, कोठें तरी घळींत असावयाचें. हा विरक्त योगीराणा दूर राहतो :

**खोलामध्यें नांदे नाहीं त्याचा गाजावाजा**
**भोळ्या त्या सांबा माझा नमस्कार**

शंकराचें वर्णन करणाऱ्या ओंव्या फार सुंदर आहेत. एके ठिकाणीं तर गंमत केली आहे. शंकराला आपण भोळा म्हणतों. परंतु एक कवयित्री सांगते, " याला भोळा म्हणूं नका. मोठा लबाड आहे हा. यानें आपल्या जटेंत गुपचूप गंगा ठेवून दिली आहे. पार्वतीला कळूं नये म्हणून."

**भोळा महादेव याला भोळा म्हणूं नये**
**त्याच्या जटेमध्यें . गुपित गंगा वाहे**

परंतु एकंदरींत हा देव भोळा. तो आशुतोष म्हणजे पटकन् प्रसन्न होणारा आहे. सुष्ट असो वा दुष्ट असो, जो जें मागेल तें त्याला देतो.

**भोळा महादेव क्षणीं प्रसन्न होतसे**
**दुष्ट असो सुष्ट असो वर मागे तो देतसे**

या भोळ्या महादेवाला मूठभर शिवामूठ वहा. तेवढ्यानें प्रसन्न होऊन तो अपार भाग्य देतो.

पार्वतीनें हा भोळा सांब वरिला म्हणून तिचें कौतुक केलें आहे. जशी ही पार्वती पतिव्रता, तशी ती सत्यवानाची सावित्री. सत्यवान् व सावित्री यांची ती अमर कथा कोणास माहीत नाहीं ? पतीचे प्राण यम पाशानें ओढीत असतां सावित्री धैर्यानें तेथें उभी राहते :

**पति असे पाशीं धैर्यें बसे त्याच्यापाशीं**
**नाहीं झाली गोष्ट अशी भूमंडळीं**

यमापासून योगिनी सावित्रीनें पति परत आणिला त्या सावित्रीचा महिमा किती गावा ? पतिप्रेमामुळें एक अबला यमाहून बळी झाली :

सावित्रीचा महिमा    अमर भूमंडळीं
अबला झाली बळी    यमाहून

पातिव्रत्याच्या प्रभावानें प्रत्यक्ष काळहि मनीं दचकतो :

सतीच्या प्रभावें    काळहि मनीं खचे
नांव घ्या सावित्रीचें    संसारांत

अशा या सावित्रिचें नुसतें नांव घेतलें तरी अक्षय सौभाग्य लाभेल :

सावित्री सावित्री    जरी म्हणतील नारी
त्यांचे या संवसारीं    वज्रचुडे

सावित्री आठवतांच सीताहि आठवते :

रामाची ग सीता    लक्ष्मणाची ग वयनी
दशरथाची पहिली    ज्येष्ठ सून

लग्नामध्यें राम पांच वर्षांचेच होते व सीता अडीचच वर्षांची होती असें म्हटलें आहे. कारण सर्वत्र बालविवाह होत होते. अडीच वर्षांच्या सीतेनें माळ कशी घातली, पांच वर्षांच्या रामानें धनुष्य कसें मोडलें त्याची आपणांला कां उठाठेव ?

दुष्ट कैकेयीनें रामासारखा भ्रतार सीतेला भोगूं दिला नाहीं. तीं सारीं वनांत गेलीं. परंतु भरत ! त्याचें किती प्रेम ! राम वनांत गेले म्हणून तो नांदिग्रामीं वनस्थ व व्रतस्थ होऊन राहिला :

जटाधारी झाला    निजतो सुखें भुईं
भरत जणुं होई    वनवासी
धन्य रे भरता    धन्य रे तूं भाऊ
तुझी कीर्ति राहू    चिरंजीव

समृद्ध असें राज्य तृणप्राय तो मानतो. भरताची ही भक्ति पाहून डोळे भरून येतात :

धन्य रे भरता    धन्य रे तुझें मन
तुझ्या स्मरणें लोचन    भरुन येती

भरताची अशी भक्ति, आणि तो लक्ष्मण ! तो तर राम जवळ नसेल तर

राहूंच शकत नव्हता, जगूंच शकत नव्हता. राम म्हणजे त्याचें जीवन. राम व सीता वनांत चालत असतां लक्ष्मण पुढें चालत असे. तो दगड-धोंडे, कांटे दूर करीत असे. किती सहृदय वर्णन आहे तें वाचा :

**राम चाले वाटे लक्ष्मण झाडी खडे**
**असे बंधु झाले थोडे पृथ्वीवरी**
**राम चाले वाटे लक्ष्मण झाडी कांटे**
**असे बंधु नाहीं कोठें संसारांत**

राम व सीता यांची सेवाचाकरी करणें हाच लक्ष्मणाचा आनंद. तो त्यांच्यासाठीं रसाळ फळें आणी. सीतेनेंहि वनवासांतील संसाराला मधुरता आणली. स्त्रियांनीं पंचवटींतील राम-सीतेच्या राहणीचें मनोहर वर्णन केलें आहे. सीतेनें जाईचे वेल लावले आहेत. त्यांच्या हिरव्यागार मंडपांत राम आंघोळ करतो; परंतु कढत पाण्याला विसावण हवें होतें. गोदावरीचें पाणी आणणें कठीण; मग रामानें तेथेंच बाण मारून पाणी काढलें :

**रामाच्या आंघोळीला पाणी नाहीं विसाणाला**
**अमृताचे झरे लाविले ग पाषाणाला**

रामाची आंघोळ चालते. सीता सर्वत्र सडासंमार्जन करून रांगोळी काढते. रामाच्या संध्येसाठीं ती स्वच्छ पाण्याचा तांब्या भरून ठेवते :

**रामकुंडावरी रामराया संध्या करी**
**सावळी सीताबाई अमृतानें तांब्या भरी**

सीता त्या पंचवटींत कुमारिकांना परकर-चोळ्या वाटते, सुवासिनींना हळदीकुंकू देते, ब्राह्मणांना धोतरजोडे देते असें वर्णिलें आहे. जशी एखादी भरल्या घरांतील सुवासिनी वागते तशी सीता वनांत राहते. सीता वनांत आहे हें जणूं ओंव्या करणाऱ्या बायका विसरल्या.

सीता रामाची शय्या तयार करते, त्याला विडा देते, त्याचे प्रेमानें पाय चेपते. रामाला घाम वगैरे आला तर सीता आपल्या पदरानें तो पुसून टाकते; व घाम पुसणाऱ्या प्रेमळ पत्नीकडे राम बघतो. किती गोड हें स्वभावचित्र !

**" रामाला आला घाम सीता पुसते घोळानें**
**पाहतसे तिच्या मुखा रामराया ग प्रेमानें "**

**रामराया आला घाम सीताबाई घाली वारा**
**पतिसंगतींत प्रेमें वनवास कंठी सारा**

पंचवटींत थंडी फार. गोदावरीच्या तीरावर वसति, गार गार वाटायचें. त्यामुळें रामरायाला पडसें आलें व सीतेनें त्याला आलें खायला दिलें असें घरगुती सांसारिक वर्णन आहे :

**रामरायाला पडसें सीता देतें त्याला आलें**
**पंचवटीमधें त्यांचें पर्णकुटी घर झालें**

राम व सीता यांचा वेळ तरी कसा जाई ? राम फुलझाडें लावी, सीता पाणी घाली. रानांतील पांखरांचीं नांवें सीतेनें विचारावीं व सीतेचें अज्ञान पाहून रामानें हसावें. मग सीतेला राग येई. तो राग हळूच हात लावून राम दूर करी :

**रामाला पुसते सीता पांखरांचीं नांवें**
**रामरायानें हसावें कौतुकानें**
**सीता रागावली रानीं रुसून बैसली**
**रामरायें हासविली स्पर्शमात्रें**

रानांत राहतां राहतां रावणाचें संकट आलें. सीतेला सुवर्णमृगाच्या चर्माची चोळी शिवावी असें वाटलें. मोठमोठ्यांसहि मोह फसवितो :

**सोन्याच्या चोळीचा मोह सीतेला सुटला**
**कोण प्रपंचीं विटला सर्व सुखा**

सीतेला रावण नेतो. राम हिंडूं लागतात. शबरी भेटते. शबरीचीं बोरें अधाश्याप्रमाणें राम खाऊं लागले. सीतेला देत ना. ती भांडूं लागली :

**शबरीचीं बोरें एकटा राम खाई**
**सीतेचें त्याच्याशीं मग गोड भांडण होई**

रामाची व मारुतिरायांची गाठ पडते. अशोकवनांत सीता रडत असते. अशोकाच्या फुलांना बहर आला होता. कारण सीतेच्या डोळ्यांतील पाणी त्यांना मिळे.

**अशोकाच्या झाडा फुलांचा नित्य बहर**
**सीतादेवीच्या डोळ्यांचा त्याला मिळतो पाझर**

अशोकाच्या झाडा सीता घाली पाणी
नेत्र येतात भरोनी रात्रंदिस

सीतेच्या डोळ्यांतील पाणी मिळे म्हणून तीं फुलें अत्यंत सुकुमार दिसत. सीतेचा श्वासोच्छ्वास लागल्यामुळें त्या फुलांना गोड वास येई. सीतेच्या डोळ्यांतून पाण्याचा सडा पडे व अशोकाचीं फुलेंहि टपटप खालीं पडून सडा होई, अशा मनोहर उत्प्रेक्षा आहेत.

मारुति सीतेची बातमी नेतात. वानरांसह राम येतात. सेतु बांधूं लागतात. राम शिळा टाकी ती बुडे. परंतु त्याचें नांव लिहिलेली तरे. मारुति म्हणतो :

हसून मारुति म्हणे रामा रघुनाथा
देवा तुमच्याहीपेक्षां तुमच्या नांवाची योग्यता

सेतु होतो. रावणाशीं युद्ध सुरू होतें. रामाचे बाण हळूहळू लंकेवर येऊं लागतात. मग लाखों येऊं लागतात. इंद्रजिताला लक्ष्मण मारतो. रावणाहि मारला गेला. परंतु राम सीतेची परीक्षा पाहतात :

रामाचें हृदय जणूं कठीण पाषाण
फूल आगींत घालून बघतसे

पुढें पुष्पक विमानांत बसून राम व सीता निघतात. सीतेला समाधान वाटतें. शेवट गोड होतो :

सांवळी जानकी रामरायाच्या मांडीवरी
सीतेच्या तोंडावरी प्रसन्नता

रामाला भरत भेटतो. राम भरताला नाहीं भेटले. जणूं स्वतःच्या हृदयाला भेटले :

भरता भेटला भेटला हृदयाला
रामरायानें न्हाणीला नेत्रजळें

रामानें भरताच्या पाठीवरून हात फिरविला आणि भरताचे बारा वर्षांचे कष्ट नष्ट झाले :

भरताच्या पाठीवर राम फिरवितो हात
बारा वरसांचे कष्ट दूर केले

रामाला अभिषेक होतो. सुखाचा संसार सुरू होतो. सीता नाना प्रकारचे दागिने मागते. राम देतो. दिवाणखाना सजलेला असतो. भाग्य फुलतें. सीता गर्भार असते. राम तिला डोहाळे पुसतो :

सीतेला डोहाळे रामाला काय कळे
निंबोणी रस गळे शेल्यावरी

सीतेला डोहाळे रामाला सांगावे
रुमालीं आणावे बाळआंबे

रानांतील आंब्याच्या कैऱ्या खाव्या असे डोहाळे सुरू होतात. पुढें राम सीतेचा त्याग करितात. वनवासांतील हें गरोदर सतिचें वर्णन करुण असें आहे :

सीता वनवासी दगडाची केली उशी
अंकुश बाळ कुशी वाढतसे

दगडावर कशी आली तिला झोप ? पुढें सीता बाळंत होते. बाळबाळंतीण कोठल्या बाजेवर निजत होतीं ? :

सीता वनवासी दगडाची केली बाज
अंकुश बाळा नीज वनामध्यें

पुढें लवांकुश वाढतात. रामाबरोबर त्यांची लढाई होते. रामाचे बाण लवांकुशावर येत होते. जणूं ते बाण म्हणजे कमरेला कडदोरा, हातांतील कडीतोडे. रामाला का कठोर बाण मारवत नव्हते ? का ते बाण मुलांना फुलाप्रमाणें वाटत होते ? रामानें आपल्या मुलांना इतर बाळलेणें घातलें नाहीं. जें घातलें तें या बाणांचें :

बाणामागें बाण बाण येती मागंपुढें
रामाच्या बाणांचे लवांकुशा कडीतोडे

बाणामागें बाण बाण येती झराझरा
रामाच्या बाणांचा लवांकुशा कडदोरा

असें हें थोडक्यांत जणूं ओंव्यांत रामायणच आहे. रामायण म्हणजे मारुतीचा पराक्रम. मारुतिरायाच्या वर्णनाच्या ओंव्या सुंदर आहेत :

मारुतीला प्रणाम करण्यापूर्वीं असा पुत्र प्रसवणाऱ्या मातेला आधीं नमन केलें पाहिजे :

**आधीं नमन करूं अंजनीबाईला**
**मग मारुतिरायाला तिच्या पुत्रा**

कोणताहि गांव घेतला तर तेथें मारुतीचें देऊळ आहेच. पुष्कळ वेळां गांवाबाहेर तें वेशीजवळ असतें. तेथें मंडळी बसतात उठतात. वाटेचे वाटसरू विसांवा घेतात :

**माझा ग दयाळु. वेशीच्या बाहेर उभा**
**मारुतिरायाचा शेंदरी लाल झगा**

रामाचें वर्णन झालें आणि कृष्णाचें ? कृष्णाचें वर्णन करतां करतां कोणाची वाणी थकणार नाहीं ? यशोदामाईचें केवढें भाग्य ! :

**दैवाची यशोदा नेसली पीवळें**
**मांडीये सांवळें परब्रह्म**

यशोदा कृष्णाला खेळवते, जेवविते, तो तिच्या निऱ्या धरून उभा राहतो, चांदोबा खेळायला मागतो :

**यशोदेच्या निऱ्या कृष्ण धरून उभा राही**
**चंद्रमा म्हणे देई खेळावया**

कृष्ण वाढतो. यमुनेच्या तीरीं गाई चारतो. कालियाला मारण्यासाठीं यमुनेंत उडी घेतो. तें झोंकदार वर्णन वाचा :

**कृष्ण उडी टाकी कळंब कडाडला**
**शेष दणाणला पाताळांत**
**कृष्ण उडी टाकी कळंबाच्या मेजें**
**यमुने पाणी तुझें गढूळलें**

उंच कळंबाच्या झाडावरून कृष्ण उडी मारतो. त्यामुळें कृष्ण खोल जातो. यमुनेच्या तळाचा गाळ वर येतो.

असा हा गोपाळकृष्ण भक्तांचीं संकटें दूर करतो. गायींसाठीं पांवा वाजवतो. साध्या मोरपिसांनीं नटतो :

खांदीये घोंगडी अधरीं धरी पांवा
गोपाळ कृष्ण गावा गोकुळींचा
मोरमुकुट माथां गळां वनमाळा
स्मरावा सांवळा गोकुळींचा

कृष्ण खोड्या करतो. यशोदा त्याला बांधते, मारते. ज्याच्या नांवानें बद्ध मुक्त होतात, त्याला यशोदा बांधून ठेविते :

ज्याच्या नांवें होती संसारांत मुक्त
यशोदा बांधीत त्याला दावें

जो दुष्ट असुरांना मारतो, त्याला यशोदा काठी मारते :

राक्षस संहारी कालिया विदारी
यशोदा त्याला मारी वेतार्टीनें

असा हा गोड विरोधाभास आहे.

आणि ती कुंजवनांतील फुललेल्या शारदीय चांदण्यांतील रासक्रीडा :

कां ग सखी तुझे डोळे लाल धुंद
काननीं गोविंद वाजवितो

सूचक उत्तर ! काननांतील वेणुध्वनि ऐकून झोप कशी येणार ?

कृष्ण भगवान् पांडवांचा सखा. द्रौपदीचा तो पाठीराखा. राजसूय यज्ञांत वाढतांना द्रौपदीच्या चोळीची गाठ सुटली. पापी हसूं लागले. परंतु कृष्णानें लाज राखली. द्रौपदी चतुर्भुज झाली :

दोन हातीं वाढी दोन हातीं बांधी
सांवळी द्रौपदी मांडवांत
राजसूय यज्ञीं द्रौपदीचे तुटे बिरडें
चतुर्भुज कीं गोविंदें तिला केलें

द्रौपदी चतुर्भुज होतांच सारे आश्चर्यचकित होऊन टकमक पाहूं लागतात. द्रौपदी मग नाना प्रकारचे पदार्थ वाढते. सारे जेवून उठतात. द्रौपदी शेण लावून थकलेल्या कृष्णाला वाढते. देवाला ती साधें लोणचें आणते :

राजसूय यज्ञीं द्रौपदी वाढी लोणचें
कृष्णाचें पान कोणचें विचारीते

कृष्णाची द्रौपदीवर फार प्रीति. सख्ख्या बहिणीवर त्याची प्रीति कमी. आणि द्रौपदीहि म्हणते : " कृष्ण माझा कोणी नाहीं. तरी खरी माया त्याचीच माझ्यावर."

द्रौपदीमाई म्हणे नव्हे माझा सख्खा भाऊ
मायेचा कृष्णनाथ किती त्याची वाट पाहूं

द्रौपदीवर तो केवढा कठीण प्रसंग ! दुर्योधन तिला उघडी करूं पाहतो. परंतु देव लाज राखतो. अनंत रंगांचीं वस्त्रें भराभरा आंतून निघतात. शेवटीं दुष्ट दमतो :

वस्त्रं फेडुनीयां पापी चांडाळ दमला
कैवारी कृष्ण झाला द्रौपदीचा

कृष्ण व द्रौपदीचे हे प्रसंग बहारीनें वर्णिले आहेत.

अभिमन्यु बाळाच्याही ओव्या सुंदर आहेत :

चक्रव्यूहीं शिरे पुत्र प्रतापी पार्थाचा
भाचा प्रत्यक्ष कृष्णाचा अभिमन्यू

अभिमन्यू बाळ सिंहाचं ग पिलूं
लागले सारे पळूं कौरवांचे

शेवटीं रणांगणांत तो सिंहाचा छावा मरून पडतो. तोंडानें गोविंदनाम तो जपत असतो :

गोविंद गोविंद मंजुळ मुखीं वाचा
पति पडे उत्तरेचा रणांगणीं

याच प्रकरणांत नारदांच्या वर्णनाच्याहि ओंव्या आहेत. हें शब्दचित्र पाहा :

कळीचा नारद उभारीतो शेंडी
वीणा तो काखुंडी शोभे सदा

या प्रकरणांत शेवटीं तुळसादेवीच्या ओंव्या घातल्या आहेत. तुळस म्हणजे पवित्र वस्तु. मरतांना तोंडावर तुळशीपत्र ठेवून देवाघरीं जायचें. तुळशीला पाणी घातल्याशिवाय बायका जेवत नाहींत. रानावनांतील तुळस. परंतु प्रेमानें तिला अंगणांत जागा दिली :

तुळशी ग बाई जन्म तुझा रानींवनीं
बैस अंगणांत जागा देतें वृंदावनीं

तुळशीच्या पवित्र झाडाला माता पाणी घालीत असते. त्या वेळेस माता कशी दिसते :

तुळशीला पाणी घाली तुळशी खालीं बसे
प्रत्यक्ष गंगा दिसे मायबाई

गरीब बायका म्हणतात : “ आम्हां कोठली काशीयात्रा ? अंगणांतील तुळशीचें दर्शन हेंच काशीदर्शन.”

काशी काशी म्हणून लोक जाती ग धांवत
काशी माझ्या अंगणांत तुळसादेवी
काशी काशी म्हणून लोक जाती दुरी
काशी माझ्या घरीं तुळसादेवी

बाहेर सायंकाळ व्हावी, दिवा लावून देवा-तुळशीला दाखवावा, तुळशीला हात जोडावे :

संध्याकाळ झाली वाजले ते सात
तुळशीला हात जोडीयेले

भगिनी निवेदितादेवींना अशा प्रसंगांचीं चित्रें किती सुंदर काढतां येतील असें नेहमीं वाटत असे.

## देवादिकांच्या व पौराणिक : ओंव्या

आधीं नमन करूं देव गणपति
शारदा सरस्वती मोरावरी १
मोरया रे देवा तुला दुर्वांची आवडी
एकविसांची जुडी बाळासाठीं २
मोरया रे देवा लाडू घे सोंडेवरी
पुत्र दे मांडीवरी उषाताईला ३
मोरया देवाला केलं दुर्वांचें आसन
झाला मोरया प्रसन्न भाईरायाला ४

मोरया रे देवा तुला लिंपीन शेंदूर
पुत्र तूं दे सुंदर उषाताईला ५

मोरया रे देवा तुला जास्वंदीचें फूल
मांडीये देई मूल उषाताईला ६

मोरया रे देवा सारीं विघ्नें हीं हाकावीं
तान्हे बाळीला राखावी दूरदेशीं ७

मोरया रे देवा सारीं विघ्नें कर दूर
निर्विघ्न माझा कर संवसार ८

आणा गणेशाला गणेशचतुर्थीला
देईल सद्बुद्धीला तान्हे बाळा ९

आणावा गणेश त्याचा मांडावा सोहळा
देईल विद्येला तान्हे बाळा १०

आणावा गणेश विघ्नं तो करी दूर
सुखाला येवो पूर गोपू बाळाच्या ११

आणावा गणेश त्याला वाहूं हिरव्या दुर्वा
प्रार्थू मनोरथ पुरवा गणराया १२

आणावे नारळ करीन एकवीस मोदक
देव सिद्धिविनायक कृपा करो १३

संकष्ट चतुर्थी आहे माझा नेम
भाचा सांगेन ब्राह्मण गोपू बाळ, १४

संकष्ट चतुर्थी चंद्र दिसतो हिरवा
सखी वेंचते दुरवा पूजेसाठीं १५

सर्वांच्या मागून शिवाची करिती पूजा
भोळ्या सांबालागीं माझा प्रणिपात १६

खोलामध्यें नांदे नाहीं त्याचा गाजावाजा
भोळ्या त्या सांबा माझा नमस्कार १७

रानींवनीं वसे माझा कैलासींचा राजा
भोळ्या सांबालागीं माझा प्रणिपात १८

स्मशानीं वसती अंगाला विभूति
पति तो पार्वती वरीतसे १९

सर्पाचीं वेटाळीं ज्याच्या गळां वेढे देती
पति तो पार्वती वरीतसे २०

भैरव भुतांची नाचे मंडळी सभेंतीं
पति तो पार्वती वरीतसे २१

हातांत डमरू त्रिशूळ दुज्या हातीं
पति तो पार्वती वरीतसे २२

नंदीचें वाहन चंद्रमा माथ्यावरतीं
पति तो पार्वती वरीतसे २३

जगाच्या कल्याणा हलाहल सुखें पीती
पति तो पार्वती वरीतसे २४

जगाच्या कल्याणा विषाचा घोट घेती
नीळकंठ झाली कीर्ति शंकराची २५

भोळा महादेव याला भोळा म्हणूं नये
त्याच्या जटेमध्यें गुपित गंगा वाहे २६

भोळा महादेव भोळें याचें देणें
त्यानें मला दिलें त्याच्या विभूतीचें सोनें २७

भोळा महादेव क्षणीं प्रसन्न होतसे
दुष्ट असो सुष्ट असो वर मागे तो देतसे २८

भोळा महादेव त्याला वहा शिवासूठ
मग संसारीं सुखाची उषाताई तुला लूट २९

चिलू माझा वेसारा पापड पसारा
निघाला वेसवारा कैलासांत ३०

चिलू माझा दाणीया भांगीं भरल्या गोणीया
निघाल्या पेणीया कैलासांत ३१

त्रिश्वरण चेतवीला महानंदा घाली उडी
आला धांवून तांतडी महादेव ३२

कुक्कुट मर्कुट महानंदेनं पाळीले
भद्रसेनेकडे आले पुत्र दोन्ही ३३

पतिव्रता मोठ्या पार्वती सावित्री
पवित्र धरित्री त्यांच्यामुळं ३४

योगिनी सावित्री यमापाशीं गेली
पति घेऊनियां आली स्वर्गांतूनी ३५

पतिव्रता सावित्री प्रविज्ञा करूनी गेली
पति घेऊनियां आली स्वर्गातूनी ३६

योगिनी सावित्री संतोषवी यमराणा
मागते चुडेदाना त्याचेपाशीं ३७

सासु-सासऱ्यांच्या आज्ञें गेली अरण्यांत
जाहलीं कृतार्थ दोघेंजणं ३८

यमाचे पाशांतून पति सोडवी सावित्री
जगतीं तिची कीर्ति नारी गाती ३९

पति असे पाशीं धैर्यं बसे त्याच्यापाशीं
नाहीं झाली गोष्ट अशी भू-मंडळीं ४०

सावित्री सावित्री जरी म्हणतील ओठ
सौभाग्या नाहीं तूट भूमंडळीं ४१

सावित्री सावित्री जरी म्हणतील नारी
त्यांचे या संवसारीं वज्रचुडे ४२

सावित्री सावित्री म्हणती ज्या नारी
मंगळसूत्र दोरी अक्षै त्यांची ४३

सावित्रीचें व्रत करील जी नारी
जन्म-सावित्री संसारीं होईल ती ४४

सावित्रीचें व्रत करावें पवित्र
ऐकावें चरित्र सावित्रीचें ४५

यमधर्माला आडवी पतिव्रता किती मोठी
अपूर्व केल्या गोष्टी सावित्रीनें ४६

सावित्रीचा महिमा अमर भूमंडळीं
अबला झाली बळी यमाहून ४७

सतीच्या प्रभावें काळहि मनीं खचे
नांव घ्या सावित्रीचें संसारांत ४८

रामाची ग सीता लक्ष्मणाची ग वयनी
दशरथाची पहिली ज्येष्ठ सून ४९

पांचा वरुषांचे राम अडचा वरुषांची सीता
धन्य तुझी दशरथा सून आली ५०

सीतेला सासुरवास कैकेयीनें केला
रामासारखा भ्रतार तिला नाहीं भोगूं दिला ५१

अहिल्या शिळा झाली गौतमाची कान्ता
रामरायें वनीं जातां उद्धरीली ५२

अहिल्या शिळा झाली पतीच्या श्रापानें
दशरथाच्या लेकानें उद्धरीली ५३

आश्चर्य आश्चर्य रामरायाच्या पायाचें
शिळेंतून वर येई रूप अहल्या सतीचें ५४

रामरायाच्या चरणाचा धुळीचा ग लागे कण
अहिल्या ग प्रगटली न लागतां एक क्षण ५५

राम लक्षुमण भरत शत्रुघ्न
चौघांमध्यें कोण राज्य करी ५६

राम लक्ष्मण गेले कीं काननांत
भरत मनांत दुःखीकष्टी ५७

रामसीता वनीं माय कैकेयी पाठवी
मनीं भरत आठवी नित्य त्यांना ५८

जटाधारी झाला निजतो सुखं भुई
भरत जणूं होई वनवासी ५९

नको म्हणे राज्य भरत कैकेयीला
बंधु नाहीं असा झाला जगत्रयीं ६०

नंदिग्रामीं राही सदा रामनाप जपे
तपश्चर्या घोर तपे भरत बंधु ६१

धन्य रे भरता धन्य रे तूं भाऊ
तुझी कीर्ति राहू चिरंजीव ६२

धन्य रे भरता धन्य रे तुझें मन
तुझ्या स्मरणें लोचन भरुन येती ६३

धन्य रे भरता धन्य रे तुझी भक्ती
आलेलं राज्य हातीं सोडिलें तूं ६४

धन्य रे भरता धन्य रे तुझी निष्टा
आलेलं राज्य हाता सोडीयेलं ६५

राम चाले रथीं लक्ष्मण चाले पायीं
एवढ्या पृथ्वीवर असा बंधु झाला नाहीं ६६

राम चाले वाटे लक्ष्मण झाडी खडे
असे बंधु झाले थोडे पृथ्वीवरी ६७

राम चाले वाटे लक्ष्मण झाडी कांटे
असे बंधु नाहीं कोठें संसारांत ६८

राम चाले वाटे लक्ष्मण झाडी पाला
असा बंधु नाहीं झाला भूमंडळीं ६९

दा. क्र. ६२०.२१

राम चाले वाटी लक्ष्मण झाडी माती
असे बंधु झाले किती कोणी सांगा ! ७०

राम सीता वनीं लक्ष्मण फळें आणी
असा बंधु त्रिभुवनीं भाग्यें भेटे ७१

रामकुंडावरी हिरवा मंडप जाईचा
आंघोळीला आला पुत्र कौसल्याबाईचा ७२

रामाच्या आंघोळीला पाणी नाहीं विसाणाला
अमृताचे झरे लाविले ग पाषाणाला ७३

रामकुंडावरी रामरायाची आंघोळी
सांवळी सीताबाई तेथें काढीते रांगोळी ७४

रामकुंडावरी रामराया संध्या करी
सांवळी सीताबाई अमृतानें तांब्या भरी ७५

रामकुंडावरी रामरायाची आरती
सभामंडपांत हात जोडून मारुती ७६

रामकुंडावरी कुंवारणींची झाली दाटी
परकर-चोळया वांटी सीताबाई ७७

रामकुंडावरी ब्राह्मणांची झाली दाटी
धोतरजोडे वांटी रामराया ७८

रामकुंडावरी सवाष्णींची झाली दाटी
हळदीकुंकू वांटी सीतादेवी ७९

रामकुंडावरी रामरायाची बिछाई
तेथें पाय चेपी सांवळी सीताबाई ८०

रामकुंडावरी रामरायाची बिछाई
तेथें विडा देते सांवळी सीताबाई ८१

रामाला आला घाम सीता पुसते घोळानें
पाहतसे तिच्या मुखा रामराया ग प्रेमानें ८२

रामराया आला घाम सीताबाई घाली वारा
पतिसंगतींत प्रेमें वनवास कंठी सारा ८३

रामरायाला पडसें सीता देते त्याला आलें
पंचवटीमध्यें त्यांचें पर्णकुटी घर झालें ८४

रामराया लावी जाई-मोगऱ्याचीं फुलें
सांवळी सीताबाई शिंपीतसे त्यांना जळें ८५

रामाला पुसते सीता पांखरांचीं नांवें
रामरायानें हसावें कौतुकानें ८६

सीता रागावली रानीं रुसून बैसली
रामरायें हसवीली स्पर्शमात्रें ८७

लक्षुमण आणी सितामाईला मोरपीसें
सांवळी सीताबाई त्यांचे करीतसे पंखे ८८

राम-लक्षुमण जसे मोतीयांचे बाण
मध्यें शोभे सूर्यपान सीताबाई ८९

राम-लक्षुमण मोतीयांची जोडी
मध्यें शोभते लालडी सीताबाई ९०

रामलक्षुमण जसे धनुष्याचे बाण
मध्यें लावण्याची खाण सीतादेवी ९१

राम-लक्षुमण जसे मोतीयांचे हार
शेवंती सुकुमार सीताबाई ९२

सीता वनवासी झाडांशीं सांगे गोष्टी
दुष्ट ग रावण तेथं टेवी पापी दृष्टी ९३

सोन्याच्या चोळीचा मोह सीतेला सूटला
कोण प्रपंचीं वीटला सर्व सुखा ९४

सीतेला लोभ जडे रामराया मोह पडे
होणार तें तें घडे ललाटीचें ९५

जटायु तो पक्षी रामासाटीं मेला
मरून धन्य झाला संसारांत ९६

शबरीचीं बोरें उष्टींमाष्टीं खाशी
तूं रे दिसशीं अधाशी रामराया ९७

शबरीचीं बोरें उष्टींमाष्टीं खाशी
शतजन्मांचा उपाशी रामराया ९८

शबरीचीं बोरें एकटा राम खाई
सीतेचें त्याच्याशीं मग गोड भांडण होई ९९

शबरीचीं बोरें अमृताहून गोड
कोण ठेविल त्यांना खोड त्रैलोक्यांत १००

शबरीचीं बोरें रामें मटकावीलीं
शबरी मुक्त केली संसारांत १०१

सीतेच्या शोधासाठीं रामानें दिली सरी
मारुति ग राया मग पडला विचारीं १०२

सीतेच्या शोधासाठीं रामानं दिली माळ
समुद्र लंघुनी गेलें अंजनीचें बाळ १०३

अशोकाचे खालीं सीता रडतसे
मारुती देतसे आश्वासन १०४

अशोकाचे खालीं सीताबाई शोक करी
हनुमंतें खूण दिली रामरायाची १०५

अशोकाचे खालीं सीतेची गळेसरी
तेथें मारुतीची फेरी रात्रंदीस १०६

अशोकाचे खालीं सीतेचा कमरपट्टा
तेथें मारुती झपाटा रात्रंदीस १०७

अशोकाचे खालीं सीताबाईचें कांकण
तेथें मारुती राखण रात्रंदिवस १०८

अशोकाचे खालीं सीताबाईची हो नथ
तेथें मारुतीचा पथ रात्रंदिवस १०९

अशोकीचीं फुलें शेंदरी रंगाचीं
फार आवडीचीं जानकीच्या ११०

अशोकाच्या झाडा फुलांचा नित्य बहर
सीतादेवीच्या डोळयांचा त्याला मिळतो पाझर १११

अशोकाचीं फुलें झुबके झुबके
पाहते कौतुकें दुःखी सीता ११२

अशोकाच्या झाडा सीता घाली पाणी
नेत्र येतात भरोनी रात्रंदीस ११३

अशोकवनाचीं कां हो सुकुमार फुलें
जानकीच्या नेत्रांतील पोसलीं तीं नित्यजळें ११४

अशोकवनींच्या फुलांना कां गोड वास
जानकीचा त्यांना लागे नित्य नित्य श्वासोच्छ्वास

अशोकवनांत फुलांचा सडा पडे
परंतु सीता रडे रात्रंदीस ११६

सागरावरतीं सेतु बांधीला बाणांचा
दशरथाच्या पुत्राचा पराक्रम ११७

सागरावरतीं सेतु बांधिला वानरीं
तुझ्यासाठीं ग सुंदरी सीताबाई ११८

राम टाकी शिळा परि बुडाल्या त्या तळीं
रामाच्या नांवाची शिळा परी तरे जळीं ११९

हसून मारुती म्हणे रामा रघुनाथा
देवा, तुमच्याहीपेक्षां तुमच्या नांवाची योग्यता १२०

रामाच्या नांवानें शिळा सिंधूंत तरती
आणि शिवाशंकराच्या विषवेदना थांबती १२१

रामाच्या नांवानें शिळा सागरीं तरती
संसारीं त्याच्या नांवें जडमूढ उद्धरती १२२

राम चाले वाटे लक्ष्मण झाडी वाळू
रामाचे बाण हळू लंकेवरी १२३

हस्ती झाले मस्त गगनीं उडे राख
रामाचे बाण लाख लंकेवरी १२४

हस्ती झाले मस्त गगनीं उडे वाळू
रामाचे बाण हळू लंकेवरी १२५

हस्ती झाले मस्त गगनीं उडती दगड
रामाचे बाण रगड लंकेवरी १२६

हस्ती झाले मस्त गगनीं उडे रेती
रामाचे बाण येती लंकेवरी १२७

हस्ती झाले मस्त गगनीं उडे चुना
रामाचे बाण पुन्हा लंकेवरी १२८

हस्ती झाले मस्त गगनीं उडे गोळा
रामाचे बाण सोळा लंकेवरी १२९

हस्ती झाले मस्त गगनीं उडे सूप
रामाचे बाण खूप लंकेवरी १३०

हस्ती झाले मस्त आकाशीं काळोख
रामाचे बाण लाख लंकेवरी १३१

हस्ती झाले मस्त गगनीं अंधार
रामाची बाणधार लंकेवरी १३२

हस्ती झाले मस्त गगनीं उडे माती
रामाचे बाण येती लंकेवरी १३३

इंद्रजित मारी लक्ष्मण ब्रह्मचारी
रडते त्याची नारी सुलोचना १३४

बारा वर्षं राही निराहार ब्रह्मचारी
म्हणून सौमित्र रावणाच्या पुत्रा मारी १३५

मारिला इंद्रजित दिलो दऊत लेखणी
लक्ष्मणें घात केला भुजा दाखवी लिहूनी १३६

रामाचें हृदय कठिण वज्राचें
अग्नींत सीतेचें सत्त्व पाही १३७

रामाचें हृदय जणूं कठिण पाषाण
फूल आगींत घालून बघतसे १३८

पुष्पक विमानीं रामाच्या जवळी
शोभली सांवळी सीताबाई १३९

सांवळी जानकी रामरायाच्या मांडीवरी
सीतेच्या तोंडावरी प्रसन्नता १४०

भरता भेटला भेटला हृदयाला
रामरायानें न्हाणीला नेत्रजळें १४१

भरताच्या पाठीवर राम फिरवीतो हात
बारा वरसांचे कष्ट दूर केले १४२

बारा वरसांनीं कौसल्या भेटे रामा
हृदयीं दाटे प्रेमा माउलीच्या १४३

कौसल्या माउली रामाला धरी पोटीं
उमटेना शब्द ओठीं कांहीं केल्या १४४

वाजंत्रीं वाजती वाजती माळावर
राज्य-अभिषेक कौसल्येच्या बाळावर १४५

वाजंत्रीं वाजती चला सख्यांनो पहायाला
रामाची आरती जाते मारुतीरायाला १४६

राम-लक्ष्मण अर्धांगी सीता नारी
सेवेशीं ब्रह्मचारी मारुतिराय १४७

राम-लक्षुमण अर्धांगी सीता शोभे
सेवेशीं दास उभे मारुतिराय १४८

सतरंज्यांना ठसे लोडांना। आरसे
रामरायाच्या सभे बसे मारुतिराय १४९

सतरंज्यांना ठसे शोभती कमानी
रामरायाच्या दिवाणीं मारुतिराय १५०

शिंदेशाई तोडे सिताबाईच्या हातांत
रामरायाच्या रथांत उजेड पडे १५१

शिंदेशाई तोडे राम सीतेला देणार
रामरायाच्या रथांत त्याचा उजेड पडणार १५२

चला जाऊं पाहूं रामरायाची बैठक
शेजारीं रत्न टीक सीताबाई १५३

चला जाऊं पाहूं रामरायाची बिछाई
हासून विडा देई सीताबाई १५४

नदीपलीकडे कोणाची पालखी
रामरायाची जानकी उतरली १५५

मोठीं मोठीं मोतीं रामरायाच्या सद्र्याला
राणी मागते गजऱ्याला सीताबाई १५६

मोठीं मोठीं मोतीं रामरायाच्या कोटाला
राणी मागते गोटाला सीताबाई १५७

मोठीं मोठीं मोतीं . रामरायाच्या पगडीला
राणी मागते बुगडीला सीतादेवी १५८

शिंदेशाई तोडे सीताबाई कधीं केले
राम इंदूराला गेले जव्यांसाठीं १५९

शिंदेशाई तोडे राम सीतेला देणार
पंचवटीचे सोनार कारागीर १६०

मोठीं मोठीं मोतीं रामरायाच्या पलंगाला
राणी मागे लवंगाला सीतादेवी १६१

मोठीं मोठीं मोतीं रामरायाच्या जोड्याला
राणी मागते तोड्याला सीतादेवी १६२

राम रथामध्यें लक्ष्मुमण घोड्यावरी
मधून जाते डोली जानकीची १६३

सीतेला डोहाळे रामाला काय कळे
निंबीणी रस गळे शेल्यावरी १६४

सीतेला डोहाळे रामाला सांगावें
रुमालीं आणावे बाळआंबे १६५

सीता वनवासी दगडाची केली उशी
अंकुश बाळ कुशी वाढतसे १६६

सीता वनवासी दगडाची केली उशी
एवढ्या अरण्यांत तिला झांप आली कशी १६७

सीता वनवासी वनीं कंटकांची दाटी
पांचा महिन्यांचा अंकुश बाळ पोटीं १६८

सीता वनवासी दगडाची करी गादी
एवढ्या अरण्यांत तिला झांप आली आधीं १६९

सीता वनवासी दगडाची केली बाज
अंकुश बाळा नीज वनामध्यें १७०

पांच महिन्यांचा अंकुश असे पोटीं
घोर अरण्यांत सीतामाई केर लोटी १७१

बाणांमागें बाण बाण येती मागें-पुढें
रामाच्या बाणांचे लवांकुशां कडी-तोडे १७२

बाणामागें बाण बाण येती ग पीवळे
रामाशीं लढती लवांकुश ग कोवळे १७३

बाणामागें बाण बाण येती झराझरा
रामाच्या बाणांचा लवांकुशां कडदोरा १७४

सीतेला सासुरवास असा केला केसोकेसीं
सीता गेली निजधामा तिनें वांटला देशोदेशीं १७५

सीतेला सासुरवास असा केला परोपरीं
सीता गेली निजधामा तिनें वांटला घरोघरीं १७६

सीतेला वनवास कैकेयीनं नेली फणी
तिनं बारा वर्षं वेणी वर्ज्य केली १७७

सीतेला सासुरवास कैकेयीनं केला
बारा वर्षं दिला वनवास १७८

सीतेला डोहाळे कैकेयीनें केले
राम नाहीं दाखवीले बारा वर्षं १७९

सीता सांगे कथा आपुल्या कर्मांची
पापिष्टा रावणाची लंका जळली १८०

राम गेले वना मारिलं रावणा
राज्य दिलं बिभीषणा सोनियाचं १८१

सीता सांगे स्वप्न ऐक रे शहाण्या
सवतीवरी कन्या देऊं नये १८२

सीता सांगे स्वप्न ऐक मंदोदरी
राम लंकेवरी स्वार झाले १८३

सीता सांगे स्वप्न ऐक मंदोदरी
इंद्रजीत मारी लक्षुमण १८४

सीता सांगे स्वप्न ऐक मंदोदरी
राक्षस वानरीं संहारीले १८५

सीतेच्या शापानें डोंगर जळती
वानर म्हणती रामनाम १८६

सीतेच्या शापानें
तोंडें झालीं काळीं
लंकेची झाली होळी
वानरांचीं १८७

आधीं नमन करूं
मारुति हनुमंता
अंजनीच्या सुता
रामभक्ता १८८

आधीं नमन करूं
मग मारुतिरायाला
अंजनीबाईला
तिच्या पुत्रा १८९

अंजनीबाई म्हणे
द्रोणागिरी पर्वत
बाळ माझा बळीवंत
उचलीला १९०

घडींत आणीला
हनुमंत वंदू
पर्वताचा चेंडू
रामदूत १९१

मनाचाही वेग
लंकेला रागें रागें
मारुतीच्या मागें
जाळीतसे १९२

एकाच उडींत
जाऊन सीता वंदी
समुद्र ओलांडी
रामदूत १९३

रामाचा सेवक
विडा पिकल्या पानांचा
मारुतिराय तो मानाचा
सुकुनी गेला १९४

पहाटेच्या प्रहर रात्रीं
त्याचें दर्शन आहे घेणें
मला वेशीकडे जाणें
मारुतिरायाचें १९५

राम राम म्हणत
रामराया तुझा चेला
दारावरून कोण गेला
मारुतिराया १९६

राम राम म्हणुनी
रामराया तुझा चेला
नदींत कोण गेला
मारुतिराया १९७

माझा ग दयाळु
मारुतिरायाचा
वेशीच्या बाहेर उभा
शेंदरी लाल झगा १९८

रामाच्या बैसली
सेवेला ब्रह्मचारी
अर्धांगी सीता नारी
मारुतिराय १९९

धन्य ग यशोदा नेसली कशीदा
मांडीये मुकुंदा न्हाणयेलें २००

दैवाची यशोदा नेसली पीवळें
मांडीये सांवळें परब्रह्म २०१

दैवाची यशोदा नेसली शेलारी
बैसली श्रीहरी दूध पाजूं २०२

दैवाची यशोदा नेसली पातळ
मांडीये घननीळ नाचतसे २०३

कृष्णाची यशोदा नेसली जरतारी
मांडीये मुरारी दूध पीई २०४

यशोदेच्या निऱ्या कृष्ण धरून उभा राही
चंद्रमा म्हणे देई खेळावया २०५

गायींना चारीतो यमुनेच्या तटीं
भक्तांना संकटीं सांभाळीतो २०६

कृष्ण टाकी उडी कळंब कडाडला
शेष दणाणला पाताळांत २०७

कृष्ण उडी टाकी कळंबाच्या मेंजे
यमुने पाणी तूझें गढूळलें २०८

गाईगुरें चारी वाजवीतो पांवा
गोपाळकृष्ण ध्यावा गोकुळींचा २०९

खांदीये घोंगडी अधरीं धरीं पांवा
गोपाळकृष्ण गावा गोकुळींचा २१०

हातीं शोभे काठी गवळे संवगडी
खांदीये घोंगडी कृष्णजीच्या २११

मोरमुगुट माथां गळा वनमाळा
स्मरावा सांवळा गोकुळींचा २१२

गोपाळकाला करी यमुनेच्या तीरीं
होऊन गोवारी नंदजीचा २१३

दैवाचा तूं नंद धन्य दैवाची यशोदा
आनंदाच्या कंदा खेळवीलं २१४

ज्याच्या नांवें होतीं संसारांत मुक्त
यशोदा बांधीत त्याला दावें २१५

राक्षस संहारी काळीया विदारी
यशोदा त्याला मारी वेताटीनं २१६

तोंडांत दाखवी विश्व ब्रह्मांड सगळं
तेव्हां यशोदे कळलं बाळरूप २१७

कृष्णं काळीयाची मर्दीयेली फणी
काढीयेला मणी मस्तकींचा २१८

गोविंद गोविंद गोविंद ध्यानीं मनीं
गोविंद गोपांगणीं क्रीडा करी २१९

वाजवून पांवा वेध लावी सर्वां
गोपाळकृष्ण ध्यावा गोकुळींचा २२०

दहीं, दूध, लोणी चोरून वांटीतो
कौतुक करीतो बाळकृष्ण २२१

कां ग सखी तुझे डोळे लाल धुंद
काननीं गोविंद वाजवीतो २२२

गोवर्धनगिरी बोटानं उचली
वाढतो गोकुळीं कंस शत्रु २२३

गायी गोवर्धनीं चरती बारा रानं
पांवा जनार्दनं वाजवीला २२४

यशोदा म्हणते कृष्ण माझा वरसाचा
कसा तो गोरसाचा नाश करी २२५

कृष्णनाथ काळा जसा उडीदाचा दाणा
सोळा सहस्र गोपांगना भुलवील्या २२६

माझ्या दारावरुन रंगीत गाडी गेली
कृष्णानं राधा नेली गोकुळांत २२७

वाढतां वाढतां सुटे द्रौपदीची चोळी
गोविंद सांभाळी तिची लाज २२८

चतुर्भुज केली द्रौपदी निज सखी
भक्तांची लाज राखी भगवंत २२९

दोन हातीं वाढी दोन हातीं बांधी
सांवळी द्रौपदी मांडवांत २३०

राजसूय यज्ञीं दुर्जन हासले
चतुर्भुज देवें केलें द्रौपदीला २३१

राजसूय यज्ञीं द्रौपदीचं तुटे बिरडें
चतुर्भुज कीं गोविंदें तिला केलें २३२

जाहलें कौतुक टकमक पाहती
पाठीराखा कमळापति द्रौपदीचा २३३

पाठीची बहीण सुभद्रा होती जरी
प्रीती द्रौपदीच्या वरी गोविंदाची २३४

राजसूय यज्ञीं द्रौपदी वाढी मीठ
नथींतील टीक झळाळती २३५

राजसूय यज्ञीं द्रौपदी वाढी ताक
तिच्या दंडांतील वांक झळाळली २३६

राजसूत्र यज्ञीं द्रौपदी वाढी मठ्ठा
कमरेचा कम्मरपट्टा झळकला २३७

राजसूय यज्ञीं द्रौपदी वाढी भात
नाकांतील नथ झळकली २३८

राजसूय यज्ञीं
गळ्यांतील सरी
द्रौपदी वाढी खीरी
झळकली २३९

राजसूय यज्ञीं
हातांतील तोडे
द्रौपदी वाढी वडे
झळकले २४०

राजसूय यज्ञीं
कृष्णाचें पान कोणचें
द्रौपदी वाढी लोणचें
विचारींत २४१

राजसूय यज्ञीं
कृष्ण सांगे अर्जुनाला
घंटानाद झाला
शुकमहाराज आला २४२

राजसूय यज्ञीं
झाली गोपाळकृष्णाची
पूजा झाली ग कोणाची
गोविंदाची २४३

द्रौपदीमाई म्हणे
मायेचा कृष्णनाथ
नव्हे माझा सख्खा भाऊ
किती त्याची वाट पाहूं २४४

द्रौपदीमाई म्हणे
कौरवांच्या सभे दुष्ट
जळो देवा माझें जिणें
गांजीयेलें दुर्योधनें २४५

वस्त्र फेडी दुर्योधन
पाठीशीं दामोदर
पहिला पीतांबर
द्रौपदीच्या २४६

वस्त्र फेडी दुर्योधन
पाठीशीं चक्रपाणी
दुसरी पैठणी
द्रौपदीच्या २४७

वस्त्र फेडी दुर्योधन
पाठीशीं मुरारी
तिसरी वल्लरी
द्रौपदीच्या २४८

वस्त्र फेडी दुर्योधन
पाठीशीं सांवळा
चवथा ग शेला
द्रौपदीच्या २४९

वस्त्र फेडी दुर्योधन
पाठीशीं घननीळ
पांचवें अमोल
द्रौपदीच्या २५०

वस्त्र फेडी दुर्योधन
पाठीशीं कंसारी
सहावें जरतारी
द्रौपदीच्या २५१

वस्त्रं फेडुनीयां पापी चांडाळ दमला
कैवारी कृष्ण झाला द्रौपदीचा २५२

तुळशीपानांच्या लावील्या पत्रावळी
जेवीले वनमाळी द्वारकेंत २५३

देव भावाचा भुकेला विदुराच्या कण्या खातो
अर्जुनाचे घोडे धुतो नारायण २५४

देव भावाचा भुकेला विदुराच्या कण्या भक्षी
अर्जुनाचे घोडे रक्षी नारायण २५५

पांडवांचीं घरें सोनियाच्या भिंती
एवढ्या इमारती सोडून गेले रात्रीं २५६

चक्रव्यूहीं शिरे पुत्र प्रतापी पार्थाचा
भाचा प्रत्यक्ष कृष्णाचा अभिमन्यु २५७

चक्रव्यूहीं शिरे लाडका अर्जुनाचा
पति उत्तराबाईचा अभिमन्यु २५८

अभिमन्यु बाळ सिंहाचं ग पिलूं
लागले सारे पळूं कौरवांचे २५९

अभिमन्यु बाळ गरुडाचं पिलूं
लागले सारे पळूं कौरवांचे २६०

अभिमन्यु बाळ सर्व मिळून मारिती
अधर्मयुद्ध करिती द्रोणादीहि २६१

उत्तरेचा कंथ लढून पडला
पाय त्याला हो मारीला जयद्रथें २६२

गोविंद गोविंद मुखानें म्हणत
रणांत पडत अभिमन्यु २६३

गोविंद गोविंद मंजुळ मुखीं वाचा
पति पडे उत्तरेचा रणांगणीं २६४

दुरून दिसतो सोन्याचा कळस
कृष्ण-अर्जुनांचा रथ येत असे २६५

कळीचा नारद त्रैलोक्यांत हिंडे
दुष्टांचे धिंडवडे करीतसे २६६

कळीचा नारद उभारीतो शेंडी
विणा तो खाकुंडीं शोभे सदा २६७

कळीचा नारद उडते त्याची शेंडी
उच्चार सदा तोंडीं रामनामाचा २६८

कळीचा नारद त्याचं रूप कोणा कळे
दुष्टांचा गर्व गळे त्याच्यामुळें २६९

वाल्याचा वाल्मीकि नारदानें केला
असा कोण आहे संतीं नाहीं उद्धरीला २७०

तुळशी करूं पूजा तुळशीला आल्या शेंगा
पतिव्रता माझी गंगा उषाताई २७१

तुळशी ग बाई हिरवा तुझा पाला
सत्यभामेनं गोविंदाला दान दिलें २७२

तुळशीला पाणी घाली तुळस कांवळी
पुत्र मागते सांवळी उषाताई २७३

तुळशी ग बाई तुझा जन्म रानींवनीं
बैस अंगणांत जागा देतें वृंदावनीं २७४

तुळशीला पाणी घाली तुळशीखालीं बसे
प्रत्यक्ष गंगा दिसे मायबाई २७५

सकाळीं उठोनी तोंड पाहिलं एकीचं
माझ्या जिवाच्या सखीचं तुळशीबाईचं २७६

तुळस पिकली तिला आल्या शेंगा
तिला पाणी घाली माउली माझी गंगा २७७

तुळशी ग नाये  
तुझ्या मंजुळया झळकती  
तेथें कृष्णनाथ खेळती  
सारीपाट २७८

काशी काशी म्हणून  
लोक जाती ग धांवत  
काशी माझ्या अंगणांत  
तुळसादेवी २७९

तुळशी ग बाई  
तुझे वाळून झाले फांटे  
पलंगाला केली गातें  
गोविंदाच्या २८०

तुळशी ग माई  
हिरवा तुझा पाला  
शेल्याला रंग दिला  
भाईरायांनीं २८१

तुळशी ग बाई  
तुझीं कातर कातर पानें  
येतां जातां गोविंदानें  
विडा नेला २८२

काशी कांशी म्हणुनी  
लोक जाती दुरी  
काशी माझ्या घरीं  
तुळसादेवी २८३

संध्याकाळ झाली  
वाजले ते सात  
तुळशीला हात  
जोडीयेले २८४

## प्रकरण सहावें

# तीर्थक्षेत्रें, पुरेंपट्टणें

### रसपरिचय

महाराष्ट्रांतील सर्वांत थोर नगरी कोणती? जेथें साधुसंतांनीं प्रेमाचा पाऊस पाडला ती विठूची पंढरपुरी. पंढरपुराचें वर्णन करतां करतां बायकांना जणूं उचंबळून येत आहे. पंढरपुरास जावें, भीमेच्या, त्या चंद्रभागेच्या तीरावर क्षणभर उभें राहावें आणि मुक्त व्हावें :

जाऊं ग पंढरी उभी राहूं ग भीवरी
तेणें मुक्ती चारी येती हातीं

पंढरपुरांतील आषाढी-कार्तिकीचा सोहळा कोण वर्णन करील? परंतु ही थोडी चव घ्या :

पंढरपुरांत विण्याशीं वीणा दाटे
साधूला संत भेटे वाळवंटीं
वीण्याला लागे वीणा दिंडीला भेटे दिंडी
यात्रेला येती झुंडी पंढरीस
टाळ-मृदंगांचा विठूच्या नामाचा
गजर पुण्याचा पंढरींत

आषाढीची यात्रा जमावी, प्रेमाचा पूर यावा, परंतु अशाच वेळीं एखादे वेळेस प्रचंड पाऊस पडून चंद्रभागेस पूर यावा. मग कोण गडबड! कोणी नारळ फोडतात, कोणी पाणी उतरावें म्हणून लिंबू फेकतात :

भरली चंद्रभागा नाव निघाली बुडाया
नेला नारळ फोडाया रखुमाईला
भरली चंद्रभागा लिंबू टाका उताऱ्याला
जाणें आहे साताऱ्याला भाईरायाला

•

परंतु पूर ओसरत नाहीं. पाण्याचा लाटा आपटत असतात. इतरांची गोष्ट दूरच राहो; परंतु प्रत्यक्ष विठोबाचाहि टाळ-वीणा भिजतो, रखुमाईची चोळी शेवटीं उंचावर वाळत घालण्यांत येते :

**भरली चंद्रभागा पाणी करी सणासणा**
**भिजला टाळवीणा विठ्ठलाचा**
**भरली चंद्रभागा पाणी लागलं भिंतीला**
**चोळी वाळते खुंटीला रखुमाईची**

पंढरपुरांत फुलांना तोटा नाहीं. तुळशीच्या बागा, झेंडू, जिकडे तिकड फुलेंच फुलें :

**पंढरीसी जातां पंढरी लाललाल**
**पेरिली मखमल विठ्ठलाची**
**पंढरीसी जातां पंढरी हिरवीगार**
**तुळशीला आला भर विठ्ठलाच्या**

माळणी विठोबाला व रखुमाईला फुलांचे शृंगारसाज करतात:

**पंढरपुरांत माळिणी ठमा रमा**
**फुलांचा पायजमा विठ्ठलाला**
**पंढरपुरांत माळिणी उंच काठी**
**फुलांची चिंचपेटी रखुमाईला**

पंढरपुरांतील सर्वच वस्तु पवित्र. अणुरेणु पवित्र. बायका म्हणतात, "पंढरपुरांतील वस्तूंचीं रूपें आम्हांला धारण करूं देत":

**पंढरपुरींची होईन वेळणी**
**वाढीन साखरफेणी विठ्ठलाला**
**पंढरपुरींची होईन परात**
**वाढीन साखरभात विठ्ठलाला**

मला परात होऊं दे, वेळणी होऊं दे, गड्डू होऊं दे, मला पक्षी होऊन शिखरावर बसूं दे, पायरी होऊन संतांच्या पायांच्या धुळीनें पवित्र होऊं दे. सारें जीवन जणूं सेवेचें साधन व्हावें अशी उत्कटता या ओव्यांत आहे.

पंढरपुरींचा होईन खराटा
झाडीन चारी वाटा विठ्ठलाच्या

विठोबा-रखुमाईच्या संसाराचें वर्णन आहे. विठोबा बाजार करायला जातो; परंतु साधुसंत भेटतात. तो लौकर कसचा येतो?

विठोबाला रात्र झाली पंढरीच्या बाजारांत
रुक्मिणी दरवाजांत वाट पाहे

विठोबाला उपवास असावा. रखुमाई राणी त्याला फराळासाठीं पेढे नेते, अशी गंमत आहे.

त्या विठ्ठलाशिवाय आम्हांला कोणाचा आधार? तो विठोबाच सारें कांहीं:

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
बहीण चंद्रभागा पुंडलीक माझा भाई

असें हें नातें स्त्रियांनीं जोडलें आहे.

पंढरपुराला जाण्याचा रस्ता नीट ठेवावा. परंतु एखादा रस्त्यांतून खणून माती नेतो. खळगे पडतात. गाड्या उलटतात:

पंढरीची वाट कोणा पाण्यानें नांगरीली
गाडी बुक्क्याची उधळली विठ्ठलाची

पंढरपूरचा जसा महिमा, तसाच कोल्हापूरच्या अंबाबाईचाहि:

चला जाऊं पाहूं कोल्हापुरीं राहूं
ओंवियांत गाऊं अंबाबाई

अंबाबाईच्या देवळाभोंवतीं सर्व कारागिरांची वस्ती. तेथें तांबट आहेत, सोनार आहेत; दागिने पटवणारे पटवेकरी आहेत. विणकरहि सभोंवतीं आपले माग चालवीत आहेत. व अंबाबाईचा पीतांबर विणीत आहेत. शहराच्या बुरुजांवर तोफा आहेत, दरवाजाजवळ अंबाबाई रक्षणार्थ बसली आहे:

कोल्हापूर शहरीं बुरुजाबुरुजा भांडीं
वेशीच्या पहिल्या तोंडीं अंबाबाई

पुण्याच्या पर्वतीचें वर्णन नंतर दिलें आहे. पुढील प्रसिद्ध ओंवी सर्वांस माहिती आहे:

येथून नमस्कार पुण्याच्या पर्वतीला
दुष्टांच्या संगतीला लागूं नये

कोणी बांधली ही पर्वती? तिचे सोन्याचे कळस कोणी केले?

पर्वती पर्वती तिला कळस सोन्याचे
प्रिय दैवत पेशव्यांचें नवें झालें

आणि ती तुळशीबाग!

चला जाऊं पाहूं तुळशीबागेचा सांवळा
नित्य पोषाक पिंवळा रामरायाचा

मैत्रिणी जमलेल्या असाव्यात; आपापल्या गांवांहून त्या आलेल्या असतात. कोणी वाईची, कोणी पुण्याची, कोणी साताऱ्याची, कोणी कोल्हापुरची. मग आपापल्या गांवाची बढाई त्या सांगतात. वाईवाली म्हणते:

काय सांगूं बाई वाई देशाची बढाई
तटाखालून कृष्णाबाई वाहतसे
काय सांगूं वाई वाई देशाची रचना
हिरे जडले सिंहासना कृष्णाबाईच्या
पुणें झालें जुनें वाईला बारा पेठा
सवाई झेंडा मोठा कृष्णाबाईचा

परंतु सातारकरणि काय म्हणते ऐका:—

पुणें झालें जुनें सातारा नित्य नवा
जळमंदिराची हवा चला घेऊं

साताऱ्याजवळ समर्थांचा सज्जनगंड, ती माहुली, तेथील ती कुऱ्याची समाधि, तेथील अहिल्याबाईनें बांधलेलें मंदिर! साताऱ्याची सर कोणाला येईल?

परंतु कोल्हापूरची म्हणते:

पुण्याची थोरवी सातारा नुरवी
सर्वांना हारवी कोल्हापूर

आणि ती इंद्रायणीच्या तीरावरची आळंदी!

आळंदीला जावें जीवें जीवन्मुक्त व्हावें
तेथें श्रीज्ञानदेवें दिव्य केलें

तसेंच तें देहू गांव; ही गोड ओंवी ऐका:

देहूला जाऊन देह विसरावा
अंतरीं स्मरावा तुकाराम

देहूचें भाग्य कोंणी वर्णावें ? तेथील अणुरेणूंतूनसुद्धां 'विठ्ठल विठ्ठल' आवाज येत असेल:

देहूचा अणुरेणु गर्जे विठ्ठल विठ्ठल
लोकां उद्धरील क्षणामाजीं

आणि कोंकणांतील तें परशुरामाचें देवस्थान! तेथील ती पाखाडी, ती चढायला कठीण असलेली चढण. आई मुलाला म्हणते :

भार्गवराम देवाजीची पायठणी अवघड
येथून पायां पड गोपू बाळा

त्या देवळाला चुना किती लागला, उत्सवांत जेवण्याचे वेळेस सार करतांना चिंच किती लागते, याचीं गमतीवर वर्णनें आहेत:

तिन्ही देवांमध्यें भार्गवराम उंच
सव्वाखंडी चिंच उत्सवाला
तिन्ही देवांमध्यें भार्गवराम जुना
सव्वाखंडी चुना देवळाला

असा हा भार्गवराम; त्याच्या पूजेला रोज कस्तुरी. आणि एक सखी म्हणते :

कस्तुरीचा वास माझ्या ओंच्याला कुठूनी
आल्यें सख्याला भेटूनी भार्गवरामा

आणि हिंदुस्थानच्या दक्षिणेकडचा तो रामेश्वर— त्याचें एका ओंवींतील वर्णन वाचा :

देवांमध्यें देव रामेश्वर अति काळा
त्याच्या दोंदावर रुद्राक्षांच्या रुळती माळा

चिंचवड, नरसोबाची वाडी, खंडोबा यांचींहि वर्णनें आहेत:

खोबऱ्याच्या वाट्या हळदी भरल्या
देव भंडारा खेळला जेजूरीचा

कोंकणांतील राजापूरच्या गंगेचेंहि वर्णन करणाऱ्या किती तरी ओंव्या आहेत :

गंगाबाई आली तळकातळ फोडून
राजापुराला वेढून वस्ती झाली

आणि प्रसिद्ध मुंबापुरी. तेथील ती मुंबादेवी :

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची कंबर
निरी पडली शंभर पैठणीची

मुंबईच्या व्यापाराचें वैभव वर्णिलेलें आहे :

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पायरी
सव्वा लक्ष तारू उभें कोटाच्या बाहेरी

परंतु मुंबई नवीन चालीरीतीची होते. सुधारणा येतात :

मुंबई मुंबई सारी मुंबई रांगडी
केरव्यावांचून कोणी भरेना बांगडी

साऱ्या बायकांना केरवा हातांत हवा; परंतु आज केरवाहि मागासला. आतां रेशमी बांगडी हवी. आणि मुंबईच्या नळांवरची ही टीका ऐका. कोंकणांत लांब असलेल्या विहिरीवरून ज्यांना पाणी आणावें लागतें अशा बायकांनीं ही ओंवी रचिली असावी :

मुंबईच्या बायका आहेत आळशी
नळ नेले चुलीपाशीं इंग्रजांनीं

इंग्रजांच्या कर्तृत्वाचें हें वर्णन आहे :

मुंबई शहरांत घरोघरीं नळ
पाण्याचे केले खेळ इंग्रजांनीं

बडोदें शहराच्या कांहीं गमतीदार ओंव्या मिळाल्या. कोणत्याहि शहरांत नवीन रचना करायची असली म्हणजे पाडापाड करावी लागते; जुनीं घरें पाडावीं लागतात. नवीन रस्ते करावे लागतात; लोकांना नुकसानभरपाई दिली तरी ते असंतुष्ट असतात. आणि बायकांना तर जुनें घरदार जाणें म्हणजे फार

वाईट वाटतें. इतकी वर्षें सांभाळलेलें नष्ट व्हावें याचा त्यांना राग येतो. बडोदें शहरांत सुंदर प्रशस्त रस्ते आहेत; परंतु कोणी तरी बाई कुरकुर करते :

बडोदें शहरांत पाडीलें जुने वाडे
मोठ्या ग रस्त्यांसाठीं नवे लोक झाले वेडे
राणीच्या हातींचा राजा झाला ग पोपट
वाडे पाडून बडोद्या रस्ते केले ग सपाट

परंतु कांहींनीं अशी कुरकुर केली, तर कांहींना या गोष्टीचा अभिमान वाटतो :

बडोदें वाढलें रस्ते नि इमारती
डोळे दिपवीती पाहणारांचे

या ओंवींत जरा उपहासहि आहे का? बडोदें वाढलें; रस्ते नि सुंदर इमारती वाढल्या; परंतु माणसांचीं मनें वाढलीं का? मोठ्या रस्त्यांवरून हिंडणारांचीं, मोठे रस्ते करणारांचीं मनें मोठीं झालीं का? एक बाई म्हणते "हो" :

सयाजीराव महाराज बडोद्याचे धनी
राज्यकर्ते अभिमानी जनतेचे

जनतेचा अभिमान धरणारे श्रीसयाजीराव आहेत :

बडोदें शहरांत वडांची थंड छाया
प्रजेवर करती माया सयाजीराव

वटवृक्षाच्या शीतळ छायेप्रमाणें महाराज प्रजेवर छाया करतात असें हें वर्णन आहे.

अनेक तीर्थक्षेत्रांचें एकेका ओंवींत वर्णन आहे. आणखीहि ओंव्या असतील; परंतु मला थोड्याशा मिळाल्या. कोंकणाचें हें वर्णन ऐका :

समुद्राच्या कांठीं कोंकण वसलें
कृष्ण-अर्जुन बैसले रथावरी

समुद्राच्या कांठीं कोंकण वसलें
सुखानें हासले नारळींत

नारळी-पोफळीच्या छायेंत कोंकण सुखानें हसत आहे. आणि समुद्रांतले व डोंगरावरचे ते पहारा करणारे किल्ले :

कोंकणपट्टीचा रत्नागिरी जिल्हा
जळीं स्थळीं किल्ला पहारा करी

आणि मुंबई व अलीबाग यांच्यामध्यें आलेल्या खांदेरी-उंदेरींचें हें वर्णन वाचा :

खांदेरी उंदेरी या दोघी जावा जावा
मध्यें ग कुलाबा हवा घेई

अशीं हीं वर्णनें आहेत. अशा शेंकडों ओंव्या असतील. परंतु त्यांचा संग्रह कोण करणार ?

## तीर्थक्षेत्रें, पुरेंपट्टणें : ओंव्या

पंढरीसी जातां पंढरी पीवळी
आंत मूर्त सांवळी विठ्ठलाची १

पंढरपुरा जाऊं भेटीला काय नेऊं
तुळशी बुक्क्याची विठ्ठला प्रीत बहु २

जाऊं ग पंढरी उभी राहूं ग भीवरी
तेणं मुक्ति चारी येती हातीं ३

पंढरीचा राणा चला पाहायाला जाऊं
संसारांत होऊं कृतकृत्य ४

पंढरपुरांत होतो नामाचा गजर
नादानें अंबर कोंदतसे ५

पंढरपुरांत आषाढी कार्तिकी
सोहळा त्रैलोक्यीं असा नाहीं ६

पंढरपुरांत विण्याशीं वीणा दाटे
साधूला संत भेटे वाळवंटीं ७

वीण्याला लागे वीणा दिंडीला भेटे दिंडी
यात्रेला येती झुंडी पंढरीस ८

टाळ-मृदंगाचा विठूच्या नामाचा
गजर पुण्याचा पंढरींत ९

पंढरपुरींचा घेऊन जाऊं बुक्का
संसारींच्या दुःखा दूर करूं १०

पंढरपुरींच्या घेऊन जाऊं लाह्या
येतील आया-बाया त्यांना देऊं ११

पंढरपुरांत कसला गलबला
चंद्रभागे पूर आला वाट नाहीं १२

भरली चंद्रभागा बुडाले हरिदास
पितांबराची घाली कास पांडुरंग १३

भरली चंद्रभागा नाव निघाली बुडाया
नेला नारळ फोडाया रखुमाईला १४

भरली चंद्रभागा लिंबू टाका उताऱ्याला
जाणें आहे साताऱ्याला भाईरायाला १५

भरली चंद्रभागा उतार दे ग माये
पैलाड जाणं आहे भाईरायाला १६

भरली चंद्रभागा पाणी करी सणासणा
भिजला टाळवीणा विठ्ठलाचा १७

भरली चंद्रभागा पाणी लागलें भिंतीला
चोळी वाळते खुंटीला रखुमाईची १८

पंढरपुरांत कसला गलबला
सत्यभामेनें गोविंदाला दान केलें १९

पंढरीसी जातां पंढरी लाल लाल
पेरली मखमल विठ्ठलाची २०

पंढरीसी जातां पंढरी हिरवीगार
तुळशीला आला भर विठ्ठलाच्या २१

पंढरीसी जातां उभी राहील खांबाशीं
चुडे मागेल देवाशीं विठ्ठलाशीं २२

गुलाबाचीं फुलें रुपयाला बारा
हारतुरे गजरे करा विठोबाला २३

पंढरपुरांत माळिणी ठमा रमा
फुलांचा पायजमा विठ्ठलाला २४

पंढरपुरांत माळिणी उंच काठी
फुलांची चिंचपेटी रखुमाईला २५

माळयाच्या मळयांत माळिणी गाणीं गातीं
पूजेला तुळशी नेती विठ्ठलाच्या २६

रुसली रखुमाई बैसली वाळवंटीं
धरिली मनगटीं विठ्ठलानें २७

चला जाऊं पाहूं खिडकीं उभ्या राहूं
पालखी येते पाहूं विठ्ठलाची २८

कोठें ग जातसां जातसां लवलाहीं
विठ्ठल-रखुमाई पहावया २९

कोठें ग जातसां जातसां लगबगा
भरली चंद्रभागा बघावया ३०

पंढरपुरांत रखुमाई सुगरीण
पापड तिनं केले चंद्रासारखी घडावण ३१

पंढरपुरांत कशाचा वास येतो
कस्तुरीचं माप घेतो भाईराया ३२

पंढरपुरांत काय मौज पाहायाची
हंडी फुटली दह्याची गोकुळांत ३३

पंढरपुरामध्यें दुकानें गोळा केलीं
रथाला जागा दिली विठ्ठलाच्या ३४

पंढरपुरांत काय बुक्क्याची धारण
पुसे बंगल्यावरून रखुमाबाई ३५

पंढरपूरची होईन वेळणी
वाढीन साखरफेणी विठ्ठलाला ३६

पंढरपुरींची होईन परात
वाढीन साखरभात विठ्ठलाला ३७

पंढरपुरींचा होईन मी गडू
वाढीन ग लाडू विठ्ठलाला ३८

पंढरपुरींची होईन मी घार
तुपाची वाढीन धार विठ्ठलाला ३९

पंढरपुरींचा होईन कावळा
बैसेन राऊळा विठ्ठलाच्या ४०

पंढरपुरींची होईन पायरी
येतां जातां हरी पाय ठेवी ४१

पंढरपुरींचा होईन खराटा
झाडीन चारी वाटा विठ्ठलाच्या ४२

पंढरपुरींची होईन पोफळी
सुपारी कोंवळी विठोबाला ४३

विठोबाला रात्र झाली पंढरीच्या बाजारांत
रुक्मिणी दरवाजांत वाट पाहे ४४

विठोबाला एकादशी रखुमाई माडी चढे
तबकीं आणी पेढे फराळाला ४५

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
मला पंढरीसी नेई कृष्णाबाई ४६

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
बहीण चंद्रभागा पुंडलीक माझा भाई ४७

मजला नाहीं कोणी तुजला आहेरे माहीत
यावें गरुडासहित पांडुरंगा ४८

माझ्या धांवण्याला कोण धांवेल दूरचा
राजा पंढरपूरचा पांडुरंग ४९

विठोबा माझा बाप माहेर माझें करी
पिंजरेनें ओटी भरी रखुमाबाई ५०

विठोबा माझा बाप रखुमाई माझी आई
त्या नगरीचें नांव काई पंढरपूर ५१

पंढरीची वाट कोण्या पाण्यानं नांगरीली
गाडी बुक्क्याची उधळली विठ्ठलाची ५२

समुद्र आटला मासा करपला
शेला झळकला विठ्ठलाचा ५३

भाजी घ्या भाजी घ्या भाजी घ्या माठाची
आली गवळण थाटाची मथुरेची ५४

भाजी घ्या भाजी घ्या भाजी घ्या मेथीची
आली गवळण प्रीतीची द्वारकेची ५५

दहीं घ्या दहीं घ्या दहीं घ्या गोड गोड
आली गवळण गोड गोकुळींची ५६

चला जाऊं पाहूं कोल्हापुरीं राहूं
ओंवियांत गाऊं अंबाबाई ५७

कोल्हापूर शहर भोंवतीं सोनार
घडवीती चंद्रहार अंबाबाईचा ५८

कोल्हापूर शहर भोंवतीं तांबट
नवं घडवीती ताट अंबाबाईला ५९

कोल्हापूर शहर भोंवतीं पटवेकरी
पटवीली गळेसरी अंबाबाईची ६०

कोल्हापूर शहर भोंवतीं विणकर
विणीती पीतांबर अंबाबाईचा ६१

कोल्हापूर शहर पाण्याच्या डबक्यांत
फुलांच्या झुबक्यांत अंबाबाई ६२

कोल्हापूर शहर विंचवांचें तळें
वस्ती केली तुझ्यामुळें अंबाबाई ६३

कोल्हापूर शहर दुरून दिसे मनोहर
पांच शिखरें ल्हानथोर अंबाबाईचीं ६४

येथून नमस्कार महादरवाजासन्मुख
माझी विनंति आईक अंबाबाई ६५

येथून नमस्कार महादरवाजापासून
आली रथांत बैसून अंबाबाई ६६

कोल्हापूर शहरीं बुरुजा बुरुजा भांडीं
वेशीच्या पहिल्या तोंडीं अंबाबाई ६७

येथून नमस्कार पुण्याच्या पर्वतीला
दुष्टांच्या संगतीला लागूं नये ६८

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
हिराबागेची शेवंती फुलूनी गेली ६९

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
तेथून कृपा करीती देवदेव ७०

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
धरण बांधिलें खालती इंग्रजांनीं ७१

पर्वती पर्वती पर्वतीचा रमणा
दक्षिणा विद्वानांना वांटतात ७२

पर्वती पर्वती तिला कळस सोन्याचे
प्रिय दैवत पेशव्यांचें नवें झालें ७३

| | | |
|---|---|---|
| येथूनी नमावी<br>दुष्टांच्या ग संगीं | पुण्याची चतुःशृंगी<br>लागूं नये | ७४ |
| चला जाऊं पाहूं<br>नित्य पोषाख पीवळा | तुळशीबागेचा सांवळा<br>रामरायाचा | ७५ |
| चला जाऊं पाहूं<br>जिवाला आराम | तुळशीबागेंतला राम<br>संसारांत | ७६ |
| पुणें झालें जुनें<br>सवाई झेंडा मोठा | वाईला बारा पेठा<br>कृष्णाबाईचा | ७७ |
| काय सागूं बाई<br>तटाखालून कृष्णाबाई | वाई देशाची बढाई<br>वाहतसे | ७८ |
| काय सांगूं बाई<br>हिरे जडले सिंहासना | वाई देशाची रचना<br>कृष्णाबाईच्या | ७९ |
| पुणें झालें जुनें<br>जळमंदिराची हवा | सातारा नित्य नवा<br>चला घेऊं | ८० |
| जाईन साताऱ्या<br>चढण नाहीं अवघड | पाहीन सज्जनगड<br>माणसाला | ८१ |
| जाईन साताऱ्या<br>पाहीन कावड | पाहीन सज्जनगड<br>कल्याणस्वामींची | ८२ |
| जाईन साताऱ्या<br>तेथं वाहते माउली | पाहीन माहुली<br>कृष्णाबाई | ८३ |
| जाईन साताऱ्या<br>तेथं ग कुऱ्याची | माहुली पाहीन आधीं<br>आहे पवित्र समाधी | ८४ |
| जाईन साताऱ्या<br>संगमीं न्हाईन | माहुली पाहीन<br>कृष्णाबाईच्या | ८५ |
| जाईन साताऱ्या<br>देवी अहिल्याबाईनें | मी ग माहुली पाहीन<br>मंदीर ठेवीलें बांधून | ८६ |

कोल्हापूर शहर भोंवतीं विणकर
विणीती पीतांबर अंबाबाईचा ६१

कोल्हापूर शहर पाण्याच्या डबक्यांत
फुलांच्या झुबक्यांत अंबाबाई ६२

कोल्हापूर शहर विंचवांचं तळं
वस्ती केली तुझ्यामुळं अंबाबाई ६३

कोल्हापूर शहर दुरून दिसे मनोहर
पांच शिखरं ल्हानथोर अंबाबाईचीं ६४

येथून नमस्कार महादरवाजासन्मुख
माझी विनंति आईक अंबाबाई ६५

येथून नमस्कार महादरवाजापासून
आली रथांत बैसून अंबाबाई ६६

कोल्हापूर शहरीं बुरुजा बुरुजा भांडीं
वेशीच्या पहिल्या तोंडीं अंबाबाई ६७

येथून नमस्कार पुण्याच्या पर्वतीला
दुष्टांच्या संगतीला लागूं नये ६८

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
हिराबागेची शेवंती फुलूनी गेली ६९

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
तेथून कृपा करीती देवदेव ७०

पर्वती पर्वती साऱ्या पुण्याच्या वरती
धरण बांधिलं खालती इंग्रजांनीं ७१

पर्वती पर्वती पर्वतीचा रमणा
दक्षिणा विद्वानांना वांटतात ७२

पर्वती पर्वती तिला कळस सोन्याचे
प्रिय दैवत पेशव्यांचं नवं झालं ७३

दा. क्र.


| | | |
|---|---|---|
| येथूनी नमावी<br>दुष्टांच्या ग संगीं | पुण्याची चतुःशृंगी<br>लागूं नये | ७४ |
| चला जाऊं पाहूं<br>नित्य पोषाख पीवळा | तुळशीबागेचा सांवळा<br>रामरायाचा | ७५ |
| चला जाऊं पाहूं<br>जिवाला आराम | तुळशीबागेंतला राम<br>संसारांत | ७६ |
| पुणें झालें जुनें<br>सवाई झेंडा मोठा | वाईला बारा पेठा<br>कृष्णाबाईचा | ७७ |
| काय सागूं बाई<br>तटाखालून कृष्णाबाई | वाई देशाची बढाई<br>वाहतसे | ७८ |
| काय सांगूं बाई<br>हिरे जडले सिंहासना | वाई देशाची रचना<br>कृष्णाबाईच्या | ७९ |
| पुणें झालें जुनें<br>जळमंदिराची हवा | सातारा नित्य नवा<br>चला घेऊं | ८० |
| जाईन साताऱ्या<br>चढण नाहीं अवघड | पाहीन सज्जनगड<br>माणसाला | ८१ |
| जाईन साताऱ्या<br>पाहीन कावड | पाहीन सज्जनगड<br>कल्याणस्वामींची | ८२ |
| जाईन साताऱ्या<br>तेथं वाहते माउली | पाहीन माहुली<br>कृष्णाबाई | ८३ |
| जाईन साताऱ्या<br>तेथं ग कुऱ्याची | माहुली पाहीन आधीं<br>आहे पवित्र समाधी | ८४ |
| जाईन साताऱ्या<br>संगमीं न्हाईन | माहुली पाहीन<br>कृष्णाबाईच्या | ८५ |
| जाईन साताऱ्या<br>देवी अहिल्याबाईनं | मी ग माहुली पाहीन<br>मंदीर ठेवीलें बांधून | ८६ |

जाईन साताऱ्या पाहीन सज्जनगड
समर्थांची ग समाधी पाहून तरती दगड ८७

पुण्याची थोरवी सातारा नुरवी
सर्वांना हारवी कोल्हापूर ८८

आळंदीला शोभा इंद्रायणीच्या पुळानें
समाधी घेतली बारा वर्षांच्या मुळानें ८९

आळंदीला आहे भिंत सामक्षेला
सांगते सर्वांला गर्व नको ९०

आळंदीला जावें जीवें जीवन्मुक्त व्हावें
तेथें श्रीज्ञानदेवें दिव्य केलें ९१

देहूला जाऊन देह विसरावा
अंतरीं स्मरावा तुकाराम ९२

देहूला जाऊन देह विसरूं या
ओंविया गाऊं या तुकाराम ९३

देहूला राखीले पाण्यांत अभंग
अभंग भक्तिरंग तुकोबांचा ९४

देहूचा अणुरेणु गर्जे विठ्ठल विठ्ठल
लोकां उद्धरील क्षणामाजी ९५

चिंचवड क्षेत्रीं मोरया गोसावी
त्याची ओवी गावी विसरूं नये ९६

आधीं नमन करूं चिंचवडींच्या मोरया
सुरूच्या समया तेवताती ९७

सहज मी उभी होत्यें मनांत ये कल्पना
नित्य जावें दर्शना मोरयाच्या ९८

भार्गवराम देवाजीची पायठणी अवघड
येथून पायां पड गोपूबाळा ९९

वाजंत्रीं वाजती बाणगंगेच्या धक्क्यावरी
परशुराम सख्यावरी अभिषेक १००

दिंडी-दरवाजानें भार्गवराम येतो जातो
शुक्रवारीं वाजा होतो चौघड्याचा १०१

दिंडी दरवाजानें भार्गवराम येतो जातो
नळ सोडून पाणी घेतो संध्येसाठीं १०२

रेणुकामाईचा भार्गवराम तान्हा
सभामंडपीं पाळणा बांधीयेला १०३

तिन्ही देवांमध्यें भार्गवराम उंच
सव्वा खंडी चिंच उत्सवाला १०४

तिन्ही देवांमध्यें भार्गवराम काळा
त्याच्या गळां माळा रुद्राक्षांच्या १०५

तिन्ही देवांमध्यें भार्गवराम जुना
सव्वाखंडी चुना देवळाला १०६

भार्गवराम देव उभे कड्यावरी
निळ्या घोड्यावरी स्वार झाले १०७

अक्षय तृतीयेला उदकुंभ द्यावा
मनांत स्मरावा भार्गवराम १०८

अक्षय तृतीयेला जन्मले परशुराम
मातेला मारुनी पुरवीती पितृकाम १०९

एकवीस वेळां निःक्षत्री केली धरणी
अद्भुत वाटे करणी परशुरामाची ११०

केशर कस्तुरी बारा रुपये तोळा
श्रीमंत लावी टिळा भार्गवराम १११

कस्तुरीचा वास माझ्या ओच्याला कुटूनी
आलें सख्याला भेटूनी भार्गवरामा ११२

देवांमध्यें देव — रामेश्वर अतिकाळा
त्याच्या दोंदावर — रुद्राक्षांच्या रुळति माळा ११३

दिवसाची दिवटी — तेथें एवढा कोण राजा
कुळस्वामी देव माझा — पालखींत ११४

शेवंती फुलली — नऊशें पाकळी
शाळुंका झांकली — सोमेश्वराची ११५

आठा दिवसांच्या शनिवारीं — वाडी गांवाला चारी वाटा
श्रीपाद स्वामी माझा — वाडी गांवचा वैद्य मोठा ११६

संकटाच्या वेळे — कोण ग पावला
नवसाला आला — दत्तात्रेय ११७

आठा दिशीं आदितवार — नाहीं मजला कळला
देव भंडारा खेळला — जेजुरीचा ११८

खोबऱ्याच्या वाट्या — हळदी भरल्या
देव भंडारा खेळला — जेजुरीचा ११९

सिंहस्थीं नाशीक — कन्यागतीं वाई
जो जो कोणी जाई — मुक्त होई १२०

अलीकडे नाशीक — पलीकडे रामराजा
मधून ओघ तुझा — गोदाबाई १२१

गंगाबाई आली — चौदा कुंडें ती वहात
यात्रा येतसे धांवत — राजापूरा १२२

गंगाबाई आली — चौदा कुंडें तीं भरून
यात्रा येतसे दुरून — राजापूरा १२३

गंगाबाई आली — तळकातळ फोडून
राजापुराला वेढून — वस्ती झाली १२४

आल्या गंगाबाई — वडाच्या बुंध्यांतूनी
चौदाही कुंडांतूनी — प्रकटल्या १२५

कोळथऱ्या कोळेश्वर दाभोळे दाभोळेश्वर
पंचनदी सत्तेश्वर ज्योतिर्लिंग १२६

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची कंबर
निरी पडली शंभर पैठणीची १२७

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पायरी
निरी पडली बाहेरी पैठणीची १२८

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पाटली
सारी मुंबई बाटली काय सांगूं! १२९

मुंबईची मुंबादेवी तिची सोन्याची पायरी
सव्वालक्ष तारूं उभें कोटाच्या बाहेरी १३०

मुंबई मुंबई सारी मुंबई रांगडी
केरव्यावांचून . कोणी भरीना बांगडी १३१

मुंबईच्या बायका आहेत आळशी
नळ नेले चुलीपाशीं इंग्रजांनीं १३२

मुंबई शहरांत घरोघरीं नळ
पाण्याचे केले खेळ इंग्रजांनीं १३३

बडोदे शहरांत पाडीले जुने वाडे
मोठ्या ग रस्त्यांसाठीं नवे लोक झाले वेडे १३४

राणीच्या हातींचा राजा झाला ग पोपट
वाडे पाडून बडोद्या रस्ते केले ग सपाट १३५

बडोदे शहरांत वडांची थंड छाया
प्रजेवर करती माया सयाजीराव १३६

बडोदे शहरांत जो जो दिसे वाडा पडका
तो तो ग पाडून केल्या लांब रुंद सडका १३७

सयाजी महाराज बडोद्याचे धनी
राज्यकर्ते अभिमानी जनतेचे १३८

बडोदें वाढलें रस्ते नी इमारती
डोळे दीपवीती पाहणारांचे १३९

पन्नास पाकळी गुलाबाच्या फुला
लक्ष्मण झोला पाहण्याजोगा १४०

हरिद्वारची गंगा अत्यन्त पवित्र
तिनं माझीं गात्रं शुद्ध केलीं १४१

पवित्र ग स्नान शरयूचे कांठीं
माकडांची दाटी तेथें फार १४२

भक्तजन जाती मणिकर्णिकेचे कांठीं
देऊळांत दाटी विश्वनाथाच्या १४३

विष्णूला आवडे तुळशीचें पान
त्रिवेणी-संगम पाहियेला १४४

गुलाबाचें फूल गणपतीला आवड
गंगेची कावड रामेश्वराला १४५

येथून नमस्कार पुण्यापासून कलकत्त्याला
मोतीं तुमच्या अडकित्त्याला मामाराया १४६

समुद्राच्या कांठीं कोंकण वसलें
सुखानें हांसलें नारळींत १४७

समुद्राच्या कांठीं कोंकण वसलें
कृष्ण अर्जुन बैसले रथावरी १४८

कोंकणपट्टीचा रत्नागिरी जिल्हा
जळीं स्थळीं किल्ला पहारा करी १४९

पंढरीचा देव अमळनेरा आला
भक्तीला लुब्ध झाला पांडुरंग १५०

कड्यावरचा गणपती मूर्ति आहे मोठी
नित्य चढे घाटी मामाराया १५१

सोमेश्वर देवाजीच्या पाटांगणीं चिरा
लोटांगण घेतो हिरा गोपूवाळ १५२

झोळाई मातेचा आधीं घ्यावा कौल
मग टाकावें पाऊल प्रवासाला १५३

पालगड गांवाची किती आहे लांबी रुंदी
स्वयंभू आहे पिंडी शंकराची १५४

देव देव्हाऱ्यांत गणपति गाभाऱ्यांत
पालगड गांवींचा सोमेश्वर डोंगरांत १५५

पालगड गांवाला दूरवांचें बन
उत्तम देवस्थान गणपतीचें १५६

काय सांगूं बाई पालगडची हवा
गणपतीला मुकुट नवा उत्सवांत १५७

हळदीची वाटी झोळाईचे हातीं
पालगड गांवची घाटी उतरली १५८

काळकाई महांमाई या दोघी ग गांवांत
तिसरी डोंगरांत झोळाई माता १५९

झोळाई मातेपुढें फुलली तगर
पालगड नगर शोभिवंत १६०

माझे दारावरनं कोण गेली सवाशीण
पालगड गांवची मोकाशीण झोळाई माता १६१

रामटेक गडावरी कर्णा वाजे झाईझाई
रामाला सीताबाई विडा देते १६२

खांदेरी उंदेरी या दोघी जावाजावा
मध्यें ग कुलाबा हवा घेतो १६३

## प्रकरण सातवें

# ऐतिहासिक व देशाच्या

### रसपरिचय

स्त्रिया त्या त्या काळच्या घडामोडींवरहि ओंव्या करतात. त्या जरी घरांतच गुरफटलेल्या असल्या तरी त्यांच्या कानांवर अनेक गोष्टी येतात. श्रीशिवाजीमहाराजांच्या त्या स्वराज्य-स्थापनेच्या काळांत अशा हजारों ओंव्या मायबहिणींनीं रचिल्या असतील, झोंपाळ्यावर म्हटल्या असतील. परंतु मला ओंव्या गोळा करण्यास वेळ मिळाला नाहीं. या प्रकरणांत फारच थोड्या पूर्वींच्या काळावर आहेत. शिवाजीमहाराज म्हटलें कीं त्यांचे प्रतापगड, सिंहगड, रायगड हे किल्ले उभे राहतात. शिवाजीमहाराजांचा पुत्र राजाराम सोन्याच्या पाळण्यांत आंदुळला जात आहे अशी एक गोड ओंवी मिळाली आहे :

रायगडच्या किल्ल्यावरी सोन्याचा पाळणा
शिवाजीचा बाळ तान्हा राजाराम

श्रीशिवछत्रपति हे शंकरांचे अवतार मानले जात. जो गोरगरिबांत येतो, त्यांच्यासाठीं धडपडतो, तो देवाचा अवतार. शिवाजीमहाराजांना अवतार नाहीं म्हणायचें तर कोणाला?

शिवाजी छत्रपति सांबाचा अवतार
मावळे वानर रामरायाचे

आणि ही सुंदर व मार्मिक ओंवी ऐका :

वानरांकरवीं राम रावणा लोळवी
मावळ्यांच्या हातीं शत्रु शिवाजी बुडवी

शिवछत्रपति दिल्लीहून कसे निसटून आले ती गोष्टहि स्त्रियांच्या कानांवर गेली आहे. ती मोठीच ऐतिहासिक घटना होती. ती गोष्ट क्षणांत महाराष्ट्र-

भर पसरली असेल व शिवाजीमहाराज येथें थांबले होते, येथें उतरले होते अशा दंतकथा गांवोगांव उत्पन्न झाल्या असतील :

खाऊच्या निमित्तें बादशहा फसवीलें
शिवाजी बसून आले पेटाऱ्यांत
शिवाजीराजाचें धन्य ग धाडस
भवानी आईचें तो ग लाडकें पाडस

भवानी-माता शिवाजीमहाराजांना सांभाळीत होती. जनतेसाठीं धाडस करणाऱ्याला देव आशीर्वाद देतो. अशा धाडसाला समर्थांनीं "श्रेष्ठ धारिष्ठ" असें म्हटलें आहे. शिवाजीमहाराज भवानी-मातेचें लेंकरूं असें या ओंवींत म्हटलें आहे. तें वाचून हृदय सद्‌गदित होतें. आणि शिवछत्रपतींच्या किल्ल्यांचें महत्त्व ऐका :

शिवाजीचे किल्ले किल्ले ना, ती तो किल्ली
ज्याच्या हातीं तो जिंकी दिल्ली उत्तरेची

शिवाजीमहाराजांचा महिमा ऐका :

शिव छत्रपति धन्य ग धन्य राजा
पोटच्या पुत्रापरी पाळिली त्यानें प्रजा
दळितां कांडीतां तान्हेबाळा आंदुळीतां
शिवाजी मराठा आठवावा

मराठ्यांच्या इतिहासांत पहिले बाजीराव व चिमाजीअप्पा म्हणजे राम-लक्ष्मणांची, भीमार्जुनांची जोडी ! त्यांचें परस्परांवर किती प्रेम ! चिमाजीअप्पा आपल्या पत्रांतून बाजीरावांचा उल्लेख " राया " अशा गोड शब्दांनीं करतात. आणि वसईच्या संग्रामाचा तो वीररसपूर्ण अमर प्रसंग :

चिमणाजी बाजीराव हे दोघे सख्खे भाऊ
म्हणती वसई घेऊं एका रात्रीं

दोघे भाऊ अंबारींत बसून शनिवारवाड्यांत जातात असें वर्णन आहे. चिमाजीअप्पा व बाजीराव गेले आणि शेवटच्या काळांत दुसरे बाजीराव आले. ह्या दुसऱ्या बाजीरावांची एकच ओंवी मिळाली :

चिमणाजी बाजी गेले दुसरे बाजीराव कैसे झाले
सारें पुणं धुंडाळीलें पैशांसाठीं

आणि नारायणरावांच्या वधाची ती दुःखद घटना. तिच्यावर हृदयाला घरे पाडणाऱ्या अशा ओंव्या आहेत :

नारायणरावाला मारीले हाडांचे केले फांसे
आनंदीबाई हांसे पुण्यामध्यें

नारायणरावांच्या हाडांचे फांसे करून आनंदीबाई सारिपाट खेळते, हसते, यांतील विरोध अत्यंत तीव्र आहे. गंगाबाई गरोदर, माहेरीं गेलेली. दुपारची वेळ होती. नारायणराव जेवून उठले होते. लवंग-सुपारी खात होते. मरणाची कल्पनाहि ध्यानीं-मनीं नाहीं :

नारायणरावाला मारीलें मारिलें दुपारीं
त्यांनीं खाल्ली होती तुकती लवंग सुपारी.

किती सहृदय व करुण ओंवी. देवहि नारायणरावांचा साहाय्यकारी झाला नाहीं. रघुनाथराव आनंदीच्या अर्ध्या वचनांत. गंगाबाई माहेराहून येईपर्यंत नारायणरावांचें प्रेत झांकून ठेविलें होतें. ती आल्यावर रडूं लागली परंतु आनंदीबाई काय करीत होती ?

नारायणरावाला मारीलें गंगाबाई रडे
आनंदीबाई पेढे वांटीतसे

आनंदीबाईनें राज्य स्वतःच्या पतीसाठीं व पुत्रासाठीं मिळविलें :

आनंदीबाई जशी कैकेयी दूसरी
गिळिलें ग राज्य जसें माणीक सूसरीं

पुढें राज्य दुसऱ्या बाजीरावाच्या हातीं गेलें. हा नवा धनी प्रजेला कितपत मानवला ? समुद्र आटावा व मग माशांनीं तडफडावें तसें प्रजेला झालें :

समुद्र आटला मासा करी पाणी पाणी
राज्याला झाला धनी बाजीराव

मराठ्यांच्या या फाटाफुटीचा इंग्रजांनीं फायदा घेतला. आपसांतील भांडणामुळें परक्यांचें फावलें.

आनंदीबाईनं लोकीं भांडण लावीलें
म्हणून फावलें इंग्रजाला

अशा रीतीनें स्वराज्य गेलें. स्वराज्य कां गेलें याचीं कारणें स्त्रियांना माहीत होतीं. त्यांच्या मनावर या ऐतिहासिक घडामोडींचा परिणाम होत होता.

सर्वत्र अव्यवस्था माजली. पेंढारी लुटालूट करूं लागले. इंग्रजांची तैनाती फौज सर्वत्र आल्यामुळें पूर्वींच्या सैन्यांची जरूर राहिली नाहीं. ते शिपाई पेंढारी बनले. कोंकणांतील हर्णैजवळच्या मुरूड गांवीं पेंढारी आले, त्याच्या पुष्कळ ओंव्या आहेत असें ऐकतों. मुरूडच्या देवीनें पेंढाऱ्यांचा पाठलाग केला. तिनें आपल्या नाकांतील मोतीं खडकाखालीं लपवून ठेवलें. नंतर ती लढायाला गेली. पेंढाऱ्यांचें गलबत फुटलें. अशा कथा आहेत. मुरूडला जाऊन या ओंव्या गोळा केल्या पाहिजेत. मला एक दोन ओंव्या मिळाल्या. पेंढारी गुपचूप आले व मुरूड गांवचें सोनें लुटते झाले :

पेंढारी कीं आले आले मोनं मोनें
मुरूड गांवचं सोनें लुटीयेलें

मुरूड गांवचे त्या वेळचे श्रीमंत बागुल यांच्याकडची धनदौलत सारी लुटली गेली.

इतर लहानमोठे मराठे सरदार लढत होते. इंग्रजांनीं हळूहळू सर्वांना जिंकलें. त्यांचे किल्ले घेतले. चंदनवंदन, रायरी, अर्गजा वगैरे किल्ल्यांचे उल्लेख आहेत. कुरुंदवाडकरांचे हे किल्ले होते.

स्वराज्य अशा रीतीनें गेलें. पुण्याला इंग्रजांचा बावटा आला आणि बुधवार वाडा भर दोनप्रहरीं जळला :

जळला बुधवार वाडा बारांच्या ठोक्याला
साहेब लोकांला वर्दी गेली

जळला बुधवार वाडा उडालें कऊल
नेला पुण्याचा डऊल इंग्रजांनीं

आतां पूर्वींचें भाग्य गेलें. केवळ स्मृति राहिल्या. पुण्यांत आतां शनिवार-

वाडा पाहायचा नुसता. तेथें हत्ती चीत्कारत नाहींत, घोडे खिंकाळत नाहींत :

चळा जाऊं पाहूं पुण्यांतले वाडे
जेथं लाखो घोडे नाचले ग

पुणें पूर्वी कसें होतें ?

पुणं शहरांत छपन्न सरदार
भरे ग दरबार पेशव्यांचा

परंतु तें सारें वैभव कां गेलें ? लोकांनीं मोठमोठे वाडे बांधले, परंतु राज्य-कारभारांत ते वेडे ठरले :

पुणं शहरांत मोठमोठे वाडे
लोक परी वेडे कारभारांत

पुणें शहरांत सर्वत्र हौद व पुष्करिणी. पाण्याचा सुकाळ झाला. परंतु परस्पर-प्रेमभाव नाहीं, सहकार्य नाहीं. मत्सर बळावले. राज्य गेलें :

पुणं शहरांत पाण्याचा सुकाळ
परी पुण्याचा दुष्काळ चोहींकडे

आणि ही एक सिद्धांतस्वरूप ओंवी ऐका :

पुणं झालं सुनं गुणं झालं उणं
देवं नारायणं न्याय दिला

यांतील नारायण शब्दांत नारायणराव पेशव्यांची आठवण आहे का ? गुणहीन राष्ट्र मरतें. परंतु वाईट दिवस का नेहमींच असतात. भरलेले घट रिकामे होतात, रिकामे भरतात. जगाच्या संसाराला सदैव भरती-ओहोटी आहे. पुण्याला पुन्हा तेज चढेल. पुणें शहरांत पुन्हा नवहिंदुस्थानचें राज-कारण खेळूं लागेल. कारण लोकमान्य टिळक अवतरले आहेत ना :

पुण्याचं वैभव पुन्हा दिसेल ठळक
तेथं आहेत टिळक देशभक्त

आणि टिळकांच्या मूर्तीचें हें वर्णन वाचा :

**पुण्याची पुण्याई पुन्हा ग उदेली**
**मूर्ति सांवळी जन्मली टिळकांची**

ही ओंवी जर पत्राचार्य अच्युतराव कोल्हटकरांना मिळाली असती तर ते नाचले असते. लोकमान्यांनीं स्वदेशीचा मंत्र महाराष्ट्रभर नेला. गांवोगांव स्त्री-पुरुषांनीं स्वदेशीच्या शपथा घेतल्या. त्या वेळचें वातावरण अति तीव्र भावनांचें होतें. बायांनीं स्वदेशी बांगड्या, स्वदेशी वस्त्रें वापरण्याचा निश्चय केला. त्यांच्या ओंव्यांतून राजकारण रंगलें :

**बायांनो नट्टूं नका परदेशी ग चिटानें**
**बुडती कारखाने साळीयांचें**
**विदेशी बांगडी नको भरूं ग हातांत**
**अन्नान्न देशांत चोहोंकडे**

आज बहुतेक सारेच चहा पितात. परंतु तो आठ सालाचा काळ. चहा-साखरा वर्ज्य झाल्या. साखर आज बहुतेक सारी स्वदेशांत होते. परंतु त्या वेळेस सारी मोरस साखर, मॉरिशसची साखर. चहावरील ही टीका ऐका :

**चहाचें व्यसन दारूच्या बरोबरी**
**कपबशा घरोघरीं खुळखुळती**
**चहाचें व्यसन कपबशा ग निघाल्या**
**प्रकृति क्षीण झाल्या घेणाऱ्यांच्या**

लोकमान्यांना ती सहा वर्षांची शिक्षा होते. साऱ्या देशावर कृष्णछाया पसरते. महाराष्ट्रांत सारे दुःखी होतात. तीं सहा वर्षें गेलीं. लोकमान्य सुटून आले. सरकारनें आधीं वर्दी न देतां एकदम वाड्याशीं त्यांना आणून सोडलें :

**टिळक सुटले रात्रीचे साडेबारा**
**देशोदेशीं गेल्या तारा देशभक्तां**

लोकमान्यांना कोणी दत्ताचे अवतार मानीत. आणि जगचालकाला केलेली ही प्रार्थना ऐका :

**पहिली माझी ओंवी जगाच्या पालका**
**रक्षी टिळक बाळका रात्रंदिवस**

आणि तो मुळशीचा सत्याग्रह! त्या वेळेस मुळशीचा पाळणा आणि इतर गाणीं जिकडेतिकडे गेलीं. टाटा म्हणजे गरिबांच्या पायांतील कांटा असें बायामाणसें म्हणूं लागलीं. त्या सत्याग्रहांत स्त्रियाहि सामील झाल्या. त्यांनीं पराकाष्ठेचा त्याग केला, कष्ट व छळ सहन केले:

मुळशीच्या सत्याग्रहीं उडे आधणाचें पाणी
परि सत्याग्रही भगिनी मानिती तें फुलावाणी

टाटाचें हें वर्णन ऐका:

पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
मुळशीवर वरवंटा फिरवीला

आणि महर्षि सेनापति बापट! पाण्यांत बुडणाऱ्या मुळशीची जमीन कोण वांचवणार? पूर्वीं पृथ्वी बुडत होती तेव्हां देवानें वराहअवतार धरून दांतांनीं पृथ्वी वर ओढली. परंतु आज कोण घेणार अवतार? सेनापति बापट यांचें नांव पांडुरंग. हा पांडुरंग वराहावताराप्रमाणें उभा राहिला:

बुडत्या धरणीला पांडुरंग ग वराह
मुळशींत मोठा मांडीती सत्याग्रह

आणि सर्व हिंदुस्थानाला हलवणारी महात्माजींची चळवळ आली, राजकारण सर्वत्र पसरलें. दिवाणखानी राजकारण चव्हाट्यावर आलें. लोक स्वराज्याच्या गोष्टी उघडपणें बोलूं लागले. गांधीजींनीं हिंदुस्थान हें राष्ट्र केलें. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं लहान-थोर, स्त्री-पुरुष उभे केलें. होअरसाहेब म्हणतात, "गांधींच्या चळवळीमुळें आम्ही हिंदुस्थानाकडे अधिक आदरानें पाहूं लागलों." अशी ती विराट् चळवळ, तें महान् आंदोलन. स्त्रियांचा आत्मा जागा झाला. तुरुंग म्हणजे घर झालें. भीति गेली. भ्याड झुंजार झाले. बायकांच्या वाणीला पल्लव फुटले. त्यांचे ओवाणे आतां साधे नाहीं राहिले. त्यांतून खादी, गांधी, स्वराज्य हे शब्द येऊं लागले:

"इंग्रजांची नीति फोडा नी झोडा
बाळकृष्णपंतांच्या नेसूं खादीचा धोतरजोडा"

किंवा "स्वराज्य स्वराज्य म्हणूं लागले सारे
बाळकृष्णपंत जखमी झाले लाठीच्या मारें"

किंवा "महात्मा गांधी लोकां करिती धीट
बाळकृष्णपंत धैर्यें तुरुंगांत जातील नीट"

असे ओखाणे मुली आपसांत म्हणत. स्त्रिया असे ओखाणे रचीत. फुगड्या खेळतांनासुद्धां

आपण दोघी मैत्रिणी जोडीच्या
अंगांत चोळया खादीच्या

असें म्हणूं लागल्या. ओंव्यांतूनसुद्धां ही स्फूर्ति प्रकट झाली—

गांधी जादुगार भ्याडां करी धीट
दारुचा आणी वीट सर्व लोकां
गांधी हा गारुडी वाजवीतो पुंगी
इंग्रजाला गुंगी तेणें येई

लोक साधे होऊं लागले. यापूर्वीच्या गाण्यांतून लोक फॅशनेबल होऊं लागले म्हणून बायकांनीं टीका केली. घड्याळें आलीं, घड्याळाचे छेडे लोंबूं लागले. जाकिटें आलीं, गळ्याभोंवतीं उपरणीं आलीं वगैरे टीका बायकांनीं केल्या आहेत :

कळीची करणी
झाली धोतराचीं ऊपरणीं

हें सुंदर गाणें ज्यांनीं ऐकिलें असेल त्यांना ती टीका माहीत असेल. परंतु गांधी आले, कोट, सूट गेले, साधेपणा आला :

जिकडे तिकडे जाहलें गांधी गांधी
राहणी होई साधी शिकलेल्यांची

आणि तो मिठाचा सत्याग्रह ! त्यानें तर स्त्रियांचा आत्मा खडबडून जागा झाला. महर्षि अण्णासाहेब कर्वे १९३० सालीं जगत्प्रवास करून परत आले. त्यांनीं मुंबईला स्त्रियांच्या प्रचंड मिरवणुकी पाहिल्या. सभोंवतीं पोलिस आहेत; परंतु बायका कडेवरून समुद्राचें पाणी कायदेभंग करून नेत आहेत, राष्ट्रीय गाणीं गात आहेत. तें रोमहर्षण दृश्य पाहून स्त्रियांचा आत्मा जागृत व्हावा म्हणून सारें जीवन देणारा हा थोर पुरुष उचंबळला. ते मजजवळ बोटींत भेटले असतां म्हणाले, "तें दृश्य पाहून माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें."

सत्याग्रहानें स्त्रियांची शक्ति जागृत झाली. ऐका हें वर्णन :

कुठें या चाळल्या हजारों आयाबाया
बंद मीठ लुटावया इंग्रजाचें
बाया झाल्या धीट त्यांची गेली भीति
हातांत झेंडा घेती स्वराज्याचा

मी एकदां कोंकणांत माझ्या पालगड गांवीं गेलों होतों. रात्रीं सभा झाली. स्त्री-पुरुष जमले होते. माझी एक वृद्ध चुलत चुलती ती. सौ. जानकीकाकू हीहि आली होती. दुसऱ्या दिवशीं ती मला म्हणाली, "मीं एक ओंवी केली आहे ती टिपून घे. तूं ओंव्या गोळा करतोस. ती ओंवी टाकून नको देऊं. तूं पुस्तक छापशील त्यांत घाल हो. कबूल कर."

पालगड गांवांत काँग्रेसची भरली सभा
तेथें राहे हिरा उभा पंढरिनाथ

जानकीकाकूनें एक ओंवी सांगतांच शेजारची दुसरी एक भगिनी आली व तिनें लगेच दुसरी ओंवी केली :

पालगडच्या गणपतीला बदामाचा शिरा
पालगड गांवचा हिरा पंढरिनाथ

त्या सभेंतील वक्त्याचें नांव पंढरिनाथ होतें. तो वक्ता त्या गांवांतीलच होता. गांवच्या या मायबहिणींना आपल्या गांवांतील काँग्रेससेवकांचें कौतुक वाटलें. त्यांची प्रतिभा जागृत झाली. त्यांनीं ओंव्या केल्या.

गांधींची चळवळ ही सर्वांची चळवळ. तींत स्त्रिया-पुरुष, मुलें-बाळें सारीं भाग घेतात. महात्माजींनीं स्त्रियांचा आत्मा जागा केला. त्यांचे हे अपार उपकार आहेत :

गांधींची चळवळ मुलां बाळां बायकांची
भीति जाईल सर्वांची मनांतील

आणि स्वराज्यार्थ अहोरात्र झटणाऱ्या या महापुरुषाला देवानें उदंड आउक्ष द्यावें असें स्त्रिया प्रार्थीत आहेत :

एक देणारें स्वातंत्र्य प्रिय देशा हिंदुस्थाना
देई उदंड आउक्ष देवा महात्मा गांधींना

# ऐतिहासिक व देशाच्या : ओंव्या

रायगडच्या किल्ल्यावरी सोनियाचा वरवंटा
शिवाजी मराठा राज्य करी १

रायगडच्या किल्ल्यावरी सोन्याचा पाळणा
शिवाजीचा बाळ तान्हा राजाराम २

शिवाजी शिवाजी ऐकूनी शत्रु पळे
सर्वांचा गर्व गळे नाममात्रें ३

शिवाजी शिवाजी ऐकूनी शत्रु धूम ठोकी
शिवाजीमहाराजांची सत्कीर्ती गावी लोकीं ४

शिवाजी छत्रपती सांबाचा अवतार
मावळे वानर रामरायाचे ५

वानरांकरवीं राम रावणा लोळवी
मावळ्यांच्या हातीं शत्रू शिवाजी बुडवी ६

शिवछत्रपती धन्य ग धन्य राजा
पोटच्या पुत्रापरी पाळीली त्यानें प्रजा ७

खाऊच्या निमित्तें बादशाहा फसवीलें
शिवाजी बसून आले पेटाऱ्यांत ८

शिवाजी राजाचें धन्य ग धाडस
भवानी आईचें तो ग लाडकें पाडस . ९

शिवाजी राजाचें धन्य ग धाडस
भवानी मातेस चिंता त्याची १०

शिवाजीचे किल्ले किल्ले ना, ती तों किल्ली
ज्याच्या हातीं तो जिंकी दिल्ली उत्तरेची ११

शिवाजीचे किल्ले किल्ले चढाया कठीण
मोल प्राणाचें देऊन करी मराठा जतन १२

शिवाजीचे किल्ले
त्याचे मावळे चढती
किल्ले चढाया कठीण
त्यांना दोर ग लावून १३

दळीतां कांडीतां
शिवाजी मराठा
तान्हे बाळा आंदूळतां
आठवावा १४

काय सांगूं सखी
निघून गेले रातोरात
आले शिवाजीचे लोक
झपाट्यानें १५

वैरियांच्या हातीं
वैरियांच्या तोंडीं
शिवराया देई तुरी
शिवराया घाली भुरी १६

चिमणाजी बाजीराव
म्हणती वसई घेऊं
हे दोघे सख्खे भाऊ
एका रातीं १७

चिमणाजी बाजीराव
शनिवारवाड्यांत हत्ती आला
दोघा भावांची लगट
मोठ्या अंबारीसगट १८

चिमणाजीअप्पांनीं मसलत केली
नवी अंबारी जोडीली
बाजीरावांनीं सोडीली
पुण्यामध्यें १९

चिमणाजी बाजी गेले
सारे पुणं धांडूळीलें
दुसरे बाजीराव कैसे झाले
पैशासाठीं २०

पेंढार कीं आलं
मुरुडगांवचं सोनं
आलं मोनं मोनं
लूटीयेलं २१

पेंढार कीं आलं
बागलीणबाईची सरी
आलं तं दुपारीं
लांबविली २२

आधीं घेतला चंदन-वंदन
कुरुंदवाडकरांचा पेटारा
मग घेतला सातारा
चंदनाचा २३

आधीं घेतला चंदन-वंदन
कुरुंदवाडकरांची पायरी
मग घेतली रायरी
चंदनाची २४

आधीं घेतला चंदनवंदन
कुरुंदवाडकरांचा दरवाजा
मग घेतला अरगजा
चंदनाचा २५

नारायणरावाला मारीलें हाडांचे केले फासे
आनंदीबाई हासे पुण्यामध्यें २६

नारायणरावाला मारीलें हाडांचे केले दोर
आणि पुणें ग शहरांत आनंदीबाई थोर २७

नारायणरावाला मारीलें हाडांचे केले मणी
पुण्याचे झाले धनी बाजीराव २८

नारायणरावाला मारीलें मागल्या वेशीपाशीं
गंगाबाई माहेरासी गेली होती २९

नारायणरावाला मारीलें आडवे सोप्यांत
राणीचे वचनांत रघुनाथराव ३०

नारायणरावाला मारीलें मारीलें दुपारीं
गंगाबाई माहेरीं होती तेव्हां ३१

नारायणरावाला मारीलें मारीलें दुपारीं
त्यानीं खाल्ली होती नुकती लवंग सुपारी ३२

नारायणरावावरी घातले मारेकरी
त्याचा प्रभूही कैवारी झाला नाहीं ३३

नारायणरावाला मारीलें मुडदा ठेवीला झांकोनी
आली माहेरीं टाकुनी गंगाबाई ३४

नारायणरावाला मारीलें गंगाबाई गरभार
नवा भरविला दरबार रघुनाथरावांनीं ३५

नारायणरावाला मारीलें गंगाबाई रडे
आनंदीबाई पेढे वांटीतसे ३६

नारायणरावाला मारीलें आनंदीबाईला आनंद
तिनें तबकीं गुलकंद वांटीयेला ३७

समुद्र आटला मासा करी पाणी पाणी
राज्याला झाला धनी बाजीराव ३८

आनंदीबाईनें पाप हो फार केलें
म्हणून फावलें साहेबाचें ३९

आनंदीबाईनें लोकीं भांडण लावीलें
म्हणून फावलें इंग्रजाला ४०

आनंदी ग बाई जशी कैकेयी दूसरी
गिळलें ग राज्य जसें माणीक सूसरीं ४१

जळला बुधवारवाडा बाराच्या ठोक्याला
साहेब लोकांला वर्दी गेली ४२

जळला बुधवारवाडा उडालें कऊल
नेला पुण्याचा डऊल इंग्रजांनीं ४३

चला जाऊं पाहूं पेशव्यांचा शनवारवाडा
दारांत चौघडा जेथें वाजे ४४

चला जाऊं पाहूं पुण्यांतले वाडे
जेथें लाखों घोडे नाचले ग ४५

पुणें शहरांत छपन्न सरदार
भरे ग दरबार पेशव्यांचा ४६

पुणें शहरांत मोटेमोटे वाडे
लोक परी वेडे कारभारांत ४७

पुणें शहरांत केला पाण्याचा सुकाळ
परी पुण्याचा दुष्काळ चोहींकडे ४८

पुणें झालें सुनें गुणें झालें उणें
देवें नारायणें न्याय दिला ४९

पुणें झालें सुनें वाडे ओस झाले
वैभव सारें गेलें मराठ्यांचें ५०

पुण्याचें वैभव पुन्हा दिसेल ठळक
तेथें आहेत टिळक देशभक्त ५१

पुण्याची पुण्याई पुन्हा ग उदेली
मूर्ति सांवळी जन्मली टिळकांची ५२

स्वदेशीचा मंत्र लोकमान्य देती
मिळेल त्यानें मुक्ति हिंदुस्थाना ५३

बायांनो नटूं नका परदेशी ग चिटानें
बुडती कारखाने साळियांचे ५४

विदेशी बांगडी नको भरूं ग हातांत
अन्नान्न देशांत हिंदुस्थानीं ५५

चहाचें व्यसन दारूच्या बरोबरी
कपबशा घरोघरीं खुळखुळती ५६

चहाचें व्यसन कपबशा ग निघाल्या
प्रकृति क्षीण झाल्या घेणारांच्या ५७

माझे दारावरनं कोण गेलें गरजत
जयजयकार ग करीत टिळकांचा ५८

टिळक सुटले रात्रीचे साडेबारा
देशोदेशीं गेल्या तारा देशभक्तां ५९

टिळक सुटले रात्रीचे साडेअकरा
घरोघरीं साखरा वांटीयेल्या ६०

बाळ गंगाधर दत्ताचा अवतार
देशाचा कारभार घेई माथां ६१

कां ग सखी गर्दी काल जाहली रस्त्यांत
मिरवणुक होती येत टिळकांची ६२

पहिली माझी ओंवी जगाच्या पालका
रक्षी टिळक बालका रात्रंदिवस ६३

पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
तेणें मुळशी पेटा बुडवीला ६४

पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
मुळशीवर वरवंटा फिरवीला ६५

पैसेवाला मोठा मुंबईचा टाटा
त्याच्याँ नाहीं पोटा दयामाया ६६

मुळशींत मोठा मांडीती सत्याग्रह
बुडत्या धरणीला पांडुरंग ग वराह ६७

मुळशीच्या सत्याग्रहीं उडे आधणाचें पाणी
परी सत्याग्रही भगिनी मानिती तें फुलावाणी ६८

जिकडे तिकडे जाहलें गांधी गांधी
अंगावर साधी खादी घालतात ६९

जिकडे तिकडे जाहले गांधी गांधी
तुरुंगीं राजबंदी लाखों जाती ७०

गांधी हा गारुडी वाजवीतो पुंगी
इंग्रजाला गुंगी तेणें येई ७१

गांधी जादुगार भ्याडां करी धीट
दारुयाचा आणी वीट सर्व लोकां ७२

जिकडे तिकडे जाहलें गांधी गांधी
राहणी होई साधी शिकलेल्यांची ७३

कुठें ग चालल्या हजारों या ग नारी
समुद्रीचे तीरीं सत्याग्रहा ७४

चुलीपाशीं आला गांधीचा सत्याग्रह
इंग्रजाला शह घरींदारीं ७५

कुठें या चालल्या हजारों आयाबाया
बंद मीठ लुटावया इंग्रजाचें ७६

कुठें या चालल्या बायका गाणीं गात
सत्याग्रह चळवळींत उडी घ्याया ७७

| | | |
|---|---|---|
| बाया झाल्या धीट | त्यांची गेली भीती | |
| हातांत झेंडा घेती | स्वराज्याचा | ७८ |
| दूरच्या तुरुंगांत | भगतसिंगा फांशीं देती | |
| गांधी चळवळ करिती | स्वराज्याची | ७९ |
| पालगड गांवांत | कॉंग्रेसची भरली सभा | |
| तेथें राहे हिरा उभा | पंढरिनाथ | ८० |
| पालगडच्या गणपतीला | बदामाचा शिरा | |
| पालगड गांवचा हिरा | पंढरिनाथ | ८१ |
| माझ्या अंगणांत | हिरवा भाजीपाला | |
| खादीचा टोपीवाला | भाईराया | ८२ |
| गांधींची चळवळ | मुलाबाळां बायकांची | |
| भीती जाईल सर्वांची | मनांतील | ८३ |
| उठलीं मुलें बाळें | त्यांना भीति कशी नाहीं | |
| वंदे मातरं दिशा दाही | घुमतसे | ८४ |
| एक देणारे स्वातंत्र्य | प्रिय देशा हिंदुस्थाना | |
| देई उदंड आऊक्ष | देवा महात्मा गांधींना | ८५ |


ठाणे.

## प्रकरण आठवें

# व्रतें, सण वगैरे

### रसपरिचय

लग्न झाल्यावर मंगळागौर पुजायची. पहिलीं पांच वर्षें ही पूजा असते. श्रावणांतला मंगळवार; त्या दिवशीं ही पूजा करायची. पाऊस पडत असतो. पावसांत नाना प्रकारचीं फुलें फुलतात. मंगळागौरीसाठीं भरपूर फुलें जमविण्याची कोण खटपट. पहाटेपासून मुली उठतात. त्या आपल्या लहान भावांनाहि बरोबर घेतात. पाटीपाटी फुलें गोळा होतात. आणि ती नाना झाडांची पत्री हवी. मोटी गंमत असते :

**पहाटेच्या उठूं फुलें आणूं पाटीभर**
**आज आहे मंगळागौर उषाताईची**

मंगळागौरीचे दिवशीं रात्रभर जागरण करायचें, खेळ खेळायचे, फुगड्या, झिम्मे खेळायचे. लहानमोठ्या साऱ्या बायका मिसळतात. तो महोत्सव असतो. एक मैत्रीण विचारिते :

**कां ग सखी तुझे डोळे असे लाल**
**मंगळागौरीचें ग काल जागरण**

फुगड्यांचीं मनोहर वर्णनें आहेत. मैत्रिणी सासरहून माहेरीं वा माहेराहून सासरीं येतात. त्या भेटतात. आपण फुगडी खेळूं, प्रेमानें गरगर फिरूं, म्हणजे जन्मभर ओळख राहील असें त्या म्हणतात. लहानपणीं ज्यांच्याबरोबर आपण हसलों-खेळलों त्यांची आठवण आयुष्यांत चिरंजीव होते :

**फुगडी खेळूं ये तूं ग मी ग सखी**
**राहील ओळखी जन्मवेरी**

फुगड्यांनीं बाप्पाजींचें घर दणाणतें. जोरानें दणदण फुगडी चालते. पाठीमागचा खोपा सुटतो व वेणी मोकळी होते :

दणदण फुगडी दणाणतो सोपा
खेळतां सुटे खोपा मैत्रिणीचा

किती यथार्थ व सुंदर आहे हें वर्णन नाहीं? आणि तरुण नवोढांमध्यें पोक्त सुवासिनीहि मिसळतात. त्या पोक्त सुवासिनींनाहि जुन्या प्रेमळ प्रसंगांची आठवण येते. त्यांनींहि पूर्वी लाजत ओखाणे घेतले असतील. आज पुन्हा त्या ओखाण्यांतून पतीचें नांव घेतात :

मोठ्या मोठ्या नारी ओखाणे प्रेमें घेती
पतीच्या नांवीं प्रीती बायकांना

चातुर्मास्यांत नाना व्रतें, नाना नेम, कोणी गोपद्में काढतात, कोणी लक्ष वाती लावतात, कोणी फुलांची, दुर्वांची लाखोली वाहतात :

वेंचायाला लाग सखी दुरवा ग मातें
लक्ष मी वाहातें गणेराया

आणि एकीचें शाकाहारव्रत असतें. ती जाते आपल्या मैत्रिणीकडे. मैत्रीण प्रेमानें नानाप्रकारचें फराळाचें देऊं लागते. परंतु ही म्हणते :

शाकाहारव्रत असें माझें बाई
नको देऊं भलतें कांहीं फराळाला

आणि चातुर्मास्यांतील ते निरनिराळे दिवस: ज्या दिवशीं आजीबाई कहाण्या सांगते. हातांत तांदूळ घेऊन सारे लहानथोर त्या कहाण्या ऐकतात :

ऐकावी कहाणी हातीं घ्या तांदूळ
होईल मंगल ऐकणारांचें

नागपंचमीचा तो मंगल सण. त्या दिवशीं पाटावर चंदनाचा नागोबा काढायचा. गारुडी नागोबा आणतील त्याची पूजा करायची :

नागपंचमीला नागा चंदनाचें गंध
तुटतील भवबंध पुजणारांचें

नागाची पूजा कां करायची?

नागपंचमीला नागाला घाला दूध
होईल बुद्धि शुद्ध नागकृपें

नागपंचमीला नको चिरूं भाजीपाला
दया शिकवूं हाताला आज सये

गारुड्याची पुंगी वाजते. नागोबाला बाळ पाहूं इच्छितो. परंतु एकटा जायला भितो. तो आईच्या पाठीस लागतो. आई कोठें वाजते पुंगी त्याची चौकशी करते :

गारुडयाची पुंगी सखि कुठें ग वाजते
तेथें घेऊन मी जातें तान्हेबाळा

आणि नागपंचमीला झाडांवर झोंके घ्यायचे. एक स्त्री म्हणते, " इतक्या उंच जाऊं कीं आकाशाला धक्के देऊं :

चला सखियांनो घेऊं झाडावर झोके
आकाशा देऊं धक्के आपुल्या पायीं

कोंकणांतील एक भगिनी देशावरची ही झोक्याची मौज पाहते व म्हणते :

नागपंचमीला कोंकणीं नाहीं मजा
झोके घेती कडूनिंबा देशावर

आणि वर्षप्रतिपदेला गुढी उभारायची. शालिवाहन राजाच्या विजयाची ती खूण. ती गुढी कशासाठीं उभारायची ! ऐका :

गुढी पाडव्याला उंच गुढी उभवावी
कुळाची कीर्ती जावी दाही दिशां

ती गुढी जणूं कुळाचा मोठेपणा जाहीर करते. या कुळांतील, या घरांतील माणसें मनानें उंच आहेत असें जणूं ती गुढी सांगते. गुढीचें वर्णन ऐका :

पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
वर खण जरीकांठीं उषाताईचा
पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
चांदीची वर लोटी गोपूबाळाची

ही एक गोड ओंवी देतों :

गुढी पाडव्याला घरोघर गुढी
पडूं दे माझी कुडी देवासाठीं

आणि नवरात्रीचे ते नऊ दिवस. अंबा घटीं बसते. नऊ दिवस नऊ माळा बांधावयाच्या. दहाव्या दिवशीं विजयी अंबादेवी सीमोल्लंघनास निघते :

नऊ दिवस नवरात्र अंबामायेचा सोहळा
नऊ दिवस नऊ माळा वाहीयेल्या
नऊ दिवस नवरात्र दहावे दिवशीं दसरा
अंबा निघाली उशीरां शिलंगणा

आणि आपट्याचें सोनें लुटायला भाऊ जातो. घरीं येतो व बहीण त्याला ओंवाळते :

दसऱ्याचे दिशीं आपट्याची लुटालुटी
सारंगी घोडा पिटी गोपूबाळ

अंबाबाईला बायकांचे नवस असायचे :

नवस मीं केला मनांतल्या मनांत
मला पावली जनांत जोगेश्वरी

ज्या गोष्टीसाठीं नवस केला, ती गोष्ट मिळाली. आतां मला नवस फेडूं दे :

नवस मीं केला नवसाजोगी झाल्यें
नवस फेडूं आलें जोगेश्वरीचा

लहान मुलगी सासरीं गेलेली. तिचा सांभाळ अंबाबाईनें करावा म्हणून मांता नवस करते :

नवस मीं केला अंबाबाईला कमळ
परदेशीं तूं सांभाळ उषाताईला
नवस मीं केला अंबाबाईला ताम्हन
परदेशीं गेली लहान उषाताई

अंबाबाईच्या पायां पडून स्त्री म्हणते :

आई अंबाबाई पडते पायां लेक
चुडे अभंग हे राख जन्मवेरी

शिमग्याच्या सणांत बहिणीचे भाऊ डफ हातीं घेतात. ते क्षणभर गमती-साठीं खेळी बनतात. बहीण कौतुकानें म्हणते :

शिमग्याच्या सणा भाऊ माझे खेळी
डफावर जाळी मोतीयांची

कशीं हीं वर्णनें आहेत. मिळाल्या ओंव्या त्या देत आहे.

## व्रतें, सण वगैरे : ओंव्या

पहाटेच्या उठूं फुलें आणूं पाटीभर
आज आहे मंगळागौर उषाताईची १

पहाटेच्या प्रहररात्रीं उठोनी फुलें आणूं
मंगळगौर सजवुनी ठेवायाला २

प्राजक्तीच्या कळया करूं त्यांची अब्दागीर
आज आहे मंगळागौर उषाताईची ३

कां ग सखी तुझे डोळे असे लाल
मंगळागौरीचें ग काल जागरण ४

वसोळया किती होत्या सखी तुझ्या घरीं
होत्या मैत्रीणी ग चारी चुडेयांच्या ५

जागवूं मंगळागौर खेळ खेळूं नानापरी
नवी नवरी माहेरीं उषाताई ६

फुगडी खेळूं ये तूं ग मी ग सखी
राहील ओळखी जन्मवेरी ७

फुगडी खेळूं ये फिरूं ये गरगर
दणाणेल घर बाप्पाजींचें ८

झिम्मा खेळूं ये ग आपण मैत्रीणी जोडीच्या
आपण मैत्रीणी गोडीच्या बरोबरीच्या ९

दणदण फुगडी दणाणतो सोपा
खेळतां सुटे खोपा मैत्रीणीचा १०

गरगरां नको फिरवूं मला येते ग भोवंडी
पुरे कर ग फुगडी नको ओढूं ११

दणदण फुगडी दणाणे माजघर
जागवीती मंगळागौर उषाताईची १२

दंडाची दंडफुगडी तूं ग मी ग घालूं
माहेरीं नाचूं-खेळूं पोटभर १३

मोठ्या मोठ्या नारी फुगड्या खेळतात
प्रेमानें मिसळतात मुलींमध्यें १४

मोठ्या मोठ्या नारी ओखाणे प्रेमें घेती
पतीच्या नांवीं प्रीती बायकांना १५

मोठ्या मोठ्या नारी गाणीं म्हणती गमतीचीं
गाजते नवरीची मंगळागौर १६

श्रावणा सोमवार शिवालयीं जाऊं
शिवामूठ वाहूं पाहूं शंकराला १७

श्रावणा सोमवार आजं शेवटील
शंकराला बेल भावे वाहूं १८

गोपद्मांचा नेम चातुर्मासीं माझा
प्रसन्न कंथराजा माझ्यावरी १९

शाकाहार व्रत असे माझें बाई
नको देऊं भलतें कांहीं फराळाला २०

करायाला लागा शेजी मला बोटवाती
लक्षाला पडती कांहीं कमी २१

वेंचायाला लाग सखी दूरवा ग मातें
लक्ष मी वाहातें गणेराया २२

वेंचायाला लाग नीळवर्णाचीं ग फुलें
लक्ष मी बोलल्यें विठ्ठलाला २३

गुढी पाडव्याला उंच गुढी उभवावी
कुळाची कीर्ती जावी दाही दिशां २४

गुढी पाडव्याला गुढी उंच उभी करी
खण घाली जरतारी गोपूबाळ २५

गुढी पाडव्याला कडूलिंब खाती
आधीं कडू मग प्राप्ति अमृताची २६

गुढी पाडव्याला घरोघर गुढी
पडूं दे माझी कुडी देवासाठीं २७

पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
चांदीची वर लोटी गोपूबाळाची २८

पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
कुळाची कीर्ति मोठी बाप्पाजींच्या २९

पाडव्याची गुढी उंच कळकीची काठी
वर खण जरीकांठी उषाताईचा ३०

नऊ दिवस नवरात्र अंबामायेचा सोहळा
नऊ दिवस नऊ माळा वाहीयेल्या ३१

नऊ दिवस नवरात्र अंबामाय बसे घटीं
मोतीयांनीं भरा ओटी जोगेश्वरीची ३२

आलें नवरात्र चला पाहूं अंबाबाई
रीघ मंदिरांत नाहीं भारी गर्दी ३३

आलें नवरात्र माळेला फुलें आणूं
आरत्या रोज म्हणूं अंबाबाईच्या ३४

नवरात्रामध्यें अंबाबाईचा गोंधळ
भरूं मोत्यांची ओंजळ तिचे पायीं ३५

आज मंगळवार देवीचा वार आला
चला शेजी दर्शनाला राऊळांत ३६

आज शुक्रवार देवीचा प्रिय वार
लावूं नका हो उशीर दर्शनाला ३७

नऊ दिवस नवरात्र दहावे दिवशीं दसरा
अंबा निघाली उशीरां शिलंगणा ३८

दसऱ्याचे दिवशीं सोनें घेऊनीया आले
दारीं भाई ओंवाळीले उषाताईनें ३९

दसऱ्याचे दिवशीं माझ्या ताटामध्यें सोनें
ओंवाळीतें मी प्रेमानें भाईराया ४०

दसऱ्याचे दिवशीं आपट्याची लुटालुटी
सारंगी घोडा पिटी गोपूबाळ ४१

नवस मीं केला मनांतल्या मनांत
मला पावली जनांत जोगेश्वरी ४२

नवस मीं केला नवसाजोगी झाल्यें
नवस फेडूं आलें जोगेश्वरीचा ४३

नवस मीं केला अंबाबाईला कमळ
परदेशीं तूं सांभाळ उषाताईला ४४

नवस मीं केला अंबाबाईला ताम्हन
परदेशीं गेली लहान उषाताई ४५

नवस मीं केला अंबाबाईला कुयिरी
गेली परदेशा दूरी उषाताई ४६

आई अंबाबाई भरत्यें तुझी ओटी
सांभाळ सौभाग्याची पेटी उषाताईची ४७

आई अंबाबाई खण नारळ ग तुला
राख माझ्या कुंकवाला जन्मवेरी ४८

आई अंबाबाई फुलं तुला सुवासाचीं
काळजी कुंकवाची माझ्या घेई ४९

आई अंबाबाई पडते पायां लेक
चुडे अभंग राख जन्मवेरी ५०

आई अंबाबाई तुला सात नमस्कार
कृपा करी कथावर उषाताईच्या ५१

शेरा सोनीयाची अंबाबाई पागोट्यांत
राख माये परदेशांत भाईरायाला ५२

शेरा सोनीयाची अंबाबाई घडवोली
देव्हाऱ्यां चढवीली बाप्पाजींनीं ५३

ऐकावी कहाणी हातीं घ्या तांदूळ
होईल मंगल ऐकणाराचें ५४

नागपंचमीला नागाला वाला दूध
होईल बुद्धि शुद्ध नागकृपें ५५

नागपंचमीला पाटावर काढा नाग
आजीबाई कहाणी सांग लहानथोरां ५६

नागपंचमीला लाल ग चंदनी
नाग देतसे काढोनी भाईराया ५७

नागपंचमीला नागाला लाह्या-फुलें
सुखानें दोन्ही कुळें नांदतील ५८

नागपंचमीला नागा चंदनाचें गंध
तुटतील भवबंध पूजणारांचे ५९

नागपंचमीला नको चिरूं भाजीपाला
दया शिकवूं हाताला आज सये ६०

नागांची पंचमी गाणीं गाऊन जागवूं
दोन्ही कुळांना वागवूं आनंदांत ६१

गारुड्याची पुंगी कुठें ग वाजते
शेजीकडे पूजा होते नागोबाची ६२

गारुड्याची पुंगी सखि कुठे ग वाजते
तेथें घेऊन मी जातें तान्हे बाळा ६३

नागपंचमीला बांधिती झाडां झोके
खेळती कवतुकें नारी-नर ६४
चला सखियांनो घेऊं झाडावर झोके
आकाशा देऊं धक्के अपुल्या पायीं ६५
नागपंचमीची कोंकणीं नाहीं मजा
झोके घेती कडुलिंबा देशावर ६६
कार्तिक महिना काकड्याची वेळ
तुळशीची माळ विठोबाला ६७
शिमग्याच्या सणा भाऊ माझे खेळी
डफावर जाळी मोतीयांची ६८


मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ........ ग्रं. ........
ता. ............
ठाणें.

लहान मुलें असा कडंकडाट व गडगडाट होऊं लागला म्हणजे भितात. आई त्यांना कुशींत घेऊन निजवते :

मेघ गरजतो पाऊस वर्षतो
कुशींत निजतो तान्हे बाळ

पावसाळ्याचें असें मनोहर वर्णन आहे, तसेंच थंडीचेंहि आहे. फार थंडी पडलेली असली म्हणजे फुलांच्या कळ्या नीट फुलत नाहींत. त्या आंखडून जातात :

थंडी पडे भारी फुलती ना कळ्या
आंखडून गेल्या झाडावर

थंडी इतकी पडली कीं पाणी अगदीं गारगार झालें. आकाशांतील तारेहि थंडीनें थरथरूं लागले :

थंडी पडे भारी तारे थरारती
करी तूं गुरंगुटी तान्हे बाळा

थंडी पडलेली असली म्हणजे ताटांत किंवा शेगडींत निखारे घेऊन म्हातारीं माणसें घरांत शेकत बसतात :

थंडी आज भारी ताटीं निखारे भरून
देऊं शेकाया नेऊन बाप्पाजींना

परंतु स्त्रियांनीं उन्हाळ्याचें वर्णन केलें आहे तें आतां ऐका. ऊन इतकें पडलें आहे कीं दगड सुद्धां फुटून त्यांच्या लाह्या होतील :

दुपारचें ऊन दगडाच्या झाल्या लाह्या
तोंड कोमेजे देसाया भाईराया

भाईराया श्रीमंत. त्याला देसाईचें वतन आहे. त्याला ऊन सहन होत नाहीं. लहान मुलें उन्हाच्या झळा लागून कोमेजतात :

दुपारचें ऊन झळा झळाळा लागती
बाळें माझीं कोमेजती सुकुमार

अशा दुपारच्या उन्हांतून एखादे वेळेस आईला कोणाकडे जायचें असतें. तिच्या पायांत जोडा वगैरे नसतो. कडेवर मूल असतें. भरभर तर चालवत नाहीं :

दुपारचें ऊन पाय ग भाजती
त्यांत बाळ कडेवरतीं माउलीच्या

दुपारच्या वेळेला आई मुलांना जरा झोंपविते. पांखरेंहि झाडांच्या गर्द छायेंत शांत बसतात :

दुपारचें ऊन पांखरें शांत शांत
आईच्या मांडीवरी तान्हें बाळ ग निवांत

कधीं कधीं उन्हाळा इतका प्रखर होतो, कीं बाहेर तोंड काढवत नाहीं. जणूं निखाऱ्यांची वृष्टि होत आहे असें वाटतें :

दुपारचें ऊन बाहेर बघवेना
बाहेर निघवेना घडीभर

दुपारचें ऊन जणूं इंगळांची वृष्टि
हिरवी सारी सृष्टि जळून गेली

परंतु या उन्हाळ्यांतच झाडांना नवीन पालवी फुटते. वसंत ऋतु येतो. मोठें आश्चर्य आहे !

कडक उन्हाळा रानांत नाहीं पाणी
देव आश्चर्य करीतो झाडा पल्लव फोडूनी
आंबे मोहरले आनंद कोकिळेला
वसंताच्या स्वागताला करितसे

अशीं हीं वर्णनें आहेत. सकाळच्या सूर्यनारायणाचें वर्णनाहि मनोहर आहे. रथावर बसून सूर्य येतो. सर्वत्र प्रकाश पसरतो :

छत्र धरी शिरीं त्याचा लखलखाट पडे
सूर्यनाथ चढे रथावरी

आणि एक भगिनी प्रेमानें म्हणते, सूर्यनारायण आधीं माझ्या दारांत उगवले व मग पृथ्वीवर त्यांचा उजेड पडला :

उगवले सूर्यदेव आधीं उगवे माझ्या दारीं
मग पृथ्वीवरी उजेड पडे

उजाडत सूर्य लाल लाल दिसतो. जणूं शेंदराचा गोळा :

उगवला भानु इंद्राचा यज्ञ
आयुष्य मागे बापा गोपूबाळ

सोनेरी किरणांचा मुकुट घालून सूर्य येतो. तो येतांच साऱ्या चराचरांत चैतन्य संचरते :

सूर्य उगवला किरीट किरणांचा
पांखरां फुटे वाचा झाडांवरी

बहीण सूर्यनारायणाला म्हणते, "देवा, फार तापूं नकोस. भाऊ बाहेर गेला आहे. तो सुकुमार आहे."

सूर्यनारायणा तापूं नको फार
बाहेर सुकुमार भाईराया

सूर्य मावळतो. विद्यार्थी पुस्तकें बांधतात. गुरूला प्रणाम करून जातात :

सविता संपूर्ण झाल्या पदांची पोथी सोडी
गुरूला हात जोडी भाईराया

"पोथी सोडी" म्हणजे पोथी सोडून जातो, पोथी गुंडाळतो. पदांची म्हणजे वेदांची. वेदांतील ऋचांमधील प्रत्येक शब्द संधि सोडवून निराळा म्हणणें, या गोष्टीला "पदापर्यंत म्हणणें" असें म्हणतात. अमक्या भटजीनें पदांपर्यंत म्हटलें आहे असा प्रयोग करतात.

समुद्र म्हणजे अमर्याद काव्य! बायकांनीं त्याचें वर्णन केलें आहे. समुद्राचें पाणी सारखें नाचतें. त्याला क्षणाची विश्रांति नाहीं :

समुद्राच्या पाण्या स्वस्थता अणु नाहीं
नाचतें हाळतें सदा खालीं वर होई

समुद्र कधीं आटत नाहीं. कारण तो सर्व प्रवाहांना जवळ घेतो. जो सर्वांना जवळ घेईल तो अमर होईल :

कोठलेंहि असो पाणी समुद्र घे पोटीं
उन्हाळा पावसाळा त्याला नाहीं कधीं तुटी

समुद्र सारखा ओरडत असतो? त्याचें काय हरवलें आहे? काय आहे

त्याची वेदना ? त्याचा एकुलता एक गोरागोमटा मुलगा चंद्र दूर जाऊन बसला म्हणून समुद्र ओरडतो :

समुद्रा रे बापा किती टाहो तूं फोडशी
पुत्र तुझा गोरा गोरा जाऊन बसला आकाशीं

अशा या समुद्राच्या लाटा सारख्या उसळत असतात. शुभ्र फेस वर येत असतो. हा फेस नाहीं. समुद्र आपल्या मुलग्याला, त्या चंद्राला जणूं फुलें अर्पण करतो :

समुद्राच्या लाटा फेस उधळीती
गोड त्या चंद्राला जणूं फुलें अर्पिताती

ही एक काव्यमय उत्प्रेक्षा पाहा :

समुद्रा ग मध्यें लाटांचें उभें शेत
फेसाचें पीक येत अपरंपार

समुद्राचें वर्णन, त्याप्रमाणेंच पावसाळयांत दुथडी भरून जाणाऱ्या नद्यांचें वर्णन. कृष्णेचें हें वर्णन वाचा :

भरली कृष्णाबाई जशा दुधाच्या उकळ्या
जटा टेविल्या मोकळ्या दत्तात्रेयांनीं

कृष्णेच्या त्या फेसाळ लाटा म्हणजे दुधाला फुटलेल्या जणूं उकळ्या ! किंवा दत्तात्रेयाच्या या मोकळ्या सोडलेल्या जटा ! औदुम्बर किंवा नरसोबाची वाडी येथील का हें वर्णन आहे ? बहुधा नरसोबाच्या वाडीचें असावें. कारण तेथें खडक आहेत व फेसाळ लाटा कृष्णापंचगंगेच्या संगमांत उसळत असतात.

## ऋतुवर्णन, सृष्टिवर्णन : ओंव्या

पाऊस पडेना पडेना एक थेंब
फुटेना एक कोंब धरणीला १

पाऊस पडेना सुकले नद्या नाले
गुरांवासरांचे झाले भारी हाल २

पाऊस पडेना सुकलीं सारीं तळीं
सुकल्या वृक्षवेली रानींवनीं ३

पाऊस पडेना देव कोपलासे भारी
देवावांचुन कोण तारीं त्रिभुवनीं ४

पाऊस पडेना सुकलीं सारीं तोंडें
राग कां गोविंदें केला आहे ५

पाऊस पडेना पिकेल कशी शेती
होईल सारी माती संसाराची ६

पाऊस पडेना प्राण येती कंठीं
कधीं तो जगजेठी करिल कृपा ७

पडेल पाऊस बघा झाले मेघ गोळा
आला हो कळवळा देवबाप्पा ८

पावसाचीं चिन्हें दिसती आभाळीं
मेघांची गर्दी काळी जाहलीसे ९

मेघांची आकाशीं गर्दी झालेली पाहून
मोर नाचे आनंदून वनामध्यें १०

मोर नाचतांना मोर अश्रु ते गाळिती
लांडोरी चाखीती आनंदोनी ११

पड रे पाऊसा पिकूं दे दाणापाणी
भाईरायाला बहिणी आठवीती १२

पाऊस पडतो पडतो काळाकुट्ट
धरणीमाता हिरवी जोट पांघुरली १३

पाऊस पडतो थांबेना पागोळी
धरणीमाय हिरवी चोळी घालीतसे १४

पाऊस पडतो ओल्या झाल्यात कामिनी
भाकरीच्या पाट्या शेता जातात घेऊनी १५

पाऊस पडतो ओल्या झाल्यात जमिनी
या ग पेरणीच्यासाठीं शेता जाती सुवासिनी १६

पाऊस पडतो पागोळयां पाणी गळे
माणीक दारीं खेळे उषाताई १७

पाऊस पडतो पडतो मुसळधार
गंगेला आला पूर दोन्ही थडी १८

पाऊस पडतो गरजे पाणी पडे
आकाश जणुं रडे रात्रंदीस १९

पाऊस पडतो पडतो सारखा
सूर्य झालासे पारखा चार दिवस २०

पाऊस पडतो विजांचा चमचमाट
धरणीमाता हिरवा थाट मांडीतसे २१

मेघ गडगडे कडाडते वीज
कुशीमध्यें नीज तान्हे बाळा २२

झाडें झडाडती विजा कडाडती
धरणीमाये तुझा पति येत आहे २३

मेघ गरजतो पाऊस वर्षतो
कुशींत निजतो तान्हे बाळ २४

पाऊस थांबेना राउळीं कशी जाऊं
त्रिदळ कसें वाहूं शंकराला २५

पाऊस थांबेना देऊळीं कशी जाऊं
बाळाला कशी नेऊं कडेवरी २६

पाऊस थांबेना पांखरें गारठलीं
आईच्या पदराखालीं तान्हें बाळ २७

पाणी पाणी झालें साऱ्या अंगणांत
नको जाऊं तूं पाण्यांत तान्हे बाळा २८

येईल पडसें पाण्यांत नको जाऊं
घरांत खेळ पाहूं गोपूबाळा २९

येईल पडसें पाण्यांत नको नाचूं
मायेला नको जाचूं तान्हे बाळा ३०

पावसाच्या भारें जणुं डोंगर वांकले
हिरव्या रुमालें झांकलें त्यांनीं तोंड ३१

पाऊस पडतो पडतो थुईथुई
भिजल्या जाईजुई विठ्ठलाच्या ३२

पाऊस पडतो पडतो कोंडाकोंडा
भिजला राज्यगोंडा विठ्ठलाचा ३३

पाऊस पडतो पडतो भिरिभिरी
भिजली अब्दागिरी विठ्ठलाची ३४

पाऊस पडतो भरले नद्या नाले
भाई माझे अडकले पैलतीरा ३५

पाऊस पडतो नद्यांना आलं पाणी
देवा सुखरूप आणी भाईराया ३६

थंडी पडे भारी पाटींत निघती कळा
कुशींत तान्हे बाळा गाई करी ३७

थंडी पडे भारी पाणी झालें जसें कालें
निजलीं तान्हीं बाळें कुशीमध्यें ३८

थंडी पडे भारी फुलती ना कळ्या
आंखडून गेल्या झाडावर ३९

थंडी आज भारी ताटीं निखारे भरून
देऊं शेकाया नेऊन बाप्पाजींना ४०

थंडी पडे भारी मळे करपले
ओठ हे फुटले तान्हे बाळाचे ४१

थंडी पडे भारी फुटले तुझे ओठ
कोकमतेलाचें तूं बोट लाव बाळा ४२

थंडी पडे भारी तुला बंडी मी घालीन
राही बाळा तूं निजून अंथरुणांत ४३

थंडी पडे भारी तारे थरारती
करी तूं गुरंगुटी तान्हे बाळा ४४

दुपारचें ऊन दगडाच्या झाल्या लाह्या
तोंड कोमेजे देसाया भाईराया ४५

दुपारचें ऊन लागतें रे तुला
माझ्या गुलाबाच्या फुला गोपूबाळा ४६

दुपारचें ऊन झळा झळाळा लागती
बाळें माझीं कोमेजती सुकुमार ४७

दुपारचें ऊन पाय ग भाजती
त्यांत बाळ कडेवरती माउलीच्या ४८

दुपारचें ऊन नको जाऊं तूं बाहेर
तूं रे राजा सुकुमार फुलावाणी ४९

दुपारचें ऊन बाळ खेळायाला गेलें
कोकंबासारखें तोंड लाल लाल झालें ५०

दुपारचें ऊन कोण ग साहील
समुद्र आटेल अशा ऊनें ५१

दुपारचें ऊन पांखरें शांत शांत
आईच्या मांडीवरी तान्हें बाळ ग निवांत ५२

दुपारचें ऊन बाहेर बघवेना
बाहेर निघवेना घडीभर ५३

दुपारचें ऊन इंगळांची वृष्टि
हिरवी सारी सृष्टि जळून गेली ५४

कडक उन्हाळा रानांत नाहीं पाणी
देव आश्चर्य करितो झाडां पल्लव फोडूनी ५५

कडक उन्हाळा पाण्याचा नाहीं पत्ता
देव आश्चर्य करितो झाडां फुटे नवा पत्ता ५६

छत्र धरी शिरीं त्याचा लखलखाट पडे
सूयनाथ चढे रथावरी ५७

उगवले सूर्यदेव आधीं उगवे माझ्या दारीं
मग पृथ्वीवरी उजेड पडे ५८

सूर्य वर आला अंधार गेला दूर
दरींत करी घर भांबावोनी ५९

सूर्य उगवला किरीट किरणांचा
पांखरा फुटे वाचा झाडांवरी ६०

सविता संपूर्ण झाल्या मग करावें पारण
वाचीलें रामायण बाप्पाजींनीं ६१

सविता संपूर्ण झाल्या दिव्याला भरण
वाचीलें रामायण मामंजींनीं ६२

सविता संपूर्ण झाल्या पदांची पोथी सोडी
गुरूला हात जोडी भाईराया ६३

उगवला भानू शेंदराचा यप्पा
आयुष्य मागे बापा गोपूबाळ ६४

सोनेरी किरण डोंगराच्या माथां
नमन सूर्यनाथा उजाडत ६५

सूर्य नारायणा तापूं नको फार
बाहेर सुकुमार भाईराया ६६

सूर्यनारायणा तापूं नको फार
गांवा गेले छाया कर भाईरायाला ६७

सूर्यनारायणा
लोकांचं पाहशी
गगनीं तापशी
पापपुण्य ६८

उगवला भानू
त्याला माझा नमस्कार
भानु नव्हे हा भास्कर
दोन्ही हातीं ६९

आंबे मोहरले
वसंताच्या स्वागताला
आनंद कोकिळेला
करितसे ७०

समुद्राच्या पाण्या
नाचतं हालतं
स्वस्थता अणु नाहीं
सदा खालीं वर होई ७१

कोठलेंहि असो
उन्हाळा पावसाळा
पाणी समुद्र घे पोटीं
त्याला नाहीं कधीं तुटी ७२

समुद्रा रे बापा
पुत्र तुझा गोरागोरा
किती टाहो तूं फोडशी
जाऊन बसला आकाशीं ७३

समुद्राच्या लाटा
गोड त्या चंद्राला
फेंस उधळीती
फुलें अर्पिताती ७४

समुद्रा ग मध्यें
फेंसाचं पीक येत
लाटांचं उभं शेत
अपरंपार ७५

भरली कृष्णाबाई
जटा ठेविल्या मोकळ्या
जशा दुधाच्या उकळ्या
दत्तात्रेयांनीं ७६

## प्रकरण दहावें

# पहिली माझी ओंवी

### रसपरिचय

फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रो. वासुदेवराव पटवर्धन मराठी शिकवीत होते. त्यांनीं मुलांना विचारिलें " तुम्हांला मराठींतील अभिजात छंद माहीत आहे? मराठींतील अभिजात वृत्त कोणतें?" मुलांना उत्तर देतां आलें नाहीं. मग प्रो. पटवर्धन एकदम म्हणाले " ओंवी. ओंवी हा मराठींतील अभिजात छंद आहे. मराठींतील महाकाव्यें याच वृत्तांत आहेत. स्त्रियांनीं याच वृत्तांत स्वतःचीं सुखदुःखें सांगितलीं. तुम्ही कोणी एखादी ओंवी म्हणून दाखवतां?" मुलें हसलीं. कोणी ओंवी म्हणेना. तेव्हां पुन्हा प्रो. पटवर्धनांनीं

**पहिली माझी ओंवी पहिला माझा नेम**
**तुळशीखालीं राम पोथी वाची**

ही ओंवी म्हटली व म्हणाले, " ओंवी वृत्त फार गोड."

" पहिली माफी ओंवी, पहिला माझा नेम " ही ओंवी कोणाला माहीत नाहीं! मीं प्रस्तुत प्रकरणाला " पहिली माझी ओंवी " हेंच नांव दिलें आहे.

पहिली माझी ओंवी, दुसरी माझी ओंवी असें करीत करीत एकविसावी माझी ओंवी, येथपर्यंत मजल येते. या पद्धतीच्या किती तरी ओंव्या आहेत. मोठा सुंदर आहे प्रकार हा. यांत बुद्धिमत्ताहि लागते. पहिल्या चरणांत पहिली, दुसरी, तिसरी असे शब्द आरंभीं असतात, तर दुसऱ्या चरणाच्या आरंभीं त्या त्या संख्येइतकें कांहीं तरी सांगितलेलें असतें. उदाहरणार्थ:

**पांचवी माझी ओंवी पांच पांडवांना**
**पाटीच्या भावंडांना राज्य येवो**

या ओंवीच्या पहिल्या चरणाच्या आरंभी " पांचवी " असा शब्द आहे तर

दुसऱ्या ओळीच्या आरंभीं पांच पांडव असें आहे. स्पष्ट कल्पना येण्यासाठीं आणखी एक ओंवी देतों :

सातवी माझी ओंवी सात सप्त ऋषि
कौसल्येच्या कुशीं रामचंद्र

कधीं कधीं दुसऱ्या चरणाच्या आरंभीं संख्यादर्शक वस्तु नसून निराळीच गंमत केलेली असते :

विसावी माझी ओंवी विसांवा माहेराला
आईच्या आसऱ्याला सुखशांती

या ओंवींत पहिल्या चरणांत विसावी हा शब्द असल्यामुळें कांहीं तरी वीस दुसऱ्या चरणांत हवेत. परंतु विसाव्या ओंवींतील 'विसावी' हा शब्द "विसांवा" या समानोच्चारक शब्दाशीं जोडला आहे. अशा ओंव्यांतून संख्यादर्शक वस्तु नसते. परंतु अशा ओंव्या फार थोड्या आहेत.

कधीं कधीं या प्रकारांत ओंवीच्या पहिल्या चरणांतील संख्यादर्शक शब्दाशीं यमक आणणारा शब्द दुसऱ्या चरणाचे आरंभीं घालतात.

पहिली माझी ओंवी वहिला काळा दोरा
लिहिणाराचा हात गोरा राजबिंडा

या ओंवींत 'पहिली' या शब्दाशीं 'वहिला' या शब्दाचें यमकमय सादृश्य आहे.

या ओंव्यांतील कांहीं कांहीं ओंव्या फारच सुंदर आहेत. संसारांत सुख पाहिजे असेल तर शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं प्रेमानें वागलें पाहिजे. दुजाभाव कमी करीत गेलें पाहिजे असें एका ओंवींत सांगितलें आहे :

दुसरी माझी ओंवी दुजा नको भाव
तरीच पावे देव संसारांत

कधीं कधीं तिसऱ्या व चौथ्या चरणांत अर्थान्तरन्यासपर असें एखादें वचन असतें :

नववी माझी ओंवी आहेत नवग्रह
संसारीं आग्रह धरूं नये

पांचवी माझी ओंवी आपुलीं पांच बोटें
त्यांनीं कधीं कर्म खोटें करूं नये

अशीं सुंदर सुभाषितें शेवटच्या चरणांतून असतात.

ही एक गोड ओंवी पाहा :

सोळावी माझी ओंवी सोळा चंद्रकला
पतीच्या ग कळा सांभाळावें

एक बाई सांगते :

एकुणिसावी माझी ओंवी एकोणीस वर्षे
नेलीं मीं ग हर्षे संसारांत

एका स्त्रीचें हें वर्णन ऐका :

पहिली माझी ओंवी पहिली कामाला
स्मरते रामाला अंतरंगीं

हातांत काम व मुखांत रामनाम अशी ही थोर सती आहे.

कधीं कधीं तात्त्विक विचार या ओंव्यांतून असतात. योगशास्त्रांतील गोष्टीहि मांडलेल्या असतात. पुराणें वगैरे ऐकायला जाणाऱ्या बायकांना सारी माहिती असते :

सतरावी माझी ओंवी सतरावीचें दूध
योगी पिती शुद्ध समाधींत
दहावी माझी ओंवी दश इंद्रियांचा
अकराव्या मनाचा खेळ सारा

कांहीं ओंव्यांतून सामाजिक व ऐतिहासिक गोष्टीहि सांगण्यांत आल्या आहेत :

पहिली माझी ओंवी सदा एकीचें पाळन
घरीं बेकी होतां जाण राज्य गेलें
अठरावी माझी ओंवी अठरापगड जाती
गांवांत नांदती आनंदानें

गांवगाडा सुरळीत चालला आहे असें ही भगिनी सांगते. तसेंच आपल्यांतील दुहीनें राज्य गेलें असें ती बजावीत आहे.

तुकाराममहाराजासारख्यांनींहि पहिली माझी ओंवी, दुसरी माझी ओंवी या प्रकारच्या ओंव्या केल्या आहेत. त्यांनाहि स्त्रियांच्या वाङ्मयांतील हा प्रकार आवडला असावा. या प्रकरणांत तुकाराममहाराजांच्या या पद्धतीच्या दहा ओंव्या दिल्या आहेत. सोंवळ्या बायकांना या ओंव्या येतात; स्नानाच्या वेळेस वगैरे त्या म्हणतात. शेंवटच्या ओंवीत तुकाराममहाराज म्हणतात :

दहावी माझी ओंवी दाही अवतारां
घाली संवसारा तुका म्हणे

"तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसीं" त्याचीच येथें आठवण होते. लोकसेवेसाठीं पुनः पुन्हा संसारांत यावयास तुकाराम तयार आहेत. भगवान् बुद्धहि म्हणत असत कीं. 'जगांत जोंपर्यंत कोणी दुःखी आहेत तोंपर्यंत मी पुनः पुन्हा जन्म घेईन; कंटाळणार नाहीं."

या ओंव्या झोंपाळ्यावर बहुधा भराभरा रचलेल्या असाव्यात. एकीनें 'पहिली माझी ओंवी' असें म्हटलें कीं, दुसरीनें लगेच 'दुसरी माझी ओंवी' असें म्हणायचें. भराभरा त्या त्या संख्या दर्शविणाऱ्या वस्तु आठवल्या पाहिजेत. नऊ म्हणतांच नवग्रह, दहा म्हणतांच दाही दिशा, एकवीस म्हणतांच गणपतीच्या एकवीस दुर्वा किंवा एकवीस मोदक हें पटपट आठवलें पाहिजे. हा ओंवीप्रकार गोड आहे खरा.

## पहिली माझी ओंवी

पहिली माझी ओंवी पहिला माझा नेम
तुळशीखालीं राम पोथी वाची १

पहिली माझी ओंवी पहिल्यापासून
आली रथांत बसून अंबाबाई २

पहिली माझी ओंवी वाहिला काळा दोरा
लिहिणाराचा हात गोरा राजबिंडा ३

दुसरी माझी ओंवी दूध नाहीं कोठें
ध्यानीं मनीं भेटे पांडुरंग ४

तिसरी माझी ओंवी तीन त्रिकुटाच्या परी
ब्रह्माविष्णुशिवावरी बिल्वपत्र ५

चवथी माझी ओंवी चवथीच्या चंद्रा
मखमाली गेंदा रंग बहू ६

पांचवी माझी ओंवी पांच पांडवांना
पाठीच्या भावंडांना राज्य येवो ७

सहावी माझी ओंवी सहावीची छाया पडे
तुझ्या गर्भा तेज चढे उषाताई ८

सातवी माझी ओंवी सात सप्त ऋषि
कौसल्येच्या कुशीं रामचंद्र ९

आठवी माझी ओंवी आठ आटेपाटे
देवाजीचे ओटे रंगवीले १०

नववी माझी ओंवी नऊ खंडी गहूं
फेरीला किती घेऊं देवाजीच्या ११

दहावी माझी ओंवी दशांगुळें मी गाईन
लक्षुमी होईन संसारांत १२

अकरावी माझी ओंवी अकरा हे ग गडू
जेवला बुंदीलाडू गोपूबाळ १३

बारावी माझी ओंवी बारा आदितवार
सूर्याला नमस्कार घालूं केले १४

तेरावी माझी ओंवी तेरा तेरियाची
पालखी हिरियाची देवाजींची १५

चौदावी माझी ओंवी चौदा चौकड्यांची
पालखी हलकड्यांची देवाजींची १६

पंधरावी माझी ओंवी पंधरा कीं ग काड्या
रंगवीलया साड्या सीताबाईच्या १७

## पहिली माझी ओंवी


| | | |
|---|---|---|
| सोळावी माझी ओंवी<br>आज आहे माझ्या घरीं | सोळा कोशिंबीरी<br>भाऊबीज | १८ |
| सतरावी माझी ओंवी<br>ऐकावें माझें सये | सतरा धंदे करूं नये<br>हितासाठीं | १९ |
| अठरावी माझी ओंवी<br>शेजीशीं बऱ्या बोले | अठरा धान्यांचें कडबोळें<br>वाग बाई | २० |
| एकुणीसावी माझी ओंवी<br>संसारीं नित्य स्मरा | एकुण एक करा<br>गणेराया | २१ |
| विसावी माझी ओंवी<br>आईच्या आसऱ्याला | विसांवा माहेराला<br>सुखशांती | २२ |
| एकविसावी माझी ओंवीं<br>वाहा देवा गजानना | एकवीस दुर्वा आणा<br>लंबोदरा | २३ |
| पहिली माझी ओंवी<br>रक्षीता बाळका | जगाच्या पाळका<br>देवराया | २४ |
| दुसरी माझी ओंवी<br>तरीच पावे देव | दुजा नको भाव<br>संसारांत | २५ |
| तिसरी माझी ओंवी<br>संसारीं रमापति | भीकबाळे तीन मोतीं<br>आठवावा | २६ |
| चौथी माझी ओंवी<br>त्यांची कधीं गडी | चांडाळचौकडी<br>करूं नये | २७ |
| पांचवी माझी ओवी<br>त्यांनीं कधीं कर्म खोटें | आपुलीं पांच बोटें<br>करूं नये | २८ |
| सहावी माझी ओंवी<br>निर्मिलीं विचित्रें | सहा महाशास्त्रें<br>ऋषिमुनींनीं | २९ |
| सातवी माझी ओंवी<br>आहे हा संसार | सात आठवड्याचे वार<br>संकटाचा | ३० |

आठवी माझी ओंवी आठवा देवकीचा
सखा द्रौपदीचा कृष्णनाथ ३१

नववी माझी ओंवी आहेत नवग्रह
संसारीं आग्रह धरूं नये ३२

दहावी माझी ओंवी आहेत दहा दिशा
चंद्रामुळें निशा शोभतसे ३३

अकरावी माझी ओंवी अकरावा अवतार
मानूं ज्ञानेश्वर आळंदीचे ३४

अकरावी माझी ओंवी अक्राळ असूर
नखरा न कर उषाताई ३५

बारावी माझी ओंवी संसारीं बारा वाटा
पुण्याचा करी सांठा क्षणोक्षणीं ३६

तेरावी माझी ओंवी तीन तेरा होती
जरी न जपती जगीं लोक ३७

चौदावी माझी ओंवी चौदा चौकडयाचा
नाश झाला रावणाचा गर्व होतां ३८

पंधरावी माझी ओंवी पंधरा दिवसांचा पक्ष
संसारांत दक्ष राही सदा ३९

सोळावी माझी ओंवी सोळा चंद्रकला
पतीच्या ग कळा सांभाळाव्रें ४०

सतरावी माझी ओंवी सतरावीचें दूध
योगी पीती शुद्ध समाधींत ४१

अठरावी माझी ओंवी अठरा पुराणें
लिहिलीं व्यासानें लोकांसाठीं ४२

अठरावी माझी ओंवी अठरापगड जाती
गांवांत नांदती आनंदानें ४३

एकुंणिसावी माझी ओंवी एकोणीस वर्षें
नेली मीं ग हर्षें संसारांत ४४

विसावी माझी ओंवी विसाण पाण्याचें
निशाण रामाचें उभें केलें ४५

विसावी माझी ओंवी वीस मणी खंडी
नास्तिक पाखंडी होऊं नये ४६

एकविसावी माझी ओंवी एकवीस मोदक
तेणें सिद्धिविनायक सुप्रसन्न ४७

पहिली माझी ओंवी पहिला माझा नेम
गायीलें निधान पांडुरंग ४८

दुसरी माझी ओंवी दुजें नाहीं कोठें
पाहीन मी विटे पांडुरंग ४९

तिसरी माझी ओंवी त्रिगुण शरीरा
गाईन सोयरा पांडुरंग ५०

चवथी माझी ओंवी चतुर्भुज मूर्ती
गाईला श्रीपति पांडुरंग ५१

पांचवी माझी ओंवी पांची पराक्रम
गायीन आत्माराम पांडुरंग ५२

सहावी माझी ओंवी सहा मास लोटले
साक्षात भेटले पांडुरंग ५३

सातवी माझी ओंवी सप्त-द्वीपांठायीं
लक्ष तुझ्या पायीं पांडुरंग ५४

आठवी माझी ओंवी अठ्ठावीस युगें
विटेवरी उभे पांडुरंग ५५

नववी माझी ओवी नवविधा भक्ति
गाईन श्रीपति पांडुरंग ५६

दहावी माझी ओंवी दाही अवतारा
घाली संवसारा तुका म्हणे ५७

चौथी माझी ओंवी चौसंगें दाटली
प्रसंगें भेटली मायबाई ५८

बारावी माझी ओंवी बारा वाटा ग संसारीं
आठवा कंसारी भय नाहीं ५९

तिसरी माझी ओंवी तीन पावलीं वामन
व्यापीतो त्रिभुवन देवांसाठीं ६०

सहावी माझी ओंवी सहा हे ग ऋतु
वसंत परंतु त्यांचा राजा ६१

सहावी माझी ओंवी सहा तोंडें षडानना
नमूं देवा गजानना त्याच्या भावा ६२

एकटी दुसरी तिसरीला चिंधी
चवथीला बिंदी उषाताईला ६३

एकरी दुसरी तिसरीला माळ
चवथीला चंद्रहार घालूं केला ६४

पहिली माझी ओंवी पहिले वहिले
भक्तीनें वंदीले मायबाप ६५

पहिली माझी ओंवी पहिली कामाला
स्मरते रामाला अंतरंगीं ६६

पहिली माझी ओंवी पहिला ग पुत्र
व्हावा संसारांत म्हणतात ६७

दहावी माझी ओंवी दश इंद्रियांचा
अकराव्या मनाचा खेळ सारा ६८

बारावी माझी ओंवी बारा अक्षरांचा मंत्र
ध्रुव बाळानें पवित्र जप केला ६९

सरसकट माझी ओंवी सरसकट सहा देवां
आरती महादेवा कापुराची ७०

पहिली माझी ओंवी सदा एकीचें पालन
घरीं बेकी होतां जाण राज्य गेलें ७१

दुसरी माझी ओंवी दुहीला मिळतां वाव
परक्यांनीं डाव साधीयेला ७२

तिसरी माझी ओंवी लाभ तिसऱ्याचा
दोघांच्या भांडणाचा शेवट हा ७३

चवथी माझी ओंवी चारांचें ऐकावें
हट्टाला सोडावें संसारांत ७४

ओंवीला आरंभ केला पेटीला कप्पे कप्पे
लिहिणार माझे सख्खे भाईराय ७५

ओंवीला आरंभ केला पेटीला काळा दोरा
लिहिणाराचा हात गोरा भाईरायाचा ७६

---

## प्रकरण अकरावें

# सुभाषितें

### रसपरिचय

स्त्रियांच्या ज्या ओंव्या मीं संग्रहित केल्या त्यांतून कांहीं सुभाषितरूप ओंव्या अलग करून त्या या प्रकरणांत देत आहें. इतर प्रकरणांतूनहि मधून-मधून सुभाषितरूप सबंध ओंव्या किंवा सुभाषितरूप चरण नाहींत असें नाहीं; परंतु कांहीं पृथक् निवडून हें प्रकरण केलें आहे.

या सुभाषितांत कांहीं कांहीं फारच बहारीचीं आहेत. त्यांतून मी कोणतीं निवडून देऊं हें समजत नाहीं. परंतु कांहींची चव देतों. मनुष्य पुष्कळ वेळां चांगली वस्तु जवळ असूनहि तिचा त्याग करितो. प्रकाश जवळ असून अंधारांत खितपत पडतो. चांगला रस्ता समोर असूनहि मुद्दाम चिखलांतून जाऊं बघतो :

रामाच्या नांवाचा पापी कंटाळा करीती
निवळ टाकून पाणी गढूळ भरीती

निर्मळ पाणी जवळ असूनहि गढूळ पाणीच कांहीं पसंत करतात. असे अनुभव जीवनांत येतात.

स्त्रियांचें संसारासंबंधीं काय मत ? संसार सोडून देणें जरूर आहे का ? मुमुक्षूनें का संसार सोडावा ? संसारांत राहून मुक्ति होईल तो खरा. मनुष्याची परीक्षा संसारांतच व्यायला हवी :

शिकती तराया पाण्यांत पडून
संसारीं वावरून मुक्त व्हावें

तुम्हांला एक सुंदर सुभापित देऊं ? हें घ्या :

वाण्याच्या दुकानीं भाव नाहीं कापराला
मूर्खाशीं बोलतां शीण येई चतुराला

वाण्याच्या दुकानांत वस्तु पडलेल्या असतात. कोणी गिऱ्हाईक येईल तर ती द्यायची. त्याला त्या वस्तूंचें मोठेंसें प्रेम नसतें. त्याला जर आपण म्हणूं तुमच्या दुकानांत केशर आहे, कस्तुरी आहे, कापूर आहे, तर तो म्हणेल; आहेत डबे भरलेले. त्या वस्तूंमुळें त्याचें हृदय थोडेंच उचंबळून येतें ? त्याप्रमाणें मूर्खाला कितीहि चांगल्या गोष्टी सांगितल्या तरी त्याचें हृदय फुलत नाहीं. सुंदर ओंवी.

जगांत सारें नाशिवंत आहे. शरीर जाणारें आहे. या जाणाऱ्या शरीराला फार कुरवाळूं नका. आत्म्याकडे पाहा. मानवधर्माच्या सेवेंत देह झिजला. मेलों तर आपल्याबरोबर कोण येईल ? जगांत मागेंहि काय राहील ? ज्या चांगल्या गोष्टी आपण केल्या, त्याच आपणांला आधार :

**कुणी नाहीं रे कुणाचा पुत्र नव्हे ग पोटींचा**
**येईल कामाचा धर्म पांचा ग बोटींचा**
**कुणी नाहीं रे कुणाचा आत्मा नव्हे रे कुडीचा**
**आहे संसार घडीचा नाशिवंत**

या ओंव्यांतील प्रास-अनुप्रास आणि प्रसन्न रचना किती गोड आहेत !

धर्मांचें सार काय ? ज्या आईबापांनीं वाढविलें त्यांची सेवा. कृतज्ञता म्हणजेच धर्म :

**वृद्ध मायबाप सेवावे पूजावे**
**हेंच समजावें धर्मसार**

क्षुद्र लोक क्षुद्रांवर ओरडतात. परंतु मोठीं माणसें मोठ्यांशीं मुकाबला करतात. ही गोष्ट पुढील ओंवींत किती सुंदर रीतीनें मांडिली आहे पाहा :

**कुतरा भुंकतो मांजर देखून**
**गर्जतो पंचानन हत्तीसाठीं**

तीर्थयात्रा वगैरे काय कामाच्या ? परमेश्वर जवळ हवा. स्वतःचें जीवनच तीर्थ केलें पाहिजे. परमेश्वर शेवटीं हृदयांत हवा :

**राम राम म्हणुनी राम माझ्या हृदयांत**
**जसें मोतीं करंड्यांत वागवीतें**

किती सुंदर ओंवी! रामाचा जप करून शेवटीं जीवन राममय झालें पाहिजे. ध्येयाच्या चिंतनानें सारें जीवनच ध्येयमय झालें पाहिजे.

जगांत जर मोठ्यांपुढें टुरटुर कराल तर फजिती होईल. आकाशांतील नक्षत्रांनीं चंद्र नसतां चमकावें. परंतु चंद्र-प्रकाशांत तीं लोपून जातील. पौर्णिमेला त्यांनीं ऐट दाखवूं नये. अवसेला त्यांचें राज्य :

**चांदण्यांनो तुम्ही अंवसे राज्य करा**
**थोर नसतां गळवळा करावा कीं**

पुराणांतील वांगीं पुराणांत असें आपण नेहमीं म्हणतों. परंतु तीच गोष्ट या खालीं दिलेल्या ओंव्यांत किती ठसकेदार रीतीनें सांगितली आहे पाहा :

**पुराणींच्या गोष्टी सखी पुराणीं राहती**
**जन हे वागती यथातथा**

**पुराणींच्या गोष्टी देवळांत गोड**
**संसारींची ओढ कोणा सुटे**

जगांत अच्युत कोणी नाहीं. सर्वांना मरण आहे :

**फुलें सुकतात तारे गळतात**
**असे कोण ग अच्युत संसारांत**

स्त्रिया रोज सकाळीं चूल सारवतात. आठवड्यांतून एखादे वेळेस सारवून भागणार नाहीं. त्याप्रमाणें मनुष्यानें साधनेला संतत स्वीकारणें जरूर आहे. कधीं कधीं रामनाम घेऊन काम भागणार नाहीं. कधीं लहर आली म्हणजे खादी घेऊन जमणार नाहीं. ध्येयांचा निदिध्यास हवा. तरच जीवनावर संस्कार होतो :

**चूल सारवीती जशी नित्य ग नेमानें**
**तसें मन हें भक्तीनें सारवावें**

बाबर बादशाहा म्हणत असे कीं, जगाच्या खानावळींत जो जो आला त्याला शेवटीं मरणाचा पेला प्यावा लागतो. शेवटीं सर्वांना मरण. माउलीच्या पोटीं आलेला प्रत्येक प्राणी शेवटीं धरित्रीमायेच्या पोटीं जायचा आहे. रेल्वेचें तिकीट संपलें म्हणजे उतरावें लागतें, त्याप्रमाणें आयुष्य सरतांच जगाला रामराम करावा लागतो :

तिकिट संपतां सोडीली आगीनगाडी
सोडावें लागे जग आयुष्याची सरतां घडी

आगगाडी, मोटार यांच्या उपमा बायका देऊं लागल्या आहेत. मोटार सारखीं पों पों करीत जाते. जणूं अहंकारानें धांवते. पावसांत सर्वांच्या अंगावर खुशाल चिखलपाणी उडविते. मोटारींतील प्रतिष्ठिताला गोरगारिबांची किंमत नाहीं; ही गोष्ट स्त्रिया ओंव्यांतून सांगत आहेतः

पों पों ग पों पों मोटार पुढचं पाहीना
तसा कोणा जुमानी ना अहंकार

स्त्रियांची भव्य कल्पना, उच्च प्रतिभा तुम्हांला पाहावयाची आहे? मुक्तेश्वरांची, किंवा इंग्रज कवि मिल्टन यांची भरारी तुम्हांला स्त्री-वाङ्मयांत पाहायाची आहे? ही पाहाः

समुद्राच्या कांठीं विष्णु वाळू मळी
घडवीं बाहुलीं ब्रह्मदेव

या ओंवींत प्रास-अनुप्रास आहे; आणि विशाल कल्पना. रोज प्राणिमात्र जन्माला येत आहेत. एखादा कुंभार एखाद्या नदीकांठीं मडकीं बनवितो. त्याला थोडीशी माती व थोडें पाणी पुरतें. परंतु भगवान् विष्णु समुद्राची न संपणारी वाळू मळतात. समुद्राचें पाणी वापरतात. आणि मग त्या मळलेल्या वाळूचीं ब्रह्मदेव हीं बाहुलीं बनवितो. बाहुलीं शब्द किती समर्पक आहे!

ज्यानें जीवनांत वासना स्वैर सोडल्या, ज्याच्या जीवनांत संयमाला स्थान नाहीं, ज्यानें जीवनांत विषयभोगांचे मळे पिकविणें सुरू केलें, त्याच्या हातून पापाशिवाय काय होणार? पापाचें कोठारच त्याच्या घरीं जमा होतें :

ज्याच्या दारीं आहे कंदर्पाचें रोप
त्याच्या हातीं सारें पाप जमा होतें

एखाद्या गर्विष्ठ बाईला एक नम्र व अनुभवी बाई म्हणते :

कोणाचें आहे कोण माझा आहे भगवान
शेवटा जाऊं दे मूर्खा तुझा अभिमान

माझा तर भगवान् आहे. त्याचाच मला आधार. तूं स्वतःच्या घमेंडींत असशील तर अस. तुझा अभिमान होवो यशस्वी! बघ यश मिळतें का?

गर्वाचें घर तर खालीं असतें; परंतु तुझा गर्व जाणार असेल यशाच्या शिखराला तर जावो बापडा! गीतेंत म्हटलें आहे कीं, धर्माचें आचरण अल्पस्वल्पहि हातून झालें तरी तें कामीं येतें. अंधारांत एखादा किरणहि तारतो, समुद्रांत एखादा ओंडकाहि जगवितो :

इवलीशी पणती प्रकाशा देतसे
इवलेंसें पुण्य जिवा आधार होतसे

आणि या जगांत निरुपयोगी अशी वस्तु नाहीं. उपयोग करून घेणारा मात्र हवा. बायका आपला नेहमींचा अनुभव सांगतात :

सुंठ घासायाला खापरी येते कामीं
जगांत रिकामी वस्तु नाहीं

कोंकणांत तापांत खूप घाम वगैरे एकदम येऊं लागला तर सुंठीचें कुंड कौलावर घांसतात. ती जी मऊ पूड होते, ती अंगाला फांसतात.

बायका भांडीं शक्यतों स्वच्छ ठेवतात. परंतु पुष्कळशीं भांडीं जरी बाहेरून स्वच्छ दिसलीं तरी आंत काळीं असतात. ह्या अनुभवामुळें स्त्रिया म्हणतात :

वरूनी आरशाचें आंत परी भांडं काळें
सर्वच जीवांचें आंत बाहेर निराळें

जो अंतर्बाह्य एकरूप आहे, असा क्वचित्च एखादा महात्मा दुनियेंत असतो.

संसारांत कोणी सुखी होईल का? सर्वांचे मनोरथ पुरतात का? या जगांत समाधान शेवटीं मनांत निर्मावें लागतें. अभ्यासानें समाधान प्राप्त होतें :

संसारीं मानावें लागतें समाधान
सगळें मनींचें होईना कधीं पूर्ण

आणि या दोन ओंव्या पाहा :

पिकतात केस गळते बत्तीशी
वासना राक्षसी जैशीतैशी
पांढुरके केस परि वासना हिरव्या
कळेना कोणाला त्या कैशा जिरवाव्या

मनुष्य म्हातारा होतो, नाक लोंबूं लागतें, दृष्टि कमी होते, केस पिकतात; परंतु वासना नेहमीं तरुणच असते. वासना नेहमीं हिरवीगारच असते. आयुष्याचा क्षय होत आला तरी माणसाला माकडें बनविणाऱ्या स्वैर वासना अक्षयच असतात!

तारुण्य अंगांत मुसमुसत असतें तेव्हां मनुष्य ऐटीनें चालतो. त्याला सारें जग कःपदार्थ वाटतें. परंतु पुढें हें यौवन गेलें म्हणजे तोंडाभोंवतीं माशा घोंगावूं लागतात. तारुण्यांत तरुणींच्या भोंवतीं युवजनांचीं फुलपांखरें नाचत असतात. परंतु तें सौंदर्य गेलें कीं कोण राहतो जवळ!

नवतीची नार नार चाले दणादणा
नवती गेली निघून माशा करीती भणाभणा

किती सुंदर आहे ओंवी? शब्द कसे समर्पक आहेत!

आणि गर्जना करणाऱ्या समुद्राला एक स्त्री काय म्हणते ऐका :

समुद्रा रे बापा किती करीशी बढाई
नाहीं पाण्याला गोडी तिळमात्र

इंग्रजी कवि कोल्‌रिज यानें समुद्राचें वर्णन करतांना म्हटलें आहे :

Water water everywhere
Not a drop to drink

सर्वत्र पाणीच पाणी, परंतु तोंडांत एक थेंब घालण्याची सोय नाहीं. काय करायचें तें अपार पाणी? एखाद्या माणसाजवळ खूप संपत्ति असते. परंतु त्यांतील दिडकीहि कोणाच्या कामीं येत नसते! तो ऐट मिरवतो. मी श्रीमंत म्हणून तोरा मिरवतो. परंतु त्याच्या त्या मोठेपणाचा जगाला काय उपयोग?

आणि शेवटीं एक ओंवी देऊन हा रसपरिचय संपवितों :

गोड बाळपण गेलें बागडोनी
पांखराच्यावाणी सदोदित

## सुभाषितें : ओंव्या

डोंगर चढून भेटावें देवाला
यत्नानें यशाला मिळवावें १

नको ग कधींही संसारीं बोलूं खोटें
त्यानें गेले मोठमोठे अधोगती २

नको ग कधींही संगति दुर्जनांची
भेट ती नरकाची मृत्युलोकीं ३

रामाच्या नांवाचा पापी कंटाळा करीती
निवळ टाकून पाणी गढूळ भरीती
माझें माझें म्हणून प्राणी संसारीं भुलतो
निवळ सोडून पाणी गढूळ भरीतो ५

साखर मुंगीला मध तो माशीला
तैसें सज्जनचित्ताला रामनाम ६

शिकती तराया पाण्यांत पडून
संसारीं वावरून मुक्त व्हावें ७

वाण्याच्या दुकानीं भाव नाहीं कापराला
मूर्खाशीं बोलतां शीण येई चतुराला ८

चंदना पडती विळखे सर्पांचे
तैसे दुर्जनांचे सज्जनांना ९

बळीचीये दारीं तिष्ठतो वामन
भक्ताचे आधीन भगवंत १०

भक्ताला जवळ दुष्टा सदा लांब
प्रल्हादासाठीं खांब स्वीकारीला ११

कुणी नाहीं रे कुणाचा आत्मा नव्हे रे कुडीचा
आहे संसार घडीचा नाशीवंत १२

कुणी नाहीं रे कुणाचा पुत्र नव्हे ग पोटींचा
येईल कामाला धर्म पांचा ग बोटींचा १३

कुणी नाहीं रे कुणाचा कशाला हसा रडा
आहे संसार बुडबुडा नाशीवंत १४

कुणी नाहीं रे कुणाचा कशाला खोटें बळ
संसार मृगजळ नाशीवंत १५

वृद्ध मायबाप सेवावे पूजावे
हेंच समजावें धर्मसार १६

वृद्ध मायबाप जशीं पिकलेलीं फळें
तयांचीं चरणकमळें नित्य वंदूं १७

रामराम म्हणुनी जपती माझे ओठ
जिव्हेबाई घ्यावा घोट अमृताचा १८

रामराम म्हणुनी जपती माझ्या दाढा
घेई अमृताचा काढा जिव्हेबाई १९

कुतरा भुंकतो मांजर देखून
गर्जतो पंचानन हत्तीसाठीं २०

कुतरा भुंकतो भुंकतो भीतभीत
रानांत हुंकारत पंचानन २१

हंस धीर गति कावळे कोकलती
मूर्खांना उपेक्षिती बुद्धिमंत २२

नको तीर्थयात्रा नको चारी धामं
मुखीं घ्यावीं नामें विठ्ठलाचीं २३

नको तीर्थ यात्रा नको सप्त पुऱ्या
मुखीं ओंव्या गाव्या विठ्ठलाच्या २४

नको तीर्थ यात्रा नको अन्य नेमव्रत
माझें पवित्र दैवत मायबाप २५

रामराम म्हणुनी राम माझ्या हृदयांत
जसें मोतीं करंडयांत वागवीतें २६

चंद्राच्या प्रकाशीं लोपून जाती तारा
थोरापुढें तोरा मिरवूं नये २७

चांदण्यांनो तुम्ही अंवसे राज्य करा
थोर नसतां गल्बला करावा कीं २८

कुतरा भुंकतो घराच्या सभोंतीं
वन रानीं गर्जती सिंहव्याघ्र २९

आज काय झालें खळें पडलें चंद्राला
कोणी पापी का संताला छळिता हे ३०

पुराणींच्या गोष्टी गोड ऐकायाला
तसें वागायाला अवघड ३१

पुराणींच्या गोष्टी देवळांत गोड
संसाराची ओढ कोणा सुटे ३२

पुराणींच्या गोष्टी सखी पुराणीं राहती
जन हे वागती यथातथां ३३

आकाशामधून केवढा तारा तुटे
पतनावांचून कोणी ना जगीं सुटे ३४

फुलं कोमेजती तारे वरचे तुटती
सर्वांना आहे च्युती संसारांत ३५

फुलं सुकतात तारे गळतात
असे कोण ग अच्युत संसारांत ३६

चूल सारवीती जशीं नित्य ग नेमानं
तसें मन हें भक्तीनं सारवावें ३७

सारे बुडबुडे कांहीं संसारीं टिकेना
हें ग मरण कुणाही कधीं काळीं चुकेना ३८

जो जो प्राणी आला माउलीच्या पोटीं
धरित्रीच्या पोटीं तो तो जाई ३९

तिकीट संपतां सोडती आगिनगाडी
सोडावें लागे जग आयुष्याची सरती घडी ४०

अमृत विषाचें विष अमृताचें
ईश्वराच्या इच्छे होत असे ४१

पों पों ग पों पों जशी करते मोटार
तसा जगीं अहंकार प्राणीमात्रां ४२

पों पों ग पों पों मोटार पुढचें पाहीना
तसा कोणा जुमानीना अहंकार ४३

समुद्राच्या कांठीं विष्णु मळीतसे माती
ब्रह्मा घडवीतो मूर्ति नानापरीच्या ४४

समुद्राच्या कांठीं विष्णू वाळू मळी
घडवी बाहुलीं ब्रह्मदेव ४५

वेळीं सारवावें वेळींच शिवावें
हा ग देह आहे तोंच सार्थक करावें ४६

वेळींच जपावें वेळच्या वेळीं काम
हा ग देह आहे तोंच स्मरूं मनीं राम ४७

ज्याच्या दारीं आहे कंदर्पाचें रोप
त्याच्या हातीं सारें पाप जमा होतें ४८

कोणाचें आहे कोण माझा आहे भगवान
शेवटा जाऊं दे मूर्खा तुझा अभिमान ४९

कोणाचें आहे कोण माझा आहे भगवान
त्याच्या ग आधारें जाऊं संसार तरून ५०

संकटांत कामा येई जो मैत्र खरा
अभंग राहे हिरा घाव पडतां ५१

इवलीशी पणती प्रकाश देतसे
इवलेसें पुण्य जिवा आधार होतसे ५२

सुंठ घासायाला खापरी येते कामीं
जगांत निकामी वस्तू नाहीं ५३

वरूनी आरशाचें आंत परी भांडें काळें
सर्वच जिवांचें आंत बाहेर निराळें ५४

संकटांत कामा येईल तो खरा
त्याची कास धरा जन्मवेरी ५५

संसारीं मानावें लागतें समाधान
सगळें मनींचे होईना कधीं कोण ५६

संसारीं मानावें लागतें सखी सुख
नाहीं तर सदा दुःख चोंहोंबाजू ५७

पिकतात केस गळते बत्तीशी
वासना राक्षसी जैशीतैशी ५८

पांढुरले केस परी वासना हिरव्या
कळेना कोणाला त्या कैशा जिरवाव्या ५९

फुलांत सुगंध कमळीं मरंद
हृदयीं गोविंद असो तैंची ६०

नवतीची नार नार चाले दुणादुणा
नवती गेली निघून माशा करीती भणाभणा ६१

समुद्रा रे बाप्पा किती करीशी बढाई
नाहीं पाण्याला गोडाई तिळमात्र ६२

गोड बाळपण गेलें बागडोनी
पांखराच्या वाणी सदोदित ६३

मरणाच्या वेळे रामनाम घ्यावें
त्यानें मुक्त व्हावें चारी लोकीं ६४

राम राम म्हणा राम साखरेचा खडा
त्यानें माझ्या दंतदाढा गोड केल्या ६५

राम राम म्हणा राम साखरेचा रवा
रामाचें नांव घेतां दिवस आनंदांत जावा ६६

---

प्रकरण बारावें

# संकीर्ण

## रसपरिचय

हें शेवटचें प्रकरण. या प्रकरणांत उरल्या सुरल्या ओंव्या एकत्र दिल्या आहेत. एकाच विषयासंबंधींच्या ओंव्या या प्रकरणांत नाहींत. या प्रकरणांत खिचडी आहे. आणि खिचडी फार छान लागते नाहीं? भाताला भाजी-बिजीची जरूरी; परंतु खिचडीस निराळें तोंडीं लावणें लागतच नाहीं.

या संकीर्ण प्रकरणांत तुम्हांला मजामजा मिळेल. बोरीबंदरावर आगगाडी सुरू झाली. मड्डुम तेथें दिसली; साहेबांच्या बायका म्हणजे आमच्या बायकांना मोठें कुतूहल. बोरीबंदरावर सारे पदार्थ मडमीणबाईला या ओंव्यांतून खायला दिले आहेत. इंग्रजांनीं गाडी आणली ही. बिनबैलाची गाडी ढकलूं लागला. एका महाराष्ट्र शाहीरानें

साहेबाचा पोरगा मोठा अकली रे
बिनबैलानें गाडी कशी ढकली

हें गाणें केलेलें अनेकांना माहित असेल. मागील सत्याग्रह-संग्रामांत हें गाणें महाराष्ट्रभर पसरलें होतें; परंतु स्त्रियांनींहि आपल्या ओंव्यांत तोच भाव प्रकट केला आहे पाहा :

आगीनगाडी बिगिनगाडी गाडीला डबेडबे
बैलाविण चाले निघे रूळावरी

आणि ही गमतीची ओंवी वाचा :

बोरीबंदरावर मड्डुम खाते बिस्कुट
आगीनगाडीचें फिरलें मुस्कुट रूळावरी

दळणाच्या पुष्कळ ओंव्या या प्रकरणांत दिल्या आहेत. दळण व कांडण

पूर्वी घरोघर चाले. दळण तर चालेच चाले. दळणाचे श्रम ओंव्या म्हणतांना बायका विसरत. श्रमांतून हें वाङ्मय निर्माण झालें. मुंबईला एखादा मोठा दगड वर उचलतांना कामगार गाणें म्हणतात. या दळणाच्या ओंव्या हृद्य आहेत. अनेक भावना त्यांतून आहेत. दळण संपत यावें, सुपाच्या कोंपऱ्यांत आतां चिमुटभर दाणे राहिले आहेत; श्रमणाऱ्या त्या बायांना आनंद होतो. देव आठवतो :

**सरलं दळण राहिलें सुपाकोनीं**
**विठ्ठल रखुमाई गायीलीं रत्नें दोन्हीं**

महाराष्ट्राचीं विठोबा-रखुमाई हीं आवडतीं दैवतें.

नेहमीं शुभ बोलावें. दळण सरलें असें कधीं म्हणूं नये. दळण तर रोज उठून हवें. सासरीं-माहेरीं किती तरी मंडळी. भरलेलीं घरें. एक स्त्री सांगते :

**सरलें दळण सरलें म्हणूं नये**
**सासर-माहेर नांदतें माझें सये**

दळतां दळतां हात दुखूं लागतात. कष्ट होतात. परंतु पोक्त बाई तरुण मुलीला म्हणते :

**सरलं दळण दळून दमलीस**
**सीतेलाहि होई संवसारीं वनवास**

सीतेलाहि कष्ट भोगावे लागले; मग आपली काय कथा ?

दळतांना शेजारचीहि बाई एखादे वेळेस प्रेमानें हात लावायला येते. दळण पटकन् होतें. जातें जड जातं नाहीं; दळण संपत आलें म्हणजे ती बाई कृतज्ञतेनें म्हणते :

**सरलं दळण घालूं शेवटचा घास**
**असाच हात लावी शेजी तुझी मला आस**

किती गोड व सहृदय ओंवी ! शब्दरचनाहि कर्णमधुर अशी आहे.

बायका नेहमीं दळतात. परंतु ज्या जात्यावर दळायचें त्या जात्याचें कौतुक त्यांनीं केलें आहे का ? तें जातें पाहून त्यांची प्रतिभा स्फुरली का ? होय,

स्फुरली बरें. जातें, जात्याचा खुंटा व जात्यावर ओंव्या म्हणणाऱ्या सांवळ्या सुंदरीचा गोड गळा सारें एका ओंवींत आणलें आहे पाहा :

**जातें कुरुंदाचें खुंटा आंवळीचा**
**गळा माझ्या सांवळीचा आहे गोड**

कुरुंदी दगडाचीं तीं तांबडट जातीं जरा हलकीं येतात. सुंदर बांगड्या असलेला हात जातें ओढत आहे !

**जातें कुरुंदाचें खुंटा पाषाणाचा**
**वर हात कांकणाचा उषाताईचा**

पाषाणाचा खुंटा कसा असेल तें देव जाणे ! एखादा दगडी खुंटाच बसलेला असे कीं काय ?

जात्याच्या तोंडाला दिलेली ही सुंदर उपमा वाचा :

**जातियाचें तोंड जशी खोबऱ्याची वाटी**
**याचा कारागीर नांदतो बाळेघाटीं**

गांवांत परप्रांतीय भिक्षुक ब्राह्मण येतात. त्यांना देशवरकरी म्हणतात. एखादी सासुरवाशीण ओसरींत येते. भुकेलेला ब्राह्मण पाटाला हात लावतो. परंतु येथें जेवायला राहा असें सांगायला ती सासुरवाशिण धजत नाहीं. तिच्या मनांत कितीहि असलें तरी सासूसासऱ्यांच्या हवें ना ? ती आपल्या भावाचें घर ब्राह्मणाला दाखवते. आपला भाऊ उदार आहे, तो नाहीं म्हणणार नाहीं असा तिला आत्मविश्वास असतो. भावाविषयीं किती हें प्रेम :

**भुकेला ब्राह्मण पोटाला हात लावी**
**दुरून घर दावी भाईरायाचें**

एक म्हातारी आजीबाई म्हणते :

**देवा मी दुबळी नेसेन धाबळी**
**येईन राऊळीं तिन्ही सांजा**

एक स्त्री आपल्या गांवची स्थिति वर्णिते :

**गांव बिघडला सारे झाले गुंड**
**कोपेल वक्रतुंड गजानन**

गांवांतील मोठमोठे लोकहि जर मोहाला बळी पडूं लागले तर आशा तरी कोणती ?

गांव बिघडला गांवाची गेली शोभा
मोठेमोठे लोक लोभा गुंतताती

आणखी एक ओंवी सांगूं? प्रत्येक गांवांत मारुतीचें देऊळ असतेंच. मारुति ब्रह्मचारी—जितेंद्रिय. गांवांत मारुति असणें याचा अर्थ गांवानें संयमी व्हावें, रामसेवक व्हावें. परंतु:

गांव बिघडला झाले सारे व्यभिचारी
कोपेल ब्रह्मचारी मारुतिराय

असें ही भगिनी सांगत आहे.

"पहाटेच्या प्रहर रात्रीं" हा पहिला चरण असलेल्या बऱ्याच ओंव्या या प्रकरणांत दिल्या आहेत. ही ओंवी ऐका :

पहाटेच्या प्रहररात्रीं कोण राणी ओंव्या गाते
पुत्राला नीजविते उषाताई

पहाटे काकडआरत्या सुरू होतात. देवळांत झांजा वाजतात. काशाच्या धातूचे कर्णे वाजतात:

पहाटेच्या प्रहरीं कर्णा वाजतो मंजुळ
दह्या-दुधाची आंघोळ विठ्ठलाची

तिन्ही-सांजा झाल्या म्हणजे भिक्षा घालूं नये. विशेषतः भिकारणी-जोगिणींना घालूं नये. त्यांची मुलांबाळांवर दृष्ट पडायची एखादी.

तिन्ही सांजा झाल्या उंबऱ्याला रक्षा
जोगीणीला भिक्षा घालूं नये

हल्लींच्या मुलींवर ओंव्यांतून टीका आली आहे.

हल्लींच्या मुलींना काम नको डोळ्यांपुढें
लक्ष लिहिण्याकडे उषाताईचें

वांकडे भांग हवेत, कुंकू आहे नाहीं असें बारीक, खोपा घालण्याऐवजीं केसांचीं चकरें करायचीं, या सर्वांवर टीका आहे :

हल्लींच्या बायका चकरें घालीती
वर फूल तें शेविती शेवंतीचें

घरांत आतां घड्याळें आलीं आहेत. मुंबई टाइम, मद्रास टाइम हा फरकहि समजूं लागला :

मुंबई मद्रास मागें पुढें तास
किती वाजले तपास गोपूबाळा

बायकांना कुंकवाचें मोठें वेड. सौभाग्याचें तें चिन्ह. तें कुंकू सर्वांना पाठवायची हौस; बहिणीला पाठवीन, मामींना पाठवीन, वन्सबाईंना पाठवीन, ह्या सौभाग्यचिन्हाला सर्वत्र धाडूं दे, सदिच्छा प्रकट करूं दे.

कुंकू मी वाटीन भरीन कचेळा
धाडीन आजोळा मामीबाईला

गांवांतील सर्वांना बोलावून त्यांना कुंकू वाटायचं. मग बाहेरगांवच्या नातलगांना, मैत्रिणींना नको का धाडायला?

ही एक विनोदप्रचुर ओंवी ऐका :

वऱ्हांडयांत वऱ्हाडी गोपूबाळाची हुशारी
लग्नीं अच्छेर सुपारी पुरवीली

गोपूबाळ मोठा हुशार. अच्छेर सुपारी त्यानें पुरविली.

बैठकीच्या तबकांत अत्तरदाणी, गुलाबदाणी व लवंगा, वेलदोडे, जायपत्री सुपारी, कात वगैरे ज्यांत असतें तो चौफुला—सर्वांचें वर्णन पाहा कसें खुमारीनें केलें आहे :

अत्तरदाणी गुलाबदाणी या दोघी ग सवती
दोघींचा एक पति चौफुला तो

चौफुला शब्द पुल्लिंगी आहे. अत्तरदाणी, गुलाबदाणी स्त्रीलिंगी. त्या जणूं चौफुल्याच्या बायका!

एका तरुणाला कोणी तरी म्हणते :

अत्तरदाणी गुलाबदाणी पाचूपेट्या पिंगारदाणी
आहे हौशी तुझी राणी गोपूबाळा

तुझी राणी मोठी हौशी आहे. सारें तिला हवें, अंगावर पाचूपेट्या हव्यात, अत्तरदाणी-गुलाबदाणी जवळ हवी, विडा खाऊन पीक टाकायला पिकदाणी हवी, रंगेल आहे तुझी राणीः पिंगारदाणी म्हणजे पिकदाणी.

कधीं कधीं रूपकात्मक अशा अध्यात्मपर ओंव्या आढळतात :

**काय सांगूं सखे आंबा पिकलासे टिक्षी**
**येतील गरुडपक्षी घेऊन जाती**

हा कोठला आंबा ? गरुड कोण ? आंबा पिकला म्हणजे आयुष्य सरत आलें; म्हातारपण आलें. केंस पिकले. जीवनहि जणूं पिकलें. गोड झालें. काम-क्रोधांचा आंबटपणा जाऊन विचाराचा मधुर रस जीवनांत भरला. आतां विष्णूचे दूत येतील व हें फळ घेऊन जातील. रस्त्यांत कुंकवाची पुडी वगैरे सापडली तर पतीला भरपूर आयुष्य लाभेल असें स्त्रिया मानतात.

**कुंकवाचा पुडा अक्काबाईला सापडला**
**आयुष्याचा लाभ झाला तिच्या कंथा**

ओंव्या झोंपाळ्यावर बसून म्हणायच्या. त्या झोपाळ्याचें वर्णन नाहीं का केलें स्त्रियांनीं ? हो; केलें आहे तर ! झोंपळ्याला त्यांनीं दादा म्हटलें आहे. लहान मुलें आईला झोंपाळ्यावर घेऊन बस असें सांगतात. माता म्हणते :

**झोंपाळ्या रे दादा आम्हांला तुझा ळळा**
**चैन पडेना बाळाला तुझ्यावीण**

झोंपाळा तुटला म्हणजे मुलाबाळांची निराशा. मग तीं बापाच्या पाठीस लागतात. बाप पुन्हा बांधून देतो.

**झोंपाळा तुटला आम्ही बसूं कशावरी**
**दुसरा बांधा दारीं बाप्पाराया**

आणि एखाद्या विलासिनीच्या घरच्या झोंपाळ्याचें वर्णन ऐकायचें आहे ?

**झोंपाळा चंदनाचा त्याला पाचूचें दिलें पाणी**
**गंजीफा खेळे राणी गोपूबाळाची**

चंदनाच्या झोंपाळ्याला पाचूचा रंग दिला आहे. हिरवा रंग दिला आहे. त्यावर बसून आवडती बायको पतीबरोबर गंजीफा खेळत आहे !

असो. हें संकीर्ण प्रकरण नाना रसांचें आहे, तें गोड करून घ्या ही विनंति.

## संकीर्ण : ओंव्या

मेहुण मला हवें आवडीचीं दोघें
पुढें कंथ तूं मागें रखूमाई १

मेहुण मला हवें राधा-दामोदर
भवानी-शंकर चौघें यावीं २

लांब लांब केस विठोबा तेलंग्याचे
चारी खूर पलंगाचे झांकीयेले ३

आम्ही सहा जणी सहा गांवींच्या खारका
मध्यें नांदते द्वारका तुळसादेवी ४

आम्ही चौघी जणी चार बाजूंचे कळस
मध्यें शोभते तुळस मायबाई ५

अंगाईचे घरीं मंगाई राखण
संवगाईचें दुकान रस्त्यावरी ६

बोरीबंदरावर मड्डम खाते पेरू
आगिनगाडी केली सुरू इंग्रजांनीं ७

बोरीबंदरावर मड्डम खाते केळ
आगीनगाडीची झाली वेळ रूळावरी ८

बोरीबंदरावर मड्डम खाते संत्र
आगीनगाडीचें मोडलें यंत्र रूळावरी ९

बोरीबंदरावर मड्डम खाते कांकडी
आगीनगाडी झाली वांकडी रूळावरी १०

बोरीबंदरावर मड्डम खाते बिस्कुट
आगीनगाडीचें फिरलें मुस्कुट रूळावरी ११

बोरीबंदरावर मड्डम पीते चहा
आगीनगाडी आली पहा रूळावरी १२

आगीनगाडीबिगिनगाडी गाडीला डबे डबे
बैलावीण चाल नीघे रूळावरी १३

तारू लागलें बंदरा भाईरायांना ग सांगा
वेलदोडे लवंगा स्वस्त झाल्या १४

सरलें दळण उरला एक दाणा
गोकुळीं कृष्णराणा यश्वदेचा १५

सरलें दळण राहीलें सुपाकोनीं
विठ्ठल रखुमाई गाइलीं रत्नें दोन्ही १६

सरलें दळण सरलें म्हणूं नये
सासर माहेर नांदतें माझें सये १७

सरलें दळण सरत्या पुरत्या गंगा
येथून नमस्कार काशीच्या ज्योतिर्लिंगा १८

सरलें दळण मी आणीक घेणार
बैल कोटीचे येणार विठ्ठलाचे १९

सरलें दळण पुन्हा घेतलें पायली
लक्ष तुळस वाहिली विठ्ठलाला २०

सरलें दळण दळून दमलीस
सीतेलाहि होई संसारीं वनवास २१

सरलें दळण घालूं शेंवटचा घास
असाच हात लावी शेजीं तुझी मला आस २२

सरलें दळण राहिला राइरा
विठ्ठल सोयरा पंढरीचा २३

दळण मी दळी पीठ आलें मोदकाचें
जेवण वैदिकांचें पांडुरंग २४

दळण दळत्यें उरला चाराचुरा
मोत्याचा लावूं तुरा विठ्ठलाला २५

दळण दळत्यें दळत्यें रवा-पिठी
पाहुणे जगजेठी पांडुरंग २६

भुकेला ब्राह्मण सांगतें ऐक खूण
माडीवरी वृंदावन तुळशीचें २७

भुकेला ब्राह्मण पोटाला हात लावी
दुरून घर दावी भाईरायाचें २८

भुकेला ब्राह्मण कोरण मागतो डाळीचें
घर लेंकुरवाळीचें उषाताईचें २९

काशीस मी गेल्यें काशीकर झाल्यें
कागद धाडीयेले गांवोगांव ३०

देवा मी दुंबळी नेसेन धाबळी
येईन राउळीं तिन्ही सांजा ३१

देवा मी दुबळी वारियानें जातें
आधार तुझा घेतें पांडुरंगा ३२

झोळाईला पातळ सोमजाईला झुण्णा
या दोघी सास्वासुना वावरती ३३

वाटेवरला आंबा मोहरानें डुले
कौलानें बोले जोगेश्वरी ३४

नणंदा वन्सबाई आपुला मान घ्यावा
मला आशीर्वाद द्यावा चुडे यांना ३५

चैत्र मासींच्या रांगोळ्या प्रकारांच्या
नणंदा झणकाऱ्याच्या उषाताईच्या ३६

माझ्या धावण्याला तुम्ही धावा जगजेठी
द्रौपदीबाई मोठी मी तों बहीण धाकुटी ३७

माझ्या धावण्याला तुम्ही धावा चक्रपाणी
तुमच्यावरून माझा देह ओंवाळणी ३८

दुरून दिसते तातोबाची माडी लाल
सीताबाई बाळंतीण शालीचे दिले पाल ३९

वाजंत्रीं वाजतीं नदीच्या तीरावरी
देवा महादेवावरी अभिषेक ४०

काळी कपिला गाय दुधाला अधिक
त्याचा तुला अभिषेक महादेवा ४१

गांव विघडला सारे झाले गुंड
कोपेल वक्रतुंड गजानन ४२

गांव बिघडला झाले सारे व्यभिचारी
कोपेल ब्रह्मचारी मारुतिराय ४३

गांव विघडला सत्याची नाहीं चाड
कोपेल गोविंद श्रीगतिचा ४४

गांव बिघडला सत्याला नाहीं मान
कोपेल भगवान शेषशायी ४५

गांव बिघडला जसे कावळे भांडती
कोपेल लक्ष्मीपति नारायण ४६

गांव बिघडला गांवाची गेली शोभा
मोठेमोठे लोक लोभा गुंततातीं ४७

गांव विघडला मानीना कोणी कोणा
जो तो म्हणे मी शहाणा सभेमाजीं ४८

माझ्या घरीं ग पाहुणा पाहुणा नव्हे बाई
नणंदा वन्सबाई पति तुमचे ४९

पहाटेच्या प्रहररात्रीं कोण राणी ओंव्या गाते
पुत्राला निजवीते उषाताई ५०

पहाटेच्या प्रहररात्रीं कोंबडा आरवला
गोसावी फेरी आला दत्तात्रेय ५१

पहाटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो काशाचा
महालक्ष्मी मातेचा रथ फिरे ५२

पहाटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो मंजुळ
दह्यादुधाची आंघोळ विठ्ठलाची ५३

पहाटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो झाईझाई
रामरायाच्या स्नानाला जागें व्हावें गंगाबाई ५४

पहाटेच्या प्रहररात्रीं कर्णा वाजतो कांचेचा
महालक्ष्मी मातेचा रथ फिरे ५५

तिन्ही सांजा झाल्या उंबऱ्याला रक्षा
जोगीणीला भिक्षा घालूं नये ५६

तिन्हीसांजा झाल्या उंबऱ्याला माळ
जोगिणीला डाळ घालूं नये ५७

तिन्ही सांजा झाल्या उंबऱ्याला कणा
जोगीणिला दाणा घालूं नये ५८

लांबून दिसली मला वाटे माझी आई
भेटायास आली चुलत काकूबाई ५९

आपण गुज बोलूं डाळिंबीखालतीं
मी लेक तूं चुलती मायेपरी ६०

आपण गुज बोलूं कशाला हवी शेजी
गुजाजोगी आहे माझी काकूबाई ६१

जातें कुरुंदाचें खुंटा आंवळीचा
गळा माझ्या सांवळीचा आहे गोड ६२

जातें कुरुंदाचें खुंटा पाषाणाचा
वर हात कांकणाचा उषाताईचा ६३

जातियाचें तोंड जशी खोबऱ्याची वाटी
याचा कारागीर नांदतो वाळेघाटीं ६४

वेदशाळेमध्यें पाहीले कावळे
धैर्य तें मावळे बाप्पाजींचें ६५

गणपतीला नैवेद्य बदामाचा शिरा
पालगडगांवचा हिरा पंढरिबाळ ६६

गौरी बाळंतीण उन्हाळ्यांत आली
कांचेची माडी केली शंकरांनीं ६७

बाळंपट्टी खण पट्टीला चवळ
शिंपी करतो नवल चोळीयेचें ६८

हल्लींच्या मुलींना काम नको डोळ्यांपुढें
लक्ष सदा लिंहिण्याकडे उषाताईचें ६९

मला हौस मोठी वांकड्या भांगाची
भाळीं टिकली कुंकवाची तिळाएवढी ७०

देव देवळांत कृष्ण कमळांत
भानू आभाळांत चंद्र-सूर्य ७१

दिवस गेला कामाखालीं रात्र आली आनंदाची
पोथी वाचली गोविंदाची दादारायांनीं ७२

संकष्टी चतुर्थी माझा आहे नेम
भाचा सांगेन ब्राह्मण गोपूबाळ ७३

हल्लींच्या बायका चकरें घालिती
वर फूल तें रोंविती शेवंतचिें ७४

शंकराला बेल विष्णूला तुळस
दवडा आळस सर्वजण ७५

सूर्योदयापूर्वीं करी प्रातःस्नान
जाईल सारा शीण गोपूबाळा ७६

सूर्योदयापूर्वीं करी प्रातःस्नान
कर रामनाम मंत्र जप ७७

समयींत घाली उषाताई तेलवात
करीं सांजवात देवापाशीं ७८

चांदीचे ताटांत नैवेद्य आणीला
डोळें भरून पाहीला वनमाळी ७९

तांब्याच्या टोपांत उडदाचें वरण
एकादशीस मरण मज यावें ८०

आठा दिशीं सोमवार शिवण झालें बंद
कशिद्याचा तुला छंद उषाताई ८१

पहाटेच्या प्रहररात्रीं घुमघुम डेरा वाजे
कृष्णाला ने ग राधे गोकुळांत ८२

घड्याळ पाहतां वाजलेले तीन
वहिनी उठून चहा करी ८३

वन्सबाईंना ती वेणी जाऊबाईंना तो खण
हळद्याची दिली गोण जांवयाला ८४

भाऊ माझा एक भावजया किती
सोळा सहस्र गोपी भुळवील्या ८५

मामाराया घर बांधी सुतारांना दिल्या मिरच्या
घरांत आल्या टेबलखुर्च्या मामारायांच्या ८६

माझ्या ओटीवर कागदांचा केर झाला
लिहिणार कोठें गेला गोपूबाळ ८७

माझ्या दारावरनं दुर्वांच्या पाट्या जाती
आजोबांची भक्ति मोठी गणपतीची ८८

माझ्या दारावरनं बेलाच्या पाट्या जाती
शिवाची भक्ति मोठी बाप्पाजींना ८९

कुंकू मी करीन भरीन शिशांत
धाडीन देशांत ताईबाईला ९०

कुंकू मी वांटीन भरीन करंडा
धाडीन नणंदा वन्सबाईंना ९१

कुंकू मी वांटीन भरीन कचोळा
धाडीन आजोळा मामीबाईला ९२

कुंकू मी वांटीन भरीन वोगर्णी
धाडीन बहिणी आक्काबाईला ९३

जाईच्या फुलांचा वास येतसे सुंदर
रामरायाचें मंदिर वाटेवरी ९४

आधीं नमन करूं चिंचेच्या पानावरी
विष्णूच्या कानांवरी गोष्टी गेल्या ९५

वऱ्हाडयांत वऱ्हाडी गोपूबाळ हा नटवा
मिरवी खांकेस बटवा सुपारीचा ९६

वऱ्हाडयांत वऱ्हाडी गोपूबाळाची हुशारी
लग्नीं अच्छेर सुपारी पुरविली ९७

अत्तरदाणी गुलाबदाणी या दोघी ग सवती
दोघींचा एक पति चौफुला तो ९८

अत्तरदाणी गुलाबदाणी कांचेचा हिरवा पेला
पाण्यांत बंगला केला इंग्रजांनीं ९९

अत्तरदाणी गुलाबदाणी पाचूपेट्या पिंगारदाणी
आहे हौशी तुझी राणी गोपूबाळा १००

समुद्राचे कांठीं दर्भाचें आसन
तेथें तुमचें संध्यास्नान काकाराया १०१

काय सांगूं सखे आंबा पिकलासे टिक्षी
येतील गरुडपक्षी घेऊन जाती १०२

काय सांगूं सखे आंबा पिकला डहाळी
नेतील गरुडमाळी वेळ होतां १०३

समुद्राच्या कांठीं कुवारल्यांची दाटी
परकर चोळया वांटी अक्काबाई १०४

कुंकवाचा पुडा अक्काबाईला सापडला
आयुष्याचा लाभ झाला तिच्या कंथा १०५

देवांचा देव्हारा फुलांनीं सजवीला
मंत्रांनीं पूजीला बाप्पारायांनीं १०६

हरिश्चंद्र राजा तारामती राणी
डोंबाघरीं पाणी भरताती १०७

व्याह्यांच्या पंगतीला केला साखरभात
मुदळयाजोगा हात वैनीबाईचा १०८

वैनीबाई सुगरिणी तुझा हिंग करपला
कचेरीला वास गेला भाईरायाच्या १०९

नाकींची ग नथ पडली घंगाळांत
मैना गुंतली संसारांत वैनीबाई ११०

दुपार संपली झाली संध्याकाळ
हातीं घेती जपमाळ जपावया १११

माझ्या घरीं ग पाहुणे दत्तात्रेयस्वामी आले
पादुका विसरले पंचवटीं ११२

माझ्या घरीं ग पाहुणे दत्तात्रेय दिगंबर
चंदनें देवघर सारवीलें ११३

पंचवटीमध्यें पिंवळें झाड केतकीचें
रामापरीस सीतेचें गोरेंपण ११४

ब्राह्मणाच्या मुली तुला कामाचा कंटाळा
कुंकवाची चिरी तुझ्या पारोशा कपाळा ११५

माझे अंगणांत भात भात मोजिला खंडी खंडी
लुगडें घेती रेवदंडी काकाराया ११६

नागोबा माझे बाप नागीण माझी आई
लांडें पुच्छ माझे भाई सुखी राहो ११७

नागिणी ग बाई तुझा नागोबा कोठें गेला
गारूड्यानें नेला खेळावया ११८

देहाचा देव्हारा त्याला आत्म्याचें कुलूप
हिंदुस्थानांत मुलूख भाईरायाचा ११९

मुंबई-मद्रास मागें पुढें तास
किती वाजले तपास गोपूबाळा १२०

झोंपाळ्यावर बसूं म्हणूं ओंव्यापरी
गंमत खरोखरी होई किती १२१

झोंपाळ्या रे दादा तुला सदैव लांबवूं
गोडगोड ओंव्या गाऊं तुझ्यावर १२२

झोंपाळ्या रे दादा मुलांना आवडसी
मागेंपुढें नाचतोसी आनंदोनी १२३

झोंपाळ्या रे दादा आम्हांला तुझा ळळा
चैन पडेना बाळाला तुझ्यावीण १२४

झोंपाळा बांधीला ओसरी माजघरीं
खेळती त्याच्यावरी मुलेंबाळें १२५

झोंपाळ्यावर बसूं झोंपाळ्याचा नाडा
चिरेबंदी वाडा मामंजींचा १२६

झोपाळा तुटला आम्ही बसूं कशावरी
दुसरा बांधा दारीं बाप्पाराया १२७

झोंपाळा चंदनाचा त्याला पाचूचें दिलें पाणी
गंजीफा खेळे राणी गोपूबाळाची १२८

झोंपाळ्या रे दादा हेलंपट्टे खाशी
आम्हांला आज्ञापीशी उठावया १२९

REFBK-0006200